CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २३ मे २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १९४ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**आजचा सामना**
रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु वि. सनरायजर्स हैद्राबाद
वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : इकाना स्टेडियम, लखनऊ



**सोलापूर – भवानी पेठ** – राठी सिमेंट, **नई जींदगी** – एस.ए.बडेपीर, **वि.डी घरकुल** – वैष्णवी स्टील, **न्यु पाच्चा पेठ** – हारूण स्टील, **होटगी रोड** – एम.आर.सेल्स, **शेळगी** – शहा ट्रेडर्स, **सिध्देश्वर पेठ** – बेसकर अॅण्ड कंपनी, **कुर्डुवाडी** – श्री.गणेश स्टील, **सांगोला** – महालक्ष्मी स्टील सेंटर, **माढा** – तांबोळी स्टील अॅण्ड हार्डवेअर, **पिंपळनेर** – डिमांड ट्रेडर्स, **नातेपुते** – पोतेकर एंटरप्रायजेस, **पंढरपूर** – दुर्गा स्टील, **मांडवे** – बालाजी ट्रेडर्स, **टेभुंर्णी** – श्री साई ट्रेडर्स, **बार्शी** – भराडीया स्टील, **करमाळा** – शिवम स्टील, **अक्कलकोट** – माशाळे स्टील, **मोहोळ** – तलफदार स्टील, **कुरूल रोड** – श्री.भैरवनाथ स्टील ट्रेडर्स, **अकलुज** – चकेंश्वरा स्टील, **वैराग** – गांधी एजन्सी, **दहिटने** – एस. एस. मकंदर स्टील कॉर्पोरेशन, **जेऊर** – तांबोळी सिमेंट अॅण्ड मार्बल, **मरवडे** – सह्याद्री ट्रेडर्स, **मोडलिंब** – शिवाई ट्रेडर्स, **करकंब** – लक्ष्मी स्टील, **मंगळवेढा** – महालक्ष्मी ट्रेडर्स, **बेगमपूर** – सिध्दनाथ ट्रेडर्स, **वेळापूर** – रॉयल बिल्डींग सोल्युशन, **टाकळी** – गुरूकृपा ट्रेडर्स, **कंदलगाव** – श्री.केदारेश्वर हार्डवेअर अॅण्ड सिमेंट, **मुळेगाव** – आदित्य ट्रेडर्स, **महुद** – शेवाळे हार्डवेअर, **हुन्नूर** – लक्की ट्रेडर्स, **साळमुख** – त्रिमूर्ति स्टील, **माळशिरस** – अभिनंदन टाईल्स्, **मैंदर्गी** – खलील ट्रेडर्स, **वसंत विहार** – पूजा स्टील, **श्रीपुर** – शक्ती स्टील अँड किसान मॉल, **भोसे (क)** – पटेल स्टील, **कुरुल** – जगदंबा हार्डवेअर, **सोड्डी** – ओम ट्रेडर्स, **तडवळ** – स्वामी समर्थ ट्रेडर्स, **टाकळी सिकंदर** – लक्ष्मी टाईल्स, **नरखेड** – राहुल एंटरप्रायझेस, **जवळा**– आंद्रेश्वर स्टील सेंटर, **तांदुळवाडी**– साईराज ट्रेडींग कंपनी, **कोंडी**– तिरूपती बिल्डींग मटेरियल्स, **बाळे**– वर्धान ट्रेडर्स.

आयकॉन स्टील
टीएमटी बार

# झुडपी जंगलांना 'वना'चा दर्जा

**सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय ● ८६,४०९ हेक्टर झुडपी जमिनींचा विकास करण्याचा मार्ग मोकळा**

◆ **नवी दिल्ली, २२ मे**

विदर्भातील सहा जिल्ह्यांमध्ये असलेल्या झुडपी जंगलांना वनक्षेत्र समजविण्यात यावे, असा ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने गुरूवारी दिला. या जंगलांचा उपयोग शासकीय उद्देश वगळता अन्य कामासाठी करता येणार नसल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. पूर्व विदर्भातील नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये झुडूपी जंगलांचे क्षेत्र आहे. या निर्णयामुळे रखडलेली विकासकामे मार्गी लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पूर्व विदर्भातील या सहा जिल्ह्यांतील ८६,४०९ हेक्टर झुडपी जमिनींचा विकास करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसिह यांच्या न्यायासनाने हा ऐतिहासिक निर्णय दिला. या निर्णयाचा विदर्भातील विकासावर मोठा परिणाम होणार आहे.

'झुडपी' हा मराठी शब्द आहे, ज्याचा शब्दशः अर्थ झुडपे किंवा झुडुपे असा होतो आणि 'झुडपी' जमिनीचा अर्थ झुडुपे वाढलेल्या कनिष्ठ प्रकारच्या रिकाम्या जमिनी असा होतो.

वनीकरणासाठी वनेतर जमीन उपलब्ध नसल्याबद्दल राज्याच्या मुख्य सचिवांचे प्रमाणपत्र नसल्यास अशा जमिनींचा भरपाई म्हणून वनीकरणासाठी वापर करण्यास परवानगी दिली जाणार नाही, असे न्यायासनाने निर्देश दिले. अशा परिस्थितीत, पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या विद्यमान मार्गदर्शक तत्त्वांनुसार, 'झुडपी जंगल' जमिनीच्या दुप्पट क्षेत्रावर भरपाई देणारी वनीकरण करणे आवश्यक आहे, असे त्यात म्हटले आहे. १९६१ साली महाराष्ट्रात ९.२३ लाख हेक्टर भूमी झुडपी जंगल क्षेत्रात येत होती. यापैकी ६.५५ लाख हेक्टर जमिनीला संरक्षित किंवा आरक्षित वनभूमीचा दर्जा देण्यात आला आहे. उर्वरित २.६८ लाख हेक्टर जमिनीपैकी ९२ हजार ११५ हेक्टर जमीन वनीकरणासाठी योग्य मानली गेली. एक लाख ७६ हजार हेक्टर जमिनीपैकी ८९ हजार ७६८ हेक्टर जमीन १९९२ पर्यंत वनेतर कार्यासाठी वळविण्यात आली. उर्वरित ८६ हजार ४०९ हेक्टर जमीन कायदेशीर वादात अडकली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या आजच्या निर्णयामुळे हा वाद संपुष्टात आला आहे.

झुडपी जंगलातील जमिनींभोवतीच्या कायदेशीर संदिग्धतेमुळे अनेक सार्वजनिक पायाभूत सुविधा प्रकल्प रखडले आहेत. यामध्ये विविध सिंचन प्रकल्प, खाणींचा विस्तार आणि रस्त्यांच्या जाळ्यांचा समावेश आहे. ही जमीन अधिकृत नोंदींमध्ये वनजमीन म्हणून नोंदविली गेली आहे. परंतु, ती बऱ्याचदा वनेतर हेतूंसाठी वापरली जाते. २०१४ ते २०१८ दरम्यानचे सरकारचे जीआर आणि धोरण बदलांमुळे या जमिनींचे हस्तांतरण वन (संरक्षण) कायदा १९८० चे पालन न करता झाले. याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. ◀(वृत्तसंस्था)



### १९८० नंतरची अतिक्रमणे दोन वर्षांत काढा

झुडपी जंगलातील १९८० नंतरच्या सर्व बांधकामांना अतिक्रमण ठरवत सर्वोच्च न्यायालयाने दोन वर्षांत अतिक्रमण काढण्याचे निर्देश दिला. ''झुडपी जंगल'' जमीन वनीकरणाव्यतिरिक्त इतर कामांसाठी वळवण्याबाबत केंद्र आणि महाराष्ट्र यांच्यात तीन महिन्यांच्या आत आपसात सल्लामसलत करण्याचा निर्देश न्यायासनाने दिला.



# पाकला शरणागतीस भाग पाडले : पंतप्रधान

**बिकानेर येथील सभेत हल्लाबोल**



◆ **बिकानेर, २२ मे**

भारतीयांच्या जिवाशी खेळणाऱ्यांना अजिबात सोडले जाणार नाही. भारत अणुबॉम्बच्या धमक्यांना घाबरणार नाही. २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी आमच्या बहिणींचा धर्म विचारून त्यांचे कुंकू पुसले. पहलगाममध्ये झाडलेल्या गोळ्या १४० कोटी देशवासीयांच्या हृदयाला भिडल्या. तिन्ही सैन्यांना पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले आणि सैन्याने पाकिस्तानला गुडघ्यावर झुकवून शरणागती पत्करण्यास भाग पाडले, असा हल्लाबोल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानवर केला.

पंतप्रधान मोदी गुरुवारी राजस्थानमधील बिकानेर जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. त्यांनी पाकिस्तान सीमेपासून काही अंतरावर असलेल्या देशनोक येथून देशातील १०३ रेल्वे स्थानकांचे उद्घाटने केले आणि बिकानेर-मुंबई ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला. यासोबतच २६ हजार कोटी रुपयांच्या इतर विकासकामांची पायाभरणी आणि लोकार्पण केले. तत्पूर्वी त्यांनी बिकानेरच्या करणी माता मंदिरात दर्शन घेतले आणि पलाना गावात आयोजित सभेला संबोधित करताना ते म्हणाले, पाकिस्तान कधीही भारताविरुद्ध थेट युद्ध जिंकू शकत नाही. त्यामुळेच दहशतवादाला भारताविरुद्ध एक शस्त्र बनवण्यात आले. प्रत्येक दहशतवादी हल्ल्याची पाकिस्तानच्या लष्कराला आणि त्यांच्या अर्थव्यवस्थेला मोजावी लागेल. यापुढे पाकिस्तानशी केवळ व्याप्त काश्मिर आणि दहशतवादावरच चर्चा होईल. ◀(वृत्तसंस्था)

### देशाची मान झुकू देणार नाही

दहशतवादाचा पोशिंदा पाकिस्तानचा खरा चेहरा संपूर्ण जगाला दाखवला जाईल. आता पाकिस्तानची अणुबॉम्बची धमकीही काम करणार नाही. पाकिस्तानला त्यांच्या हक्काचे पाणी मिळणार नाही. मला या मातीची शपथ आहे, मी देशाची मान मी झुकू देणार नाही, असे मोदी म्हणाले.

### माझ्या धमन्यांमध्ये रक्त नव्हे सिंदूर वाहते

भारत गप्प राहील असे ज्यांना वाटत होते ते आज बिळात लपून बसले. ज्यांना त्यांच्या शस्त्रांचा गर्व होता ते आज ढिगाऱ्यात गाडले गेले. मोदींचे चित्त शांत आहे, ते शांतच राहते, पण मोदींचे रक्त सळसळते आहे. आता मोदींच्या धमन्यांमध्ये रक्त नाही, तर लखलखता सिंदूर वाहत आहे. दहशतवाद नष्ट करण्यासाठी ऑपरेशन सिंदूरने तीन सूत्रे निश्चित केली. पहिले जर भारतावर दहशतवादी हल्ला झाला तर चोख उत्तर दिले जाईल. दुसरे भारत अणुबॉम्बच्या धमक्यांना घाबरणार नाही आणि तिसरे आम्ही दहशतवादाचे सूत्रधार आणि दहशतवादाला आश्रय देणाऱ्यांना वेगळे समजणार नाही.

## विचारपुष्प




हिंदू संघाची तर हिंदू समाजाला एवढे बलवान करण्याची इच्छा आहे की जगात कुणीही या समाजावर आक्रमण करण्यास धजू नये. आपले सामर्थ्य जर अजिंक्य असेल तरच अशी परिस्थिती जगात उत्पन्न होऊ शकेल.

**डॉ. केशव बळीराम हेडगेवार**
रा. स्व. संघाचे आद्य सरसंघचालक

## महत्त्वाचे

### निर्देशांकात ६४४ अंकांची घसरण

**मुंबई** : अमेरिकेतील बॉण्ड उत्पन्नात वाढ आणि त्यांच्या कर्जाच्या वाढत्या ओझ्याबद्दलची चिंता गुरुवारी भारतीय शेअर बाजारात दिसून आली. बाजारात आज चौफेर विक्री राहिली. परिणामी, निर्देशांक आणि निफ्टी घसरले. निर्देशांक ६४४ अंकांनी घसरून ८०,९५१ वर बंद झाला. तर निफ्टी २०३ अंकांनी घसरून २४,६०९ वर बंद झाला. आजच्या ट्रेडिंग सत्रात रिलायन्ससह फायनान्सियल आणि आयटी शेअर्सवर अधिक दबाव राहिला. क्षेत्रीय पातळीवर निफ्टी ऑटो, एफएमसीजी, आयटी, फार्मा, कन्झ्यूमर ड्युराबेल्स आणि ऑईल अँड गॅस निर्देशांक १ ते १.५ टक्क्यांपर्यंत घसरले. निफ्टी बँक आणि निफ्टी फायनान्सियलमध्येही काही प्रमाणात घसरण दिसून आली. बीएसई मिडकॅप ०.३ टक्के घसरला. तर स्मॉलकॅप सपाट पातळीवर स्थिरावला.



# वक्फ सुधारित कायद्यावर सुनावणी पूर्ण

**न्यायालयाने निर्णय राखून ठेवला**

◆ **नवी दिल्ली, २२ मे**

वक्फ (सुधारणा) कायदा, २०२५ च्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी तीन प्रमुख मुद्यांवर अंतरिम आदेश राखून ठेवले. यामध्ये पारंपरिक वापराच्या आधारे किंवा वक्फनामाच्या अंतर्गत न्यायालयांनी वक्फ म्हणून घोषित केलेल्या मालमत्ता डीनोटिफाय करण्याच्या अधिकाराशी संबंधित मुद्याचा समावेश आहे.

सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या न्यायासनाने सुधारित वक्फ कायद्याविरुद्ध याचिकाकर्त्यांचे प्रतिनिधित्व करणारे वरिष्ठ वकील कपिल सिब्बल, राजीव धवन आणि अभिषेक मनु सिंघवी यांचे युक्तिवाद सुमारे तीन दिवस ऐकले आणि त्यानंतर अंतरिम आदेश राखून ठेवला. केंद्र सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सरकारची बाजू मांडली. ◀(वृत्तसंस्था)

# दहशतवादाविरुद्ध लढण्यासाठी जगाने एकत्र यावे : जयस्वाल

◆ **नवी दिल्ली, २२ मे**

आम्ही दहशतवादाविरुद्ध लढण्याचा आमचा संकल्प संपूर्ण जगासमोर पोहोचवत आहोत. दहशतवादाची सर्व रूपे व त्याच्या प्रकटीकरणाशी लढण्यासाठी संपूर्ण जगाने एकत्र यावे अशी आमची इच्छा आहे, असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी गुरुवारी झालेल्या साप्ताहिक पत्रपरिषदेत सांगितले. यावेळी त्यांनी सर्वपक्षीय शिष्टमंडळाच्या प्रस्थानासह इतर मुद्द्यांवर माहिती दिली.



रणधीर जयस्वाल म्हणाले की, सीमेपलीकडून होणाऱ्या दहशतवादासाठी जबाबदार असलेल्यांना जबाबदार धरण्याचे आवाहन आम्ही संपूर्ण जगाला करू इच्छितो. पाकिस्तान गेल्या ४० वर्षांपासून भारताविरुद्ध दहशतवादी कारवाया घडवत आहे. हा पाक पुरस्कृत दहशतवाद उघडकीस आणायला हवा. यासाठीच सात शिष्टमंडळे तयार करण्यात आली आहेत. तीन शिष्टमंडळे रवाना झाली आहेत. हे एक राजकीय मिशन आहे.

**अफगाणिस्तानच्या परराष्ट्रमंत्र्यांनी केला पहलगाम हल्ल्याचा निषेध**

दरम्यान, चीन, पाकिस्तान आणि अफगाणिस्तानच्या परराष्ट्र मंत्र्यांमधील त्रिपक्षीय चर्चेबद्दल रणधीर जयस्वाल म्हणाले की, आम्ही काही अहवाल पाहिले आहेत. यापेक्षा मला आणखी काही सांगायचे नाही. ◀(वृत्तसंस्था)

### कर्नाटकच्या गृहमंत्र्यांशी संबंधित संस्थांवर ईडीचे छापे

**बंगळुरू** : कन्नड अभिनेत्री राण्या राव आणि इतरांविरुद्धच्या सोन्याच्या तस्करीच्या मनी लाँड्रिंग प्रकरणाच्या संदर्भात कर्नाटकचे गृहमंत्री जी. परमेश्वर यांच्याशी संबंधित ठिकाणांवर अंमलबजावणी संचालनालय अर्थात ईडीने गुरुवारी छापे टाकले. हवाला ऑपरेटरना लक्ष्य करून ही कारवाई करण्यात आली. ईडीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, राज्यातील सिद्धार्थ अभियांत्रिकी महाविद्यालय, सिद्धार्थ वैद्यकीय महाविद्यालय आणि सिद्धार्थ महाविद्यालयासह १६ ठिकाणी एकाचवेळी पीएमएलए अर्थात् मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत तपासाचा भाग म्हणून छापे टाकण्यात आले. राव हिच्या खात्यांत करण्यात आलेल्या आर्थिक व्यवहाराची माहिती मिळविण्यासाठी कारवाई करण्यात आली. सोने तस्करीच्या टोळीचा भंडाफोड करण्यासाठी सीबीआय आणि डीआरआय अर्थात् महसूल गुप्तचर संचालनालयकडून आलेल्या तक्रारीची दखल घेत ईडीने काही महिन्यांपूर्वी पीएमएलए अंतर्गत गुन्हा दाखल केला होता.

### पाकिस्तानकडूनही अधिकाऱ्याची हकालपट्टी

**इस्लामाबाद** : दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील एका कर्मचाऱ्याची हेरगिरीच्या आरोपाखाली भारताने बुधवारी हकालपट्टी केली होती. याला प्रत्युत्तर म्हणून गुरुवारी पाकिस्तानने इस्लामाबाद येथील भारतीय उच्चायुक्तालयातील कर्मचाऱ्याला २४ तासांच्या आत देश सोडण्यास सांगितले आहे. या कारवायांमुळे भारत आणि पाकिस्तानमधील द्विपक्षीय तणाव पुन्हा वाढला. १० मे रोजी दोन्ही देशांनी शस्त्रसंधीची घोषणा केली होती.

# वीज पडून २ माणसांसह ५७ जनावरे दगावली

**● मे महिन्यात सोलापूर जिल्ह्यात ८० च्यावर घरांची पडझड; पिकांचेही नुकसान**

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २२ मे-**

सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या बहुतांश भागात गेल्या आठवड्यापासून मान्सुनपूर्व पावसाने अक्षरशः झोडपून काढले असून, सोलापूर शहरातील गटारी, रस्त्यांना अक्षरशः ओढ्याचे स्वरूप आल्याचे दिसून येत होते. रोज सायंकाळी ५ च्या सुमारास सुरू झालेला पाऊस रात्री उशिरापर्यंत पडायचा आणि यामुळे शहरातील वाहनधारकांची आणि चाकरमान्यांचे बेहाल झाले. इतकेच नाहीतर जिल्ह्यातही काही भागात पडलेल्या पावसाने ओढे-नाले भरून वाहत होते. दरम्यान, दि. १ मे ते आजतागायत पडलेल्या विजांमुळे जिल्ह्यात २ माणसांसह ५७ जनावरे दगावली तर ८० च्यावर घरांची पडझड झाल्याची माहिती जिल्हा आपत्ती विभागाकडून मिळाली.

मिळालेल्या माहितीनुसार मे महिन्यात पडलेल्या विजांमध्ये दि. ६ मे २०२५ रोजी माळशिरस तालुक्यातील नातेपुते येथील करिश्मा विकास तांबवे (वय ३२) या महिला मयत पावल्या तर दि. १९ मे रोजी माढा तालुक्यातील अंजनगाव (खे) येथील बाळासाहेब माणिक पाटील (वय ४७) हे मयत झाले. तर जिल्ह्यातील विविध तालुक्यात लहान १४ जनावरे आणि ४३ मोठी जनावरे दगावली आहेत. याचबरोबर जवळपास ८० घरांचे नुकसान झाले आहे. तर अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचेही वादळी वारे आणि पावसाने काही प्रमाणात नुकसान झाले आहे. तलाठ्यांकडून पंचनामे सुरू असून, त्याचा अहवालही लवकरच जिल्हा प्रशासनाकडे तयार होणार आहे.

सध्या या निब्बर पडलेल्या पावसामुळे रोहिण्यात पेरायचे की मृग नक्षत्रात या द्विधावस्थेत शेतकरी आहेत. काहीजण पेरणीच्या नादात असून, बि-बियाणांचीही जमवाजमव करीत आहेत. बुधवारी सोलापूर शहरात पडलेल्या तुफानी पावसामध्ये सोलापूर शहर हद्दवाढ, बसस्थानक परिसर, आसरा परिसर, नवीपेठ, मधला मारूती, कौतम चौक, दाजी पेठ, सातरस्ता, गांधीनगर आदी भागातून नदी-नाल्याप्रमाणे जोरात पाणी वाहत होते. सखल भागात असलेल्या अनेक घरातही आज पाणी साचल्याचे दिसून आले. यामुळे अनेक नागरिकांसह महिला भगिनींचे हाल झाले. भवानी पेठ, घोंगडे वस्ती भागातील काही घरात पाणी शिरल्याचे दिसून आले. दरम्यान, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूरसह इतरही काही तालुक्यात पावसाने जोरदार बॅटिंग केल्याचे आमच्या वार्ताहरांनी कळविले.

महाराष्ट्रातील बहुतांश भागाला मान्सूनपूर्व पावसाने अक्षरक्षः झोडपून काढले आहे. तर काल, मंगळवारी संध्याकाळपासून मुंबई, पुण्यासह राज्यातील अनेक ठिकाणी विजांच्या गडगडाटासह पाऊस झाला. तर पुण्यातील काही रस्त्यांना अगदी नदीचं स्वरुप आल्याचं दिसून आलं. अचानक आलेल्या आणि सोलापुरातही काही वेळातच या मुसळधार पावसानं सर्वत्र दाणादाण उडवून दिली. या पावसाने शेतकऱ्यांचे नुकसानही केलं आहे. दरम्यान, काल जरी पावसाने दिवसा उघडीत दिली असली तरी सायंकाळी उशिराने कधी पाऊस पडेल हे सांगता येत नसल्याची भीतीही काही जाणकार नागरिकांनी व्यक्त केली.



**● राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना**

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ च्या कलम १४ नुसार राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात येते व राष्ट्रीय, राज्य व जिल्हा पातळीवर विविध कृती कार्यक्रम हाती घेण्यात आलेले आहेत. जिल्हा, तालुका, गांव, पातळीवर समित्यांचे गठन करणे, आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडे तयार करणे. जिल्हा, तालुका, गांव पातळीवर प्रथमोपचार शोध व बचाव पथकामची निर्मिती करुन त्यांना प्रशिक्षणाच्या द्वारे सक्षम करणे शालेय सुरक्षितता शालेय कृती आराखडे तयार करणे. वास्तूविशारद, अभियंते, शिक्षक, स्थानिक स्वराज्य संस्थाचे प्रतिनिधी, गवंडी, सामाजिक संस्था प्रतिनिधी यांना प्रशिक्षण देणे. जिल्हा, तालुका, गांव पातळीवर रंगीत तालमीचे आयोजन करणे, विविध खात्यामध्ये समन्वय साधणे, विभागांतर्गत आपत्तीच्या वेळी प्रत्यक्ष काय तयारी आहे हे पडताळणीही केली जाते.

**● आपत्तीच्या तीनही टप्प्यातील दिले जाते मार्गदर्शन**

गेल्या १० वर्षापासून देशात आपत्तीचे प्रमाण वाढत असून, प्रति वर्षी विविध नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींमुळे मोठा प्रमाणात जिवित व वित्त हानी होत आहे. यावर मात करण्यासाठी राज्यातील विविध भागांतील लोकांना आपत्तीबाबत प्रशिक्षित करणे, आपत्तीपासून बचावाच्या योजना तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे. साधारण भाषेत सांगावयाचे झाल्यास असे की, आपत्तीच्या तिनही टप्प्यांत (आपत्तीपूर्व, आपत्ती दरम्यान आणि आपत्तीनंतर) राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मदत व मार्गदर्शन देण्यात येत असल्याची माहिती मिळाली.

दातांचे दुखणे..??
विठोबा®
आयुर्वेदिक दंत मंजन
मंजन केल्यानंतर
5 मिनिटांपर्यंत ठेवा
आणि अद्भुत परिणाम पहा




हो मला फायदा झाला...
मी जेव्हा गरम चहा प्यायचो तेव्हा दातांना सेन्सिटिव्हिटी जाणवायची. दातांवर पिवळेपणा ही आला होता. तेव्हा माझ्या मित्राने विठोबा दंतमंजन वापरण्याचा सल्ला दिला. विठोबाचा वापर करून दात स्वच्छ पांढरे तर झालेच सोबत संवेदनशीलतेची समस्याही दूर झाली. या घटनेला १० वर्ष झाले तेव्हापासून मी नियमित विठोबा आयुर्वेदिक दंत मंजन वापरतो. आता मला दातांचा कुठलाही त्रास नाही.
प्रकाश पाठक वय -७५ , (ब्रम्हपुरी) चंद्रपूर
Siddhesh
खरेदी करण्यासाठी स्कॅन करा
For Enquiries call: 9260100600
website: www.vithoba.co.in
available at
vithobahealthcare

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...

## कर्जवाटपाच्या नावाखाली गंडा घालणाऱ्यांवर कठोर कारवाई करा

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ मे-**



**अण्णासाहेब पाटील महामंडळाचे अध्यक्षाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी**

कै. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या कर्जवाटप योजनेच्या नावाखाली व्याज परताव्यासाठी लागणारे प्रमाणपत्र (एलओआय) देण्याचे आमिष दाखवून लाभार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या भामट्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे करणार असल्याची माहिती महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी गुरुवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये ते म्हणाले, या कर्जवाटप योजनेच्या नावाखाली लाभार्थ्यांकडून पैसे उकळणाऱ्या केंद्र सरकारच्या सीएससी केंद्रांचे परवाने जिल्हाधिकाऱ्यांनी रद्द करावेत, या पद्धतीने झालेल्या फसवणुकीचे काही प्रकार निदर्शनास आल्यानंतर आपण स्वत: कराड येथे तक्रार दाखल केली आहे. कै. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या कर्ज वाटप योजनेद्वारे गरीब, गरजू मराठा समाजातील युवा वर्गाला उद्योग उभारण्यासाठी बँकांच्या माध्यमातून कर्जपुरवठा केला जातो. कर्जावर महामंडळाच्या माध्यमातून व्याज परतावा देण्यात येतो. महामंडळाच्या सर्व योजना ऑनलाइन आहेत. आत्तापर्यंत १ लाख ३८ हजार लाभार्थ्यांनी महामंडळाच्या या योजनेचा लाभ घेऊन स्वत:चा व्यवसाय सुरू केला आहे. ११ हजार कोटींचे कर्जवाटप झाले असून एक हजार कोटींपेक्षा अधिक व्याज परतावा महामंडळाकडून लाभार्थ्यांना देण्यात आला आहे. योजनेची व्याप्ती वाढली तशी लाभार्थ्यांची फसवणूक करणारी मंडळी सक्रीय झाली आहे. गरजूंची फसवणूक होण्याची शक्यता असल्याने सर्वांनी सावध रहावे, असे आवाहन त्यांनी केले.



## इच्छा शक्ती असली की सर्व काही शक्य होत : युवा उद्योजक रोहन देशमुख

**सोलापूर, दि. २२ मे-**

आजच्या तरुण पिढीने देशाला सक्षम बनवण्यासाठी कृतिशील राहणं गरजेचं आहे.स्वतःमध्ये आत्मविश्वास व इच्छा शक्ती असली की सर्व काही शक्य होऊ शकत.आपण ज्या क्षेत्रात काम करतो मग भले ते क्षेत्र कोणतंही असो तिथे भ्रष्टाचार न करता प्रामाणिकपणे काम करत राहिल तर ती सुद्धा एक देश सेवाच आहे असे मत युवा उद्योजक रोहन देशमुख यांना यावेळी व्यक्त केले. प्रार्थना फाऊंडेशन व सेवादाई सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून मोरवंची येथे कृतिशील तरुणाई शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिराच्या समारोप कार्यक्रम प्रसंगी ते तरुणांशी संवाद सादत होते. युवकांनी नोकरीच्या मागे न धावता उद्योग क्षेत्रात येन गरजेचं आहे.उद्योग क्षेत्रात खूप संधी उपलब्ध आहेत. आपण स्वतः उद्योजक बनून इतरांना ही कामाची संधी उपलब्ध करून देऊ शकतो असे मत अमित जैन यांनी यावेळी व्यक्त केले. मोरवंची येथे पार पडलेल्या तिसऱ्या कृतिशील तरुणाई शिबिरात राज्यभरातून तरुण सहभागी झाले होते.या तरुणाईला आर्थिक,सामाजिक,मानसिक, बौद्धिक दृष्टीने कृतिशील व सक्षम बनवण्यासाठी विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले.या वेळी शिबिरार्थ्यांनी आपले शिबिरातील अनुभव ही व्यक्त केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिबिरार्थींचा सन्मान करण्यात आला. कृतिशील तरूणाई सबिराच्या समारोप प्रसंगी अमित जैन, सूर्यभान धोत्रे, प्रमोद मेरड, अभिनंदन गायकवाड महाराज,मनीषा सरवळे, विष्णू भोसले, साहिल तुपे तर प्रार्थना फाऊंडेशनचे अनु मोहिते, शुभम मिसाळ, पांडुरंग तुपसमुद्रे, इरफान मुलानी, गणेश डुरे आदी मान्यवर उपस्थित होते



## सांगोला तालुक्यात पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती अभियान

**सांगोला, दि.२२ मे-**

पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची रासायनिक व जैविक पाणी गुणवत्ता तपासणी करण्यासाठी तालुकास्तरीय मोहिमेचा शुभारंभ पंचायत समिती, सांगोला येथे गटविकास अधिकारी वसंत फुले यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बाल विकास प्रकल्प अधिकारी अभिजीत मोलाने, आरोग्य विस्तार अधिकारी मिलिंद सावंत, पंचायत विस्तार अधिकारी देवराज पुकळे, शिक्षण विस्तार अधिकारी लक्ष्मीकांत कुमठेकर, पाणी गुणवत्ता सल्लागार सागर कोळेकर, बीआरसी अनिकेत जगताप, सीआरसी सावित्री गायकवाड, सर्व प्रार्थमिक केंद्रातील आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक व अंगणवाडी सुपरवायझर उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे संकल्पनेतून प्रत्येक तालुक्यात ही मोहीम राबविण्यात येत आहे. सांगोला तालुक्यामध्ये १०२ गावांमध्ये एफटीकेद्वारे पाणी गुणवत्ता मोहीम १९ मे ते १५ जून अखेर राबविण्यात येणार आहे. तालुक्यात एकूण ४८२ शाळा, ४७१ अंगणवाडी, १०२ हाऊसहोल्ड, ४७७ पीडब्ल्यूएस इतके स्त्रोत असून वरील कालावधीमध्ये ग्रामपंचायत अधिकारी, जलसुरक्षक, गावातील पाच महिला, आरोग्य सेविक यांचे मार्फत एफटीके किटद्वारे पाणी नमुने तपासणी करून डब्लूक्यू एमआयएस पोर्टलवर नोंदणी करण्यात येणार आहे. या मोहिमेमध्ये सर्व शासकीय यंत्रणा सहभाग घेऊन पाणी गुणवत्ता तपासणी मोहीमेची व्यापक जनजागृती करावी असे आवाहन मिलिंद सावंत यांनी केले आहे.

# पालखी मार्ग, तळांवर पालखी सोहळा प्रमुखांनी सुचविलेली कामे प्राधान्याने करावीत

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची सूचना : पालखी मार्ग; तळांवर पाण्याच्या ट्रँकरची, स्नानगृहाची संख्या वाढवावी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २२ मे-**

आषाढी शुद्ध एकादशी सोहळा ६ जुलै रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे ३० जून तर जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचे ०१ जुलै २०२५ रोजी सोलापूर जिल्ह्यात आगमन होणार आहे. पालखी सोहळ्याच्या प्रथा परंपरेचे जतन करण्यासाठी पालखी सोहळा प्रमुखांनी सुचविलेल्या पालखी मार्ग, पालखी तळ व रिंगण सोहळ्याच्या ठिकाणची कामे प्राधान्याने करावीत. तसेच पालखी सोहळ्या बरोबर येणाऱ्या वारकरी भाविकांना कोणतीही अडचण



येणार नाही याची दक्षता घ्यावी अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या

आषाढी यात्रेच्या पुर्वतयारीबाबत श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्त निवास, पंढरपूर येथे व्हीसीव्दारे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अतिरिक्त मुख्याधिकारी संदिप कोहिनकर, मुख्याधिकारी प्रशांत जाधव व्हीसीव्दारे उपस्थित होते. तसेच प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, पोलीस निरिक्षक विश्वजीत घोडके, उप अभियंता भीमाशंकर मेटकरी, मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री, उपमुख्याधिकारी सुनिल वाळुजकर आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले, जिल्ह्यातील सर्वच पालखी तळावर कोठेही पाणी साठणार याची दक्षता घेवून, मुरमीकरण करुन घ्यावे. पालखी मार्ग, तसेच पालखी मुक्कामाच्या ठिकाणी मुबलक पाण्याची व्यवस्था करावी यासाठी टँकरची संख्या वाढवावी. पालखी सोहळ्यासह येणाऱ्या भाविकांना आवश्यक सुरक्षा देण्यात यावी. तसेच मार्गावर वाहतुकीची समस्या निर्माण होणार नाही याबाबत नियोजन करावे. वाखरी येथे सर्वच पालखी सोहळे एकत्र येत असतात. याठिकाणी वाहतुकीची समस्या निर्माण होऊ नये तसेच वाखरी पालखी तळावरुन पंढरपूरकडे दिंड्या लवकर निघण्यासाठी सोहळा प्रमुखांशी पोलीस प्रशासनाने चर्चा करुन नियोजन करावे. पालखी मार्ग व तळांवर स्नानगृहाची व शौचालयाची संख्या वाढवावी. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पालखी मार्गावरील अपुर्ण कामे तातडीने पुर्ण करावीत अशा सूचनाही जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी यावेळी दिल्या

## नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार द्विलक्षी अभ्यासक्रमात होणार बदल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ मे-**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून राज्यात नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू होणार असून, इयत्ता १ ली पासून टप्या टप्याने अभ्यासक्रम बदलत जाणार आहे. याच अनुषंगाने प्रचलित १२ वी द्विलक्षी अभ्यासक्रम बदलून नॅशनल स्किल क्वालिफिकेशन फ्रेमवर्क - ही एक राष्ट्रीय स्तरावरची कौशल्य व ज्ञान आधारीत प्रणाली तयार करण्यात आली.

यामध्ये विविध चार पातळ्यांवर (इ. ९ वी ते १२ वी पर्यंत अनुक्रमे लेव्हल १ ते लेव्हल ४) पात्रता ठरते. या प्रणाली अंतर्गत विविध सेक्टरमधील आवश्यक स्किल नुसार जॉब रोल बनविण्यात आलेला आहे. या जॉबरोलचा अभ्यासक्रम बनविताना देशांतर्गत औद्योगिक मनुष्यबळाची गरज तसेच जागतिक स्तरावरील कुशल मनुष्यबळाची गरज लक्षात घेतलेली आहे. यामुळे राष्ट्रीय स्तरावर समान कौशल्य प्राप्त असलेले कुशल मनुष्यबळ तयार होईल. यातून औद्योगिक गरजेनुसार उपलब्ध कौशल्य प्राप्त सुशिक्षित व पात्र तरुणांना मोठ्या प्रमाणात संधी निर्माण होतील. अभियांत्रिकी मधुन करीअर करण्याची इच्छाअसणाऱ्या विद्यार्थ्यांना द्विलक्षी अभ्यासक्रमांतर्गत सुरू होणारे नवीन जॉब रोलवर आधारीत अभ्याक्रम आपल्या आवडीनुसार व संस्थेतील उपलब्धतेनुसार निवडता येतात. यामुळे त्यांना भविष्यात देशांतर्गत तसेच विदेशात अनेक नोकरीच्या संधी उपलब्ध असतील. अशा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन तसेच मार्गदर्शन करण्यासाठी कौशल्य विभागांतर्गत स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच अनेक देशांशी कुशल मनुष्यबळ पुरवठा करण्यासंबंधी सामंजस्य करार सुध्दा झालेले आहेत.

महाराष्ट्र राज्य तांत्रिक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय (नॉर्थकोट) ही शहरातील मध्यवर्ती, सुसज्ज व ब्रिटिश काळापासून तांत्रिक शिक्षण देणारी शहरातील एकमेव शासकीय संस्था आहे. या प्रशालेत ९ वी १० वी तांत्रिक तसेच ११ वी १२ वी (द्विलक्षी अभ्यासक्रम) या विषयाचे प्रशिक्षण दिले जाते. नविन शैक्षणिक धोरणानुसार जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाचा लाभ मिळावा या उद्देशाने या प्रशालेचे पुर्णवेळ शाळेतून केंद्रशाळेत रुपांतरण करण्यात आलेल आहे. यामुळे शहरातील शाळा तसेच कनिष्ठ महाविद्यालयांना अनुक्रमे . इ. ९ वी व इ.११ वी च्या इच्छुक विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाचा लाभ मिळवून देण्याकरीता या प्रशालेसोबत संलग्नता मिळविता येते. संलग्नता मिळविण्या करीता कसलेही प्रकारचे शुल्क आकारले आत नाही. इ. ९वी व १० वी च्या विद्यार्थ्यांना हिंदी अथवा समाजशास्त्र या विषयास पर्याय म्हणून एक तांत्रिक विषय निवडता येतो. तसेच द्विलक्षी अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इंग्रजी, भौतिक, रसायनशास्त्र व गणित या विषयासोबत दोन तांत्रिक विषय (जॉबरोल) निवडता येतात. सदरचे तांत्रिक विषय शिकविण्याची संपुर्ण जबाबदारी (सैध्दांतिक व प्रात्यक्षिक) ही या प्रशालेवर असून, सहभागी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना शिक्षक किंवा कार्यशाळा करणेची कसलीही आवश्यकता नाही. विद्यार्थ्यांना ठराविक दिवशी या शाळेत उपस्थित राहून प्रशिक्षण घेता येते. तांत्रिक विषयासोबत इ.१० वी किंवा १२ वी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणात अनेक सवलती व संधी प्राप्त होतात. तांत्रिक विषयातून इ.९वी / ११ वी प्रवेश घेण्याकरीता खालील सहभागी शाळा व महाविद्यालयांना संपर्क करावा, असे आवाहन मुख्याध्यापक,महाराष्ट्रराज्य तांत्रिक प्रशाला तथा औद्योगिक शाळा सोलापूरचे मुख्याध्यापक अमर जाधव (मो. ९०२८९५२५९५) यांनी केले आहे. संपर्क : शिंदे बी एम. (मो.९४२३५७७७६४) बोनाकृती आर. एस. (मो.८४४६१६६८९७)

### सहभागी शाळा व महाविद्यालये अशी

छत्रपती शिवाजी प्रशाला मुरारजी पेठ, बालभारती माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, कुमठा नाका, सकुबाई हिराचंद नेमचंद प्रशाला गणपती घाट, बालभारती कनिष्ठ महाविद्यालय कुमठा नाका, कै. सौ. अलकनंदा जोशी ज्युनिअर कॉलेज, जुळे सोलापूर, इंडियन मॉडेल ज्युनिअर कॉलेज, अक्कलकोट.

## अलमट्टी धरण उंचीवाढीला महाराष्ट्र शासनाचा ठाम विरोध

**सोलापूर, दि. २२ मे-**

कर्नाटक सरकारने अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांसाठी विनाशकारी ठरू शकतो. अनेक गावे कायमस्वरूपी पाण्याखाली जाण्याचा धोका आहे. यामुळे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांची भेट घेऊन या निर्णयाच्या विरोधात त्यांना निवेदन दिले. तसेच केंद्र सरकारने यावर कोणताही निर्णय घेऊ नये, अशी स्पष्ट मागणी केली. याप्रसंगी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित होते.

कर्नाटकमधील अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय हा केवळ तांत्रिक नसून, कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांच्या जीवनावर गदा आणणारा आणि त्यांच्या अस्तित्वावरच संकट निर्माण करणारा आहे. अलमट्टीची उंची वाढल्यास हे भाग कायमस्वरूपी पुराच्या विळख्यात सापडू शकतात आणि शेकडो गावे पाण्याखाली जाण्याचा धोका निर्माण होतो. केंद्र सरकारच्या पंचायती राज न्यायाधिकरणाने या उंचीवाढीला हिरवा कंदील दिला असला, तरी प्रत्यक्षात ही वाढ अमलात आणणे अशक्य आहे. कारण हा विषय सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे आणि महाराष्ट्र शासनानेही आपला कडवा विरोध नोंदवलेला आहे. अशा परिस्थितीत कर्नाटक सरकारने कोणतेही निर्णय घेणे अथवा विधाने करणे हे महाराष्ट्रातील जनतेमध्ये भीती निर्माण करणारे आहे. या गंभीर मुद्द्याला गांभीर्याने घेत केंद्रीय मंत्री सी. आर. पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत यावर लवकरच उच्चस्तरीय बैठक बोलावली जाईल, असे आश्वासन दिले आहे.



## आफ्रिकन स्वाईन फ्लूचा भारतात धोका

**शिमला :** स्वाईन फ्लूचे रुग्ण आढळल्यानंतर हिमाचल प्रदेशात डुकरांच्या खरेदी-विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. हा निर्णय राज्याच्या पशुसंवर्धन विभागाने घेतला आहे. फ्लूमुळे अनेक डुकरांचा मृत्यू झाला. तर प्रशासनानेही अनेक डुकरांनाही मारले. राज्य सरकारच्या एका अधिकाऱ्याने बुधवारी या निर्णयाची माहिती दिली. हिमाचल प्रदेशातील बिलासपूरमधील झंडुता उपविभागातील कोलका पंचायतीमध्ये अलिकडेच आफ्रिकन स्वाइन फ्लूच्या संसर्गाचा एक रुग्ण आढळून आला. यानंतर प्रशासनाकडून डुकरांच्या खरेदी- विक्रीवर बंदी घालण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत.

## पनाश इमारतीची चौकशी पूर्ण; अहवाल लवकरच आयुक्तांना सादर

**सोलापूर, दि. २२ मे-**

विजापूर रस्त्यावरील बहुचर्चित सतरा मजली पनाश इमारतीच्या बांधकामाची चौकशी पुर्ण झाली असून याबाबतचा अहवाल लवकरच आयुक्तांकडे सादर करण्यात येणार आहे. या चौकशी अहवालामुळे महापालिका प्रशासनातील अनेक मोठे अधिकारी आयुक्तांच्या रडारवर येणार आहेत.

पनाशच्या बांधकामात अनेक प्रकारची अनियमीतता असल्याची तक्रार भाजपाचे जेष्ठ नेते माजी नगरसेवक प्रभाकर जामगुंडे यांनी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्याकडे केली होती. त्याची दखल घेत आयुक्तांनी या प्रकरणाची चौकशी करण्याचा निर्णय घेतला होता. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी त्यांनी महापालिकेचे उपायुक्त आशीष लोकरे यांची नियुक्ती केली होती. लोकरे यांनी गेल्या दोन महिन्यात या प्रकरणाची चौकशी पुर्ण केली असून सविस्तर अहवालही तयार केला आहे. तक्रारदार असलेले माजी नगरसेवक प्रभाकर जामगुंडे यांना तीनवेळा पाचारण करुन त्यांनी या प्रकरणातले सर्व बारकावे तपासले आहेत.

पनाश इमारतीला ९ मजले बांधण्याची परवानगी देण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात या जागेवर १७ मजली इमारत उभारण्यात आली आहे. बांधकाम क्षेत्रात बदललेल्या कायद्यातील तरतुदींचा लाभ घेताना संबंधित विकासकाने महापालिकेची फसवणूक केली असल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. सतरा मजली इमारत बांधताना नियम आणि कायद्याचा भंग केला गेला आहे. याबाबतची संपूर्ण शहनिशा चौकशी अधिकारी आशिष लोकरे यांनी केली आहे.

पनाश इमारतीला बांधकाम परवाना देताना महापालिकेतील अधिकाऱ्यांनी काही बाबींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे चौकशीत आढळून आले आहे. यापैकी काही अधिकारी सध्या सेवेत नाहीत तर काही जणांची बांधकाम विभागातून यापूर्वीच बदली करण्यात आली आहे. या प्रकरणातल्या एका अधिकाऱ्याने स्वेच्छा निवृत्ती घेतली असून तोच खरा सुत्रधार असल्याची चर्चा महापालिका प्रशासकीय वर्तुळात आहे.

दरम्यान, पनाश इमारतीच्या बांधकामाची चौकशी सुरु असल्यामुळे या इमारतीतील वरच्या मजल्यांना महापालिकेने वापर परवाना देण्यास नकार दिला आहे. या इमारतीतील काही फ्लँटधारकांनी रजीस्टर नोंदणी केली असली तर काहींना फक्त नोटरीवरच फ्लँटचा ताबा देण्यात आला आहे. वापर परवाना नसताना काही जणानी फ्लँटचा ताबा घेऊन संसार थाटला आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेचे उपायुक्त आशीष लोकरे यांनी पनाश इमारतीच्या बांधकामाची संपूर्ण चौकशी केली आहे. विकासकाने महापालिकेतील काही अधिकाऱ्यांना हाताशी धरुन केलेल्या चुका या चौकशीत उघड झाल्या आहेत. त्यामुळे प्रशासनातील बडे अधिकारी अडचणीत आले आहेत. शहरातील ९६ बेकायदा इमारतींचा विषय ऐकणीवर आलेला असताना पनाश या सतरा मजली इमारतीच्या बेकायदा बांधकामाची भर पडली आहे. ज्या इमारती नियमित करता येणे शक्य नाही त्या पाडाव्या लागतील असे आयुक्तांनी यापूर्वी सांगितले आहे. पनाश इमारतीमधील वरचे आठ मजल्याबाबत आयुक्त कोणता निर्णय घेणार आणि या इमारतीला नियम धाब्यावर बसवून परवाने दिलेल्या महापालिका अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार हे लवकरच स्पष्ट होईल.

# महापालिकेच्या जयभवानी प्रशालेला अस्वच्छतेचा विळखा

### ज्ञान मंदिराच्या परिसरात सुटली दुर्गंधी

### मैदानावर सर्वत्र कचरा साचल्याचे विदारक चित्र

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. २२ मे-**





विद्याधन दे आम्हास, एक छंद एक ध्यास... सत्यम शिवम सुंदरा, ज्ञानमंदिरा.. अशा प्रकारे शाळा परिसर हा सुंदर आणि पवित्र मानला जातो मात्र महापालिकेच्या जय भवानी प्रशालेला अस्वच्छतेचा विळखा झाला आहे. ज्ञान मंदिराच्या परिसरात दुर्गंधी सुटली आहे. प्रवेशद्वारासह मैदान परिसरात सर्वत्र कचरा साचल्याचे विदारक चित्र दिसून येत आहे.

सोलापूर शहरातील भवानी पेठ येथे महापालिकेची जयभवानी प्रशाला आहे. १९७० पासून ही प्रशाला येथे ज्ञानदानाचे कार्य करत आहे. इयत्ता दहावी पर्यंत या ठिकाणी शिक्षण दिले जाते. या प्रशालेचा मुख्य मार्ग कचऱ्यातून जातो. प्रवेशद्वारातच कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे. प्रशालेच्या समोर मैदान असले तरी समोरील तीनही बाजूला सर्वत्र कचरा पसरला आहे. आजोरा टाकण्यात आला आहे. पावसाचे पाणी साचल्याने मोठ्या प्रमाणात चिखल निर्माण झाला आहे.

या प्रशालेचा समोर तीन बाजूला असलेले कंपाऊंड विविध ठिकाणी पडले आहे. काही लोक या आवारातम येऊन लघु शंका करतात. तर काहीजण मुख्य प्रवेशदराच्या दोन्ही बाजूला आहेत. अशा प्रवेशद्वारातूनच विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, पालकांना आत यावे लागते. महिला शिक्षिका व कर्मचाऱ्यांना अशा परिस्थितीत ये - जा करावे लागते. येथील स्टेडियम जागेची दुरावस्था झाली आहे. फरशा फुटल्या आहेत. येथील स्वच्छता राखण्यासाठी पडलेले कंपाउंड बांधण्याची गरज आहे. त्याचबरोबर मुख्य प्रवेशद्वार व्यवस्थित करण्यात यावे. लघुशंका करणाऱ्यांवर तसेच कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईची आवश्यकता आहे. महापालिका शिक्षण मंडळ आणि महापालिका प्रशासनाने तातडीने या कडे लक्ष देऊन कार्यवाही करण्याची मागणी होत आहे.

### असे आहे विदारक चित्र

- प्रशालेचा मुख्य मार्ग कचऱ्यातून जातो
- प्रशालेच्या मैदानावर मोठ्या प्रमाणात कचरा
- विविध ठिकाणी कंपाउंड पडलेले
- उघड्यावर केली जाते लघुशंका
- पावसामुळे परिसरात चिखल
- रिकामटेकड्या लोकांचा मुक्त वावर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महाराष्ट्रात पुढील दोन दिवस जोरदार पाऊस

**मुंबई, दि. २२ मे-**

महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाने २५ मे पर्यंत यलो आणि ऑरेंज अलर्ट जारी केले आहेत.

हवामान विभागाने लोकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करत रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा या जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. याशिवाय, २५ मे पर्यंत मासेमारांना समुद्रात न जाण्याचा इशारा देण्यात आला आहे. मुंबई आणि कोकणासह राज्यभरात २४ मे पर्यंत जोरदार पावसाची तसेच ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहण्याचीही शक्यताही आहे. हवामान विभागाने याबाबत अंदाज वर्तवला आहे. काही भागात अतिमुसळधार ते मुसळधार पावसाचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे. तर काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह १०० मिमीहून अधिक पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. तळकोकणात सलग तिसऱ्या दिवशीही मान्सूनपूर्व पावसाने झोडपले. जिल्ह्यात २३ मे पर्यंत मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान, हवामान खात्याने बुधवार आणि गुरुवारी महानगरात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.


# दुश्मनीसे दोस्ती अच्छी; अक्कलकोटच्या राजकारणात ट्विस्ट

## ● माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे सोडणार काँग्रेसचा हात

## कमळाबरोबर मैत्रीसाठी घेणार हातात धनुष्य

**तभा वृत्तसेवा । प्रशांत माने**
**सोलापूर, दि. २२ मे-**

अक्कलकोट तालुक्यातून काँग्रेसच्या तिकिटावर चारवेळा आमदारकी तर एकदा गृह राज्यमंत्रीपद भूषविलेले काँग्रेसचे कट्टर नेते सिध्दाराम म्हेत्रे यांनी हाताची साथ सोडत एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे धनुष्यबाण हातात घेत असल्याची घोषणा करून काँग्रेसला जोर का झटका धिरेसे दिला आहे. तालुक्यात कमळाच्या आमदाराकडून कार्यकर्त्यांना होणारा त्रास थांबविणे तसेच आपल्या राजकीय पुनर्वसनाचे ध्येय ठेवत, पण कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव आपण शिवसेनेत जात असल्याचे सांगताना म्हेत्रे यांनी काँग्रेसवर काहीही रोष नाही, काँग्रेसने आपल्याला आजपर्यंत भरभरून दिले पण आता भाजपाकडून आ. कल्याणशेट्टींना जसे अधिकार दिलेत तसे आपल्याला त्या काळी मिळाले नसल्याची खंत बोलून दाखविण्यास ते विसरले नाहीत. महायुतीत जात सिध्दाराम म्हेत्रे यांनी 'दुश्मनीसे दोस्ती अच्छी' असे म्हणत आ. कल्याणशेट्टी यांच्यासमोर हात पुढे केला आहे. त्यांना कल्याणशेट्टी टाळी देणार का हे देखील पहावे लागणार आहे.



२०१४ साली देशात आलेल्या मोदी नावाच्या त्सुनामीनंतर काँग्रेसला लागलेली घरघर थांबता थांबत नसल्याचे चित्र आहे. काँग्रेसच्या जीवावर अनेक सत्तापदे उपभोगलेल्या अनेक बड्या नेत्यांनी काँग्रेसला हात दाखवल्याची अनेक उदाहरणे आहेत. मागील दहा वर्षात केंद्रात काँग्रेसची सत्ता नाही तर अडीच वर्षांचा अपवाद वगळता राज्यातही काँग्रेसची सत्ता नाही. वर्षेनुवर्षे सत्तेत राहण्याची सवय लागल्यामुळे विरोधकांची भूमिका बजावण्यात काँग्रेसवाल्यांना अवघडल्यासारखे होते. सिध्दाराम म्हेत्रे यांच्यानंतर आता काँग्रेसचे माजी आमदार तथा सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीप माने आणि काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे हे कोणती राजकीय भूमिका घेणार याबाबतची चर्चा काँग्रेसमधूनच रंगली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट हा तालुका कर्नाटक सीमेलगत असून या तालुक्याचे राजकारण देखील वेगळ्याच वळणावर असते. तालुक्याचा शहरी भाग भाजपाला तर ग्रामीण भाग कांग्रेसच्या मागे असल्याचे अनेक निवडणुकांमध्ये दिसून आले. काँग्रेसच्या विचाराचा तालुका असला तरी माजी आमदार स्व. बाबासाहेब तानवडे, पंचप्पा कल्याणशेट्टी आदींच्या प्रयत्नांमुळे आता अनेक वर्षांपासून भाजपाने देखील येथे राजकीय मुसंडी मारत तालुक्यावर सलग कमळ फुलविण्यात यश मिळवले आहे. इतकेच काय तर अक्कलकोटचे भाजपा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे सध्या जिल्ह्याचे नेतृत्व करण्याची संधी असल्याचे जाणवते आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीतच चित्र होणार स्पष्ट**

येत्या काही महिन्यात महापालिका, जिल्हा परिषद, नगर परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका होत आहेत. या निवडणुकांमध्ये भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी एकत्र लढतील असे संकेत सध्या तरी पक्षाचे नेतेमंडळी देत आहेत. त्यामुळे येत्या निवडणुकांमध्ये आ. सचिन कल्याणशेट्टी आणि माजी आमदार सिध्दाराम म्हेत्रे यांचे राजकीय सूर जुळणार का स्पष्ट होणार आहे. तालुक्यातील जि.प. गट, नगरपरिषदा, पंचायत समिती, ग्रामपंचायती निवडणुकीत हातात धनुष्यबाण घेवून सिध्दाराम म्हेत्रे कार्यकर्त्यांना सत्तेत वाटा मिळवून देण्यात यशस्वी होतात का या बाबतचीदेखील सर्वांना उत्सुकता आहे. सिध्दाराम म्हेत्रेंनी काँग्रेस सोडल्यानंतर मात्र काँग्रेसच्या नेत्यांनी कोणतीही खंत व्यक्त केलेली नाही.

काँग्रेसचे माजी आमदार सिध्दाराम म्हेत्रे आणि भाजपाचे माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांच्याभोवती अक्कलकोटचे राजकारण फिरत होते. परंतु सलग दोन वेळा आमदारकी पटकावलेले युवानेते आ. कल्याणशेट्टी यांनी सचिन तेंडूलकरसारखी बॅटिंग करत जिल्ह्यात भाजपाचे नेतृत्व करत बाजार समितीवर भाजपाचा उपसभापती बसवला. काँग्रेसच्या शिलेदारांना सोबत घेत कल्याणशेट्टी यांनी राजकीय समिकरणे बदलण्यास सुरुवात केली. कुरघोड्यांच्या राजकारणात माहिर असलेल्या कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोट तालुक्यावर आपले वर्चस्व मिळवत चांगलाच राजकीय जम बसविल्याचे दिसून येते. माजी मंत्री म्हेत्रे यांच्या वर्चस्वाला धक्का देत आ. कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोटवर मजबूत पकड मिळवली. सलग दोनवेळा विधानसभेला पराभव झाल्यानंतर आणि सहकारी संस्था अडचणीत आल्यामुळे बॅकफूटला गेलेले म्हेत्रे यांनी काँग्रेसवरची नाराजी स्पष्ट बोलून दाखवली नसली तरी पक्षातील महत्व कमी होत असल्याचे जाणून राजकीय पुनर्वसनासाठी चाचपणी सुरु केली होती. मागोवा पाहता गत विधानसभा निवडणुकीत म्हेत्रे यांनी कमळ हातात घेण्यासाठी प्रयत्न केल्याची चर्चा रंगली होती. परंतु कल्याणशेट्टी यांनी उमेदवारी खेचून आणण्यात यश मिळवले आणि आमदारही झाले. काँग्रेस सोडून एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत जाण्याचा कार्यकर्त्यांचा आग्रह होता आणि आपण कार्यकर्त्यांसाठी काहीही करू शकतो, असे सांगत म्हेत्रे यांनी शिंदेसेनेचा धनुष्यबाण हाती घेण्याचे निश्चित केले आहे.



काँग्रेस सोडून शिवसेनेत जाणाऱ्या म्हेत्रे यांनी सांगितले की, तालुक्यात कार्यकर्त्यांवर अन्याय वाढत होता आणि विद्यमान आमदारांबरोबरचा संघर्ष थांबवून कार्यकर्त्यांना न्याय देण्यासाठी आपण हा निर्णय घेत आहोत. महायुतीत जावून देखील कार्यकर्त्यांना होणारा त्रास थांबला नाही तर मात्र पुन्हा संघर्ष अटळ असल्याचाही इशारा देण्यास म्हेत्रे विसरले नाहीत.

कार्यकर्त्यांसाठी हा एक प्रयोग करून बघू असे सांगत म्हेत्रे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास दर्शवला आहे. येत्या ३१ मे रोजी एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत म्हेत्रे यांचा शिवसेनेत प्रवेश होत आहे. म्हेत्रेंच्या नव्या इनिंगमुळे त्यांच्यासह त्यांच्या कार्यकर्त्यांना राजकीय बळ मिळते का? आणि महायुतीमध्ये प्रवेश केल्यानंतर तरी आ. कल्याणशेट्टी यांच्याशी त्यांचे सूर जुळणार का हे पाहणे आत्सुक्याचे ठरणार आहे.

# ११ वी प्रवेशाची वेबसाईट ४ दिवस बंदच राहणार, २६ मे पासून सुरू

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २२ मे-**

राज्यातील उच्च माध्यमिक बोर्डाकडून ११ वीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचा गोंधळ संपता संपेना झालाय. शिक्षण संचालनालयाकडून अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी आता नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार, अकरावीच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश २६ मे पासून सुरू होणार असून पहिली फेरी प्रत्यक्षात तेव्हाच सुरू होईल. त्यामुळे, गेल्या २ दिवसांपासून ऑनलाईन प्रवेशासाठी धडपड करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणखी ४ दिवस थांबावे लागणार आहे.

२१ मे रोजी बुधवारी प्रत्यक्षात सुरू होणारी ऑनलाइन अकरावी प्रवेशाची प्रक्रिया वेबसाईट मधील तांत्रिक अडचणीमुळे सुरू होऊ शकली नाही. त्यानंतर, आता महाराष्ट्र शिक्षण महामंडळाकडून २६ मे ही नवी तारीख देण्यात आली असून २६ मे ते ३ जूनपर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश घेता येईल. राज्य शिक्षण महामंडळाने दिलेल्या नव्या वेळापत्रकानुसार, २६ मे ते ३ जूनपर्यंत म्हणजे ९ दिवस ११ वी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू राहणार आहे. त्यानंतर, ५ जून रोजी पहिली जनरल मेरीट लिस्ट लागणार आहे. ६ ते ७ तारखेपर्यंत विद्यार्थ्यांना आपल्या हरकती नोंदवून तक्रार करता येईल. त्यानंतर, ८ जून रोजी अंतिम जनरल मेरीट लिस्ट जाहीर होईल.

**तांत्रिक अडचणींनी विद्यार्थी त्रस्त**

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या वेबसाईट मध्ये तांत्रिक अडचणी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात अडचणी येत आहेत. अकरावी प्रवेश प्रक्रिया यंदा पहिल्यांदाच संपूर्ण राज्यात ऑनलाइन पद्धतीनं राबविण्यात येतेय. त्यामुळं एका अर्जातच राज्यभरातील महाविद्यालयांतील प्रवेशाचा पर्याय उपलब्ध झालाय. मात्र, पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेशाच्या संकेतस्थळावर तांत्रिक अडचणी येत असल्याने विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करता येत नाहीये. यावर शिक्षण संचालनालयकडून ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरळीत करण्यासंदर्भात काम सुरू आहे

**२६ मे पासून ऑनलाइन प्रवेश, नोंदणी**

राज्यात शासनाची वेबसाईट सुरू होताच अनेक विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्यानंतर अडचणींचा सामना करावा लागला. त्यामुळे, आता ही प्रवेश प्रक्रियाच पुढे ढकलण्यात आली आहे. आता ही प्रवेश प्रक्रिया सोमवारपासून म्हणजेच दिनांक २६ मे पासून सुरू होणार आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना २६ मे ते ३ जून दरम्यान आपल्या पसंतीचे कॉलेज क्रमांक निवडता येतील, त्यासोबतच संपूर्ण अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचा अर्ज भरता येणार आहे. तर, अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची पहिली गुणवत्ता यादी १० जूनला जाहीर होईल, अशी माहिती महामंडळाकडून देण्यात आली आहे.

**पोर्टलची सुविधा ४ दिवस बंद**

दरम्यान, याप्रूवी २१ मे रोजी सुरू करण्यात आलेली विद्यार्थी नोंदणी आणि पसंतीक्रम भरण्याची सुविधा पहिल्या फेरीसाठी २८ मे पर्यंत सुरू राहणार होती. मात्र, ती प्रक्रिया रद्द झाली असून नव्याने वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला आवश्यक वेळ देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. प्रवेशाचे वेबपोर्टल मोबाईलद्वारे हाताळताना अधिक सुलभ व्हावे यासाठी काही वेळासाठी पोर्टलची सुविधा बंद ठेवण्यात आली आहे, असे बोर्डाकडून सांगण्यात आलं आहे. तसेच, विद्यार्थी आणि पालकांनी गोंधळून जाऊ नये. साईट सुरू झाल्यानंतर प्रवेश प्रक्रियेच्या अपडेट देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या व्हॉट्स अप चॅनेलवर आपल्याला लगेच माहिती देण्यात येईल, असेही शिक्षण संचालनालयाने म्हटलं आहे.

# मंगळवेढ्यात वीज पडून दोन जनावरांचा मृत्यू

## ५९ मिलीमिटर पावसाची झाली नोंद

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.२२ मे-**

मंगळवेढा तालुक्यात गेले दोन दिवस अकवाळी पावसाने हजेरी लावली असून तालुक्याच्या ग्रामीण भागात एकूण ५९ मिलीमिटर पडल्याची नोंद शासकीय दफ्तरी झाली आहे. दरम्याने विजांच्या कडकडाटाने वीजा पडून ग्रामीण भागात दोन मोठी जनावरे व एक बोकड अशा तीन प्राण्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

मंगळवेढा तालुक्यात नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे मंगळवेढ्याचा काळा शिवार ओलाचिंब झाल्याचे चित्र असून मात्र जमिनीतून पाणी अद्याप बाहेर निघाले नसल्याचे शेतकरी वर्गाकडून सांगण्यात आले. जमिनीत वापसा आल्यानंतर शेतकरी खरीप पेरणीच्या तयारी लागणार आहेत. मंडल निहाय पडलेला पाऊस पुढील प्रमाणे-मंगळवेढा ७.८,मरवडे ६.०,आंधळगाव ७.०,मारापूर ४.०,भोसे ६.०, हुलजंती ६.०,बोराळे ६.० असा पाऊस पडला आहे. दरम्यान पाऊस पडण्यापुर्वी आकाशात कडाडणाऱ्या वीजा पडण्याचा प्रकारही घडला असून यामध्ये तळसंगी येथे म्हशीवर वीज पडून ती मृत्यूमुखी पडली, तसेच नंदेश्वर येथेही गायीवर वीज पडल्याने ती मयत झाली. लवंगी येथे पावसात घर पडून त्या खाली बोकड सापडल्याने त्याचा मृत्यू झाला. या सर्व घटनांचे पंचनामे होवून त्याची शासकीय दफ्तरी नोंद झाल्याचे सांगण्यात आले.

# २.२५ कोटींचे ड्रग्ज जप्त

**मुंबई, दि. २२ मे-**

२.२५ कोटी रुपयांच्या ड्रग्ज जप्ती प्रकरणात वॉन्टेड असलेल्या एका महिलेला तीन महिने फरार राहिल्यानंतर येथे अटक करण्यात आली आहे, असे पोलिसांनी गुरुवारी सांगितले.

ठाणे पोलिसांच्या अँटि-नार्कोटिक सेलने निलोफर शेराली सेंडोले हिला बुधवारी विक्रोळी येथे अटक केली. फेब्रुवारीमध्ये, ठाणे एएनसीने ठाण्यातील शिल डायघर भागात छापा टाकला होता आणि एका फ्लॅटमधून २.२५ कोटी रुपयांचे एमडी हे ड्रग्ज जप्त केले. इलियास खान, अमन कमाल खान आणि सैफ खान यांना अटक केली होती. हा फ्लॅट निलोफर सेंडोलेचा होता आणि ते तिला ड्रग्ज पोहोचवणार होते, असा दावा पोलिसांनी केला. त्यानंतर सेंडोले फरार झाली.

## ग्रीसमध्ये भूकंपाचा धक्का

**अथेन्स :** मागील काही काळापासून भारतासह जगभरातील विविध देशांमध्ये भूकंपाच्या घटना घडत आहेत. अलिकडच्या काळात, तुर्की आणि म्यानमारसह अनेक देशांतील लोकांना भूकंपांमुळे जीव गमवला आहे. गुरुवारी युरोपीय देश ग्रीसमध्ये जोरदार भूकंपाचा धक्का बसला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ग्रीसमध्ये हा भूकंप सकाळी ८:४९ वाजता झाला. या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ६ इतकी मोजण्यात आली.

# महापालिका आयुक्तांचा मास्टरस्ट्रोक!




सोलापूर शहर हे विविध विषयाने नेहमीच चर्चेत असते. येथील जयंती उत्सव, मिरवणुका त्याचबरोबर पारंपारिक विषय म्हणजे येथील पाणी प्रश्न..! वर्षानुवर्ष सोलापूर शहरातील पाण्याचा विषय नेहमीच ऐरणीवर आणि चर्चेत असतो. सोलापूर महापालिकेच्या प्रत्येक निवडणुकीत त्या त्या काळातील सत्ताधारी आणि विरोधकांनी दररोज पाणीपुरवठ्याचे आश्वासन दिले. मात्र सोलापूरकरांच्या पदरी नेहमीच निराशा पडली. एकेकाळी दिवसातून दोन वेळा या शहराला पाणीपुरवठा होत होता. सद्यस्थितीत गावठाण भागात चार दिवसाआड आणि हद्दवाढ भागात पाच दिवसाआड पाणीपुरवठा होतो. हद्दवाढ भागात तर कधी कधी सात - आठ दिवसानंतर पाणीपुरवठा होतो. यामुळे या भागातील नागरिकांचे सतत पाण्यासाठी हाल होतात. दररोज पाणीपुरवठ्याचे स्वप्न अधुरे राहिले.

सोलापूर शहरात कधी पिवळे तर कधी काळे पाणी नळाला येते. पाणी रे पाणी तेरा रंग कैसा? जिसमे मिलाये है वैसा...! पाणी प्रश्नावरून शहरात नेहमीच राजकीय वातावरण तापते, पेटते आणि विजतेही... यावरच निवडणुका पार पडल्या आहेत... केवळ दूषितच नव्हे तर विस्कळीत पाणीपुरवठ्याच्या प्रश्नालाही सोलापूरकरांना नेहमीच सामोरे जावे लागते. पाण्याचा दिवस हा जणू धडकी भरवणारा शब्द झाला आहे. पाण्याचा दिवस असला की विद्यार्थ्यांना उशिरा शाळेत जावे लागते. कामगारांना उशिरा कामावर जावे लागते किंवा कदाचित खाडे करावे लागते. इतकेच नव्हे तर पाण्याच्या दिवशी एखादी मयत झाली तर पाणी भरल्यानंतरच ती काढावी लागते असे बाकाप्रसंगही अनेक वेळा आले असल्याची चर्चा ऐकायला मिळते. यापूर्वी सन २००१ मध्ये पिवळसर दूषित पाण्यामुळे सुमारे २१ जणांचा बळी गेला होता. दोन महिन्यापूर्वी शहरातील बाबू जगजीवनराम झोपडपट्टीत दोन मुलींचा मृत्यू झाला. या परिसरात दूषित पाणीपुरवठा होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला होता. या झोपडपट्टीसह शहरात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन आणि पाणीपुरवठ्याची लाईन एकाच ठिकाणी असल्याचे आढळून आले. अशा दुरुस्ती कामांसाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी तातडीने दोन कोटीचा निधी मंजूर केला.



अभ्यासू आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी तातडीने यंत्रणा हलवली. दररोज किंवा एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्यासाठी एकमेव उपाय म्हणजे उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनी प्रकल्प आहे असा गाजावजा यापूर्वीही केला आणि आजही केला जात आहे. दरम्यान तेवीस महिने पंधरा दिवसानंतर अखेर उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण झाले. या कामाची चाचणी प्रक्रिया गेल्या तीन दिवसापासून सुरू आहे. दरम्यान, या महिन्यात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेली जिल्हा नियोजन समितीची बैठक ऐतिहासिक ठरली. उजनी - सोलापूर समांतर जलवाहिनीचे काम पूर्ण होत आहे पण पाणी कुठे साठवणार ? शहरातील पाणीपुरवठा योजनांची २८ कामे मंजूर असून त्यांच्या प्रशासकीय मान्यता आणि वर्क ऑर्डर का मिळाल्या नाहीत, असा संतप्त सवाल भाजपचे आ. सुभाष देशमुख यांनी जिल्हा नियोजन समितीच्या आजच्या बैठकीत उपस्थित केला. दरम्यान, आ. देशमुख यांच्या प्रश्नावर महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे आणि नगर अभियंता सारिका अकुलवार यांना व्यवस्थित उत्तरे देता आली नाहीत. आणखी बऱ्याच कामांच्या प्रशासकीय मान्यता बाकी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. अधिकाऱ्यांच्या उत्तरावर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी नाराजी व्यक्त केली. बाजारात असल्यासारखे उत्तर देता का ? तुम्ही महाराष्ट्रात राहता का ? तुमच्या महापालिकेत वेगळे नियम आहेत का ? येणाऱ्या २५ दिवसात पाणीपुरवठा योजनांची कामे करून घ्या अशा सक्त सूचना पालकमंत्री गोरे यांनी दिल्या. तसेच महापालिका अतिरिक्त आयुक्त आणि नगर अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस काढा , असे आदेशही पालकमंत्री गोरे यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना दिले. प्रथमच महापालिकेच्या कारभाराचे वाभाडे या बैठकीमध्ये काढण्यात आले. महापालिकेसाठी ही निश्चितच भूषणावह बाब नाही. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीतील पालक मंत्र्यांच्या आदेशानंतर महापालिका प्रशासनात मोठी खळबळ उडाली. त्याचे साईड इफेक्टही दिसून आले. महापालिका आयुक्तांनी नुकतेच सोलापूर महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागात प्रशासकीय सर्जिकल स्ट्राइक केला. स्मार्ट सिटीचे मुख्य तांत्रिक अधिकारी आणि सार्वजनिक आरोग्य अभियंता ही दोन पदे विभागून दोन अधिकाऱ्यांकडे जबाबदारी सोपवली. महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता पद तपन डंके यांच्याकडे आयुक्तांनी सोपवले. तर दुसरीकडे व्यंकटेश चौबे यांच्याकडे स्मार्ट सिटीचे मुख्य तांत्रिक अधिकारी पद ठेवण्यात आले. तपन डंके यांच्याकडे पाणीपुरवठा विभागाची ही मोठी जबाबदारी आयुक्तांनी सोपवली आहे. महापालिकेच्या या मुख्य विभागात फेरबदल करण्याचा मास्टर स्ट्रोक महापालिका आयुक्तांनी दिला आहे. नूतन सार्वजनिक आरोग्य अभियंता तपन डंके यांच्यावर शहराच्या पाणीपरवठ्याची मोठी जबाबदारी आहे. अनेक वर्षापासून प्रलंबित पाणी प्रश्न सोडविण्यासाठी नेटके नियोजन आवश्यक आहे. उपलब्ध साधन सामग्री आणि पाणीसाठा या आधारावर आता शहराला सुरळीत आणि शुद्ध पाणीपुरवठा कसा करता येईल? याकडे प्राधान्याने लक्ष देण्याची गरज आहे.

एक व्हिजन ठेवून या विभागाची जबाबदारी सांभाळावी लागणार आहे. आयुक्त डॉ. ओम्बासे यांच्यासह शहरवासीयांची सुरळीत व शुद्ध पाणीपुरवठ्याची अपेक्षापूर्ती करण्याची जबाबदारी आता अभियंता डंके यांच्यावर येऊन ठेपली आहे. शहरातील महत्त्वाचा पाणी प्रश्न त्याचबरोबर विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन तुंबून घरात पाणी शिरते. पावसाळ्याच्या तोंडावर आता मान्सून पूर्व कामे करून घ्यावे लागतील. कालच्या अवकाळी पावसाचा तडाखा शहरवासीयांना बसला आणि अनेक घरात पाणी शिरले. याकडेही आता लक्ष देण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे आता सोलापूर शहरातील पाणीपुरवठा व ड्रेनेज व्यवस्था ही जबाबदारी एक व्हिजन , एक मिशन म्हणूनच नेटके नियोजन करून पार पाडावी लागणार आहे. अन्यथा येरे माझ्या मागल्या अशी स्थिती येऊ नये... इतकेच..!

# धुळ्यात सापडलेल्या सापडलेल्या रक्कमेची चौकशी एसआयटी मार्फत करणार

## ● मुख्यमंत्री फडणवीस; अंदाज समितीला १५ कोटी द्यायचे होते : खा.संजय राऊत

**तभा वृत्तसेवा/ जमीर काझी**
**मुंबई, दि. २२ मे-**

विधिमंडळ अंदाज समिती धुळे जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना धुळे येथील शासकीय विश्रामगृहात सापडलेल्या १.८४ कोटीच्या रोकडीमुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. विरोधकांवरून होत असलेल्या टीकेच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची चौकशी एसआयटी मार्फत करण्याची जाहीर केले आहे.त्यामुळे ही रक्कम कशासाठी आणि कोणासाठी जमा केले होते? हे स्पष्ट होणार आहे.



विधिमंडळ अंदाज समितीचे अध्यक्ष आ. अर्जुन खोतकर यांच्या पीए कदमच्या रूममध्ये बुधवारी ही रक्कम सापडली आहे. माजी आमदार अनिल गोटे यांनी हे प्रकरण उघडकीस आणले असून खोतकर यांना ही रक्कम देण्यात येणार असल्याचा आरोप त्यांनी केला. त्याबाबत ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत यांनी शिंदे गटाला घेरले आहे. अर्जुन खोतकर यांच्यावर आरोप करून ईडी, सीबीआयकडे हे प्रकरण देण्याची मागणी केली आहे.



ते म्हणाले की, महाराष्ट्र विधान मंडळाच्या अंदाज समितीचा तीन दिवसीय दौरा धुळ्यात सुरू झाला. या दौऱ्यात शासनाची जी विकास कामे झाली आहे, ती योग्य प्रकारे झाली की नाही? ते तपासण्याचे काम अंदाज समिती करत असते. परंतु, धुळे जिल्ह्यात या कामांमध्ये प्रचंड घोटाळे झाला आहे. भ्रष्टाचार झाला आहे. यामुळे अर्जून खोतकर यांनी ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याची धमकी दिली. त्यानंतर १५ कोटी जमा करण्याची जबाबदारी एका ठेकेदाराने घेतली.

गेल्या तीन दिवसांपासून ही रक्कम जमा होत होती. पाच कोटी रुपये जमा झाले होते. उर्वरित १० कोटी नंतर जमा होणार होते, असे सांगून ते म्हणाले, या प्रकरणात अर्जून खोतकर यांना वाचवण्याचे प्रयत्न सुरु झाले आहेत. समिती विशेषता समितीचे अध्यक्ष किती भ्रष्ट आहे, ते समोर आले आहे. परंतु हे प्रकरण आता ईडी आणि सीबीआयकडे देण्याची गरज आहे. आपण त्यासाठी पाठपुरावा करणार आहोत. परंतु या माध्यमातून गेल्या वर्षभरात आणि त्याच्या पूर्वीच्या अडीच वर्षात या समितीचे दौरे कुठे, कुठे झाले, त्यात काय काय झाले, हे सर्व पाहवे लागणार आहे.

**अंदाज समितीनेही दैदिप्यमान कामगिरी केली असेल का?**

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले की, एखाद्या चांगल्या कामगिरीसाठी रोख रकमेचे बक्षीस दिले जाते. या अंदाज समितीनेही अशी काही दैदिप्यमान कामगिरी केली असेल का? आणि म्हणून त्यांना 'बक्षिस' देण्यासाठी कोट्यवधी रुपये रक्कम जमा केले असतील का? हा संशोधनाचा विषय आहे. पण अवकाळी पावसाप्रमाणे आ. गोटे साहेब त्या १०२ क्रमांकाच्या खोलीत अचानक हजर झाले आणि त्यांच्यामुळं अंदाज समितीच्या 'दैदिप्यमान कामगिरी'वर आणि 'बक्षिस' म्हणून मिळणाऱ्या रकमेवरही पाणी फेरले गेले, असे त्यांनी म्हटले आहे.

**विधिमंडळातील कक्ष अधिकारी निलंबित**

जिल्हा धुळे येथे विधीमंडळाची अंदाज समिती दौऱ्यावर असताना विधिमंडळाचे संशयित कक्षअधिकारी किशोर पाटील यांना निलंबित करण्यात आले आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी समिती गठित करण्यात येत आहे., असे विधानपरिषदचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी सांगितले.

## अग्रलेख...

# नक्षलवादाच्या नि:पाताची नांदी...

महाराष्ट्राच्या सीमेपासून अवघ्या १५ किलोमीटर अंतरावरील अबुझमाडच्या दाट जंगलात बुधवारी सकाळी झालेल्या तुंबळ संघर्षात सुरक्षा जवानांनी तब्बल २७ नक्षलवाद्यांना कंठस्नान घातले. छत्तीसगडमधील नारायणपूर परिसरातल्या इंद्रावती राष्ट्रीय उद्याननजीकची ही जोरदार चकमक २०२६ पर्यंत या देशातून नक्षलवाद संपवण्याच्या मोदी सरकारच्या निर्धाराची नांदी ठरावी अशीच आहे. कारण या दमदार कारवाईत माओवाद्यांचा देशातील सर्वोच्च नेता, सीपीआय (माओवादी) संघटनेचा सरचिटणीस, 'पॉलिट ब्युरो' सदस्य आणि नक्षलवादी चळवळीचा कणा असलेला नंबाला केशव राव ऊर्फ बसवराजू याचा खात्मा झाला. एकीकडे 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून भारताने दहशतवाद्यांमध्येच दहशत पसरवली आहे तर दुसरीकडे 'ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट' राबवून देशांतर्गत माओवाद्यांचे खच्चीकरणही केले जात आहे. या देशात आतंकवाद निर्माण करणाऱ्यांविरुद्ध 'शून्य सहिष्णुते'चे धोरण आता खऱ्या अर्थाने मूर्त रूप घेत असल्याचे दिसते.

परवा गडचिरोली पोलिस दल आणि राज्य राखीव पोलिस दलाच्या जवानांनी 'डीव्हीसीएम' व 'एसीएम' दर्जाच्या माओवाद्यांसह अन्य तीन प्लाटून सदस्यांना अटक केली. या नक्षलवाद्यांच्या शिरावर एकूण ३६ लाखांचे बक्षीस होते. शिवाय यावेळी मोठ्या प्रमाणात दारूगोळा जप्त करून घातपाताचा कट उधळून लावला गेला. त्यापाठोपाठ नारायणपूर परिसरात झालेल्या चकमकीत २७ कडवे माओवादी ठार करण्यात सुरक्षा जवानांना यश आले. या चकमकीनंतर बेवारस पडलेला ७० वर्षीय बसवराजू हा काही साधासुधा नक्षलवादी नव्हता, तर त्याने दंडकारण्यात नक्षल चळवळीचा पाया रोवला होता. माओवाद्यांनी स्वप्नातही विचार केला नव्हता अशी ही कारवाई त्यांच्या एकूणच चळवळीला मोठा धक्का देणारी, त्यांना सैरभैर करणारी आहे. गेल्या दशकातील अनेक भीषण माओवादी हल्ल्याचा हा बसवराजू 'मास्टरमाईंड' होता. अबुझमाडचे जंगल त्याच्या दहशतीने खचून गेले होते. त्याने घडवलेल्या कारवायांचा रक्तरंजित इतिहास अंगावर काटा आणणारा आहे. बसवराजू हा आंध्रप्रदेशातील श्रीकाकुलम जिल्ह्यातील जियान्नापेट गावचा रहिवासी होता. त्याने वारंगल येथील राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेतून अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले. महाविद्यालयीन जीवनातच तो डाव्या विचाराने पछाडला गेला. मुळात हुशार असलेल्या बसवराजूने स्फोटकाच्या तंत्रज्ञानात प्रभुत्व मिळविले होते आणि त्याचा वापर निष्पापांच्या हत्येसाठी केला. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, केवळ बुद्धिमत्ता असून ती कामाची नसते, तर तिला विवेकाची जोडही आवश्यक असते. अन्यथा ती विध्वंसक ठरते. १९८७ मध्ये बस्तरच्या जंगलात बसवराजू याने काही जहाल नक्षल नेत्यांसोबत श्रीलंकेतल्या लिट्टेच्या (लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ इलम) माजी सैनिकांकडून 'ॲम्बुश' रणनीती आणि 'जिलेटिन' हाताळण्याचे प्रशिक्षण घेतले होते. पुढे तो या कामात निष्णात झाला. आपल्या विनाशक बुद्धिमत्तेचा वापर करीत त्याने २०१० मध्ये दंतेवाडा येथे भीषण हल्ला घडवून आणला; ज्यात ७६ केंद्रीय राखीव पोलिस दलाचे जवान हुतात्मा झाले होते. पोलिसांसह निष्पाप गावकऱ्यांची हत्या करणे, खाण कंपन्या व कंत्राटदारांकडून खंडणी वसूल करणे, जीराम घाटी हल्ल्यात माजी राज्यमंत्री महेंद्र कर्मा आणि छत्तीसगड काँग्रेसचे नेता नंदकुमार पटेल यांच्यासह अन्य २७ जणांचा मृत्यू घडवून आणण्याचा आरोपही या बसवराजूवर आहे. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, तेलंगणा, झारखंड, मध्यप्रदेश, वेस्ट बंगाल या सर्व नक्षलग्रस्त राज्यात सक्रिय असलेल्या या कुख्यात नक्षलवाद्यावर चक्क सहा कोटी रुपयांचे इनाम होते. त्याचा खात्मा करून सुरक्षा दलाने निर्भान झालेल्या नक्षलवादाचे कंबरडेच मोडले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या उल्लेखनीय कारवाईचे कौतुक करीत देशात माओवाद्यांचा धोका दूर करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे म्हटले आहे. तर, ३१ मार्च २०२६ पर्यंत या देशातून नक्षलवाद समूळ नष्ट करण्याचा इशारा देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेच्या निवडणुकीदरम्यान थेट चंद्रपुरात येऊन दिला होता, त्याचा पुनरुच्चार त्यांनी पुन्हा एकदा या घटनेनंतरच्या त्यांच्या ट्विटमधून केला आहे. त्यांचे ते शब्द आता खरे ठरत असल्याचे दिसते. अबुझमाडच्या जंगलातील कारवाई ही नक्षलवाद संपवण्याच्या मार्गावरील मैलाचा दगड ठरणार आहे, यात शंका नाही. नक्षलवादाविरुद्धच्या तीन दशकाच्या लढ्यातील ही चकमक त्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. या लढाईत पहिल्यांदाच माओवाद्यांचा सरचिटणीस दर्जाचा नक्षलवादी मारला गेला. तर, 'ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट'च्या माध्यमातून छत्तीसगड, तेलंगणा व महाराष्ट्रातील ५४ नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली. ८४ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे, हे या नक्षल चळवळीला ग्रहण लागल्याचेच लक्षण आहे.

खरे तर, गत पाच-सहा वर्षांत नक्षलवादाची पाळेमुळे जोरकसपणे उद्ध्वस्त केली गेली. त्याचवेळी आदिवासींना विश्वासात घेण्यासाठी 'सोशल पोलिसिंग'सारख्या प्रभावी योजनेवरही काम केले गेले. त्यामुळेच माओवाद्यांना स्थानिक आदिवासींकडून याआधी मिळणारे सहकार्य एकदम कमी झाले आहे. आधी नक्षलवाद असलेल्या गावांमध्ये राहणारा आदिवासी बांधव माओवादी आणि पोलिसांच्या मध्ये पिसला जायचा. शेवटी जिवाच्या भीतीने, पैशाच्या गरजेपोटी तो नक्षलवाद्यांना मदत करायचा. पण आता आदिवासींच्या मुलांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी पोलिसांकडून रोजगार व जनजागरणाचे मेळावे घेतले जात आहेत. पोलिस भरतीतही आदिवासी पाड्यातील बेरोजगार तरुण सहभागी होत आहेत. सुरजागड येथे गौण खनिजाच्या खाणी आल्याने रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. शिवाय आता तेंदुपत्ता हंगाम कंत्राटदाराच्या हातून काढून ग्रामसभेकडे दिल्याने कंत्राटदाराकडून नक्षलवाद्यांना मिळणारी खंडणी बंद झाली आहे. पेपर उद्योगांसाठी लागणारा बांबू तोडणाऱ्या आणि त्याची वाहतूक करणाऱ्या घटकांकडूनही आधी हे माओवादी पैसा वसूल करायचे. आता बांबू पुरवठाच मर्यादित झाल्याने नक्षल्यांची ही रसदही संपली आहे. माओवाद्यांनी साठवून ठेवलेला मोठा पैसा मोदी सरकारने राबविलेल्या नोटाबंदीने पाण्यात गेला. एकूण काय, तर त्यांचा साऱ्याच आघाडीवर शक्तिपात झाला आहे. अनेक दलममध्ये त्यांच्या दोन वेळच्या जेवणाचे वांदे झाले आहेत. खऱ्या अर्थाने त्यांची आता हातातोंडाशी गाठ पडली आहे. दुसरीकडे 'दादालोरा खिडकी' योजनेच्या माध्यमातून आदिवासी जनतेला विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, शासकीय दाखले, उच्च दर्जाचे कृषी बियाणे व स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्याचे अभिनव कार्य सुरू आहे. 'दादालोरा' हा आदिवासी भाषेतील शब्द आहे. त्याचा अर्थ मोठा भाऊ असा होतो. 'पोलिसदादा' या अर्थाने तो तिकडे वापरला जातो. त्यांच्याच भाषेत त्यांच्याशी साधलेला हा संवाद फलदायी ठरत आहे तर दुसऱ्या आघाडीवर मोठ्या धैर्याने आणि निडरपणे सीआरपीएफ , एसआरपीएफ, सी-६० यांसारख्या सुरक्षा यंत्रणांनी माओवादाविरुद्ध दंड थोपटले असून चातगावसारखे दलम समूळ नष्ट केले आहे. २०१४ मध्ये भारतातील १२६ जिल्हे नक्षलवादाने प्रभावित होते. आता मात्र २०२५ येईपर्यंत केवळ १२ जिल्ह्यातच त्यांचा तुटपुंजा प्रभाव उरला आहे. सगळीकडे त्यांचे हात तोकडे पडत आहेत. नजीकच्या काळातील सुरक्षा यंत्रणांच्या कारवायांना मिळणारे हे यश नक्षलवाद संपण्याचे शुभसंकेत मानले पाहिजे. सीमेवर पाकिस्तान-चीनसारख्या शत्रूंशी दोन हात करताना देशांतर्गत दहशतवाद आता आम्हाला परवडण्यासारखा नाही, असा स्पष्ट संकेत एव्हाना नक्षलवादाविरुद्धचे धोरण आखताना भारत सरकारने दिला आहे आणि तो अतिशय योग्य आहे.

## प्रासंगिक

# महाभारत ते भारत (१९)

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

महाभारत हे महाकाव्य म्हणजे भारतीय संस्कृतीच्या सर्वांग परिपूर्ण विकसन प्रक्रियेचा, वैदिक काळापासून तो द्वापार युगाच्या अंतापर्यंतच्या वाटचालीचा इतिहास आहे. द्वापार युगाचा अंत आणि कलियुगाचा प्रारंभ अशा कालसीमेवरील सर्व ज्ञात अशा घटनांचा साक्षी असणारा हा ग्रंथ म्हणजे भारतीयांना जीवनाच्या सर्व क्षेत्रात अखंडपणे प्रकाश दाखविणारा दीपस्तंभ आहे. त्या प्रकाशात वैयक्तिक जीवनापासून तो राजकीय, सामाजिक, धार्मिक, नैतिक, राष्ट्रीय, वैश्विक क्षेत्रातील सर्व समस्यांचे अचूक मार्गदर्शन या ग्रंथातून आपल्याला प्राप्त होऊ शकते जर, त्या श्रद्धेने, विश्वासाने या ग्रंथाकडे पाहिले तर! भारतीय तत्त्वज्ञानाचे कालातीत व संजीवक सामर्थ्य असणारा भगवद्गीता हा ग्रंथ, महाभारताच्या उदरातूनच जन्माला आला, ही एकमेव घटनाच या ग्रंथाचे माहात्म्य सिद्ध करणारी आहे.

### कुरुक्षेत्र - फाळणीचा अपरिहार्य परिणाम

'कुरुक्षेत्र' म्हणजे युद्धभूमी; हा कोणत्याही युगातील फाळणीचा अपरिहार्य असा परिणाम असतो, हा शाश्वत सिद्धांत वा प्रमेय महर्षी व्यासांनी महाभारतात संपूर्णपणे विशद केला आहे. फाळणी मग ती द्वापार युगातील, हस्तिनापूरची म्हणजे चक्रवर्ती भरताच्या समुद्र वलयांकित महाराज्याची असो वा कलियुगीन त्याच्याच नावाने अस्तित्वात असलेल्या भारताची असो, परिणाम एकच युद्ध! धृतराष्ट्री मनोवृत्तीचा समूळ नायनाट, संपूर्ण विध्वंस! प्रत्येक पापाचे, अपराधाचे पूर्ण माप त्यांच्या पदरात टाकणारे, प्रत्येक कृतीचे, दुस्साहसाचे परिणाम त्यांना भोगायला भाग पाडणारे, आपल्याच भावांच्या पत्नीला जांघेवर, मांडीवर येऊन बैस म्हणणाऱ्यांची जंघा गदेच्या घणाघाती प्रहाराने विदीर्ण करणारे, आपल्या धर्मपत्नीला नग्न करण्यासाठी तिच्या वस्त्राला घातलेला हात उपटून टाकणारे त्याच्या रक्ताने तिच्या मोकळ्या केसांना भिजविणारे, प्रतिशोधाच्या धगधगत्या ज्वालेने पेटलेले सर्वंकष युद्ध! युद्ध!! आणि युद्ध!!! महाभारताचा हाच संदेश आहे. आधुनिक भारतालाही इच्छा असो वा नसो. याच पूर्वकालीन, अनुभूत आणि अंतिम विजयाच्या दृष्टीने वाटचाल करावी लागणार आहे. त्याला पर्याय नाही. महाभारतात कणिक नीती आहे. विदूर नीती आहे. शरपंजरी पडलेल्या भीष्म पितामहांनी नूतन राज्याधिपती युधिष्ठिराला केलेला उपदेश आहे. या सर्वांचे सार एकच आहे- 'शस्त्रेण रक्षिते राष्ट्र शास्त्र चिंता प्रवर्तते।'

शत्रूचा समूळ नायनाट करावा. शिल्लक राहिलेली ठिणगीही पुढे वणव्याचे स्वरूप धारण करते. सापाला दूध पाजले तरी त्याचे विषच होते. सापाप्रमाणे डूक धरून बसलेला शत्रू त्याला योग्य संधी मिळताच दंश केल्याशिवाय राहत नाही त्यामुळे हे राजन्!

'यस्मिन्यथा वर्तते यो मनुष्यस्तास्मंस्तथा वर्तितव्य स धर्मः
मायाचारो माझ्या वर्तितव्यः साध्वाचारः साधुना प्रत्युमेयः॥'

म्हणजे ज्यांच्याशी जो मनुष्य जसा वागतो त्याच्याशी तसे वागावे हा धर्म आहे. कपटाने वागणाऱ्याशी कपटाने वागावे आणि भलेपणाने वागणाऱ्याशी भलेपणाने वागावे हासुद्धा धर्म आहे. शत्रू-मित्र विवेकाच्या दृष्टीने आणि राष्ट्रजीवनाच्या सुरक्षिततेच्या आणि प्रगतीच्या संदर्भात वरील विवेचन किती अचूक आहे, याचा पडताळा वा प्रत्यंतर सन १९४७ च्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सन २०१४ पासून जो नेतृत्वाचा बदल झाला आहे आणि सध्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने जो भारत-पाकिस्तान संघर्ष चालू आहे त्या घटनांवरून सहजपणे येते. या दृष्टीनेही महाभारतात भविष्यकालीन वाटचालीच्या पाऊलखुणा सहज सापडतात. त्या अशा की, सैन्यबळाच्या दृष्टीने हे 'विषम द्वंद्व' आहे. कारण एकीकडे ७ अक्षौणिही आणि दुसरीकडे ११ अक्षौणिही सेना अस्त्रवेत्तेपणातही एकटा अर्जुन विरुद्ध द्रोणाचार्य, भीष्माचार्य, कृपाचार्य, अश्वत्थामा आणि सुडाने पेटलेला कर्ण! काहीही तुल्यबलता नाही. पण तरीही विजयश्रीने पांडवांना माळ घातली. याचे कारण म्हणजे धृतराष्ट्री मनोवृत्तीच्या लोकांच्या पापाचा घडा भरला असल्याने कालपुरुषानेच त्यांना ग्रासले होते. ती त्यांची नियती आधीच ठरली होती. त्याचमुळे भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला 'निमित्तमात्र भव सव्यसाचिन्' असा आदेश दिला. तीच अवस्था आज भारताची आहे. कारण पाकिस्तानची, इस्लामची कालपुरुषाने तीच नियती (डेस्टिनी) शेकडो वर्षे आधी ठरवून दिली आहे. तिचे प्रतिबिंब पुढील भविष्यवाणीत स्पष्ट दिसते. ती कथा अशी - भारतावरील मुस्लिम आक्रमणाचा इतिहास महंमद गजनी आणि शहाबुद्दीन महंमद घोरी यांच्या काळापासून चालू होतो. महंमद घोरी आणि पृथ्वीराज चव्हाण यांच्यातील १७ वेळा झालेल्या संघर्षाची गाथा स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या भाषेत हिंदू समाजाच्या सद्गुण विकृतीची कथा सर्वांना ज्ञातच आहे. सतत पराभवामुळे दुर्मुखलेला, उदास झालेला महंमद घोरी बुखारा येथे वास्तव्याला असलेले प्रसिद्ध संत फकीर हजरतशहा नियामत उलवली यांचे दर्शनाला गेला. आपली व्यथा प्रकट केली. त्यांच्यात संवाद झाला. फकीर साहेब त्याला म्हणाले,

''बंदा बनके आया है या बादशहा?'' महंमद घोरीने उत्तर दिले,

''बंदा बनके आया हूं.'' तीव्र स्वरात त्यांनी त्याला पुन्हा विचारले,

''तूं अल्ला के सामने लोगों को झुकाना चाहता है की तेरे सामने?'' घोरीने मवाळ आवाजात अदबीने उत्तर दिले,

''नही, मै तो इस्लाम का बंदा हूं. उसके सामने सबको झुकाना चाहता हूं.''त्याच्या उत्तराने खूश झालेल्या हजरतशहांनी पुढील भविष्य वाणी केली,

''लौट जा, वापस हिंद लौट जा! तू जितेगा! जिससे तू हारा है, उसे तू शिकस्त देगा! वही तेरे हाथो शहीद होगा! तू हिंद मे इस्लाम की हुकूमत कायम करने वालो में होगा! डेढ सौ सालो में तुम लोग हिंद के आखिरी शहर तक फैल जाओगे! (म्हणजे रामेश्वपर्यंत) फिर एक रोज इसी हिंद का हिस्सा लेकर अलग होंगे! (म्हणजे पाकिस्तानची निर्मिती). लेकीन एक दिन खुद कई टुकडो में बटने के लिये!'' हजरत नियामत उलवलींनी केलेल्या भाकिताप्रमाणे 'वह एक दिन' 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने येऊन ठेपला आहे. बलुचिस्थान, पख्तुनिस्थान, सिंधस्तान आणि व्याप्त काश्मीर इत्यादी अनेक तुकड्यांमध्ये पाकिस्तान विभाजनाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. पानिपतच्या रणांगणात लक्षावधी आयाबहिणींच्या सांडलेल्या कुंकवाचा बदला घेण्यासाठी महादजी शिंद्यांनी उत्तरेकडे आक्रमण करीत सत्ता खिळखिळी केली. पहेलगाम येथे सांडलेल्या कुंकवाने सिंदुराने इस्लामी आतंकवादाचे माहेरघर पाकिस्तान छिन्नविच्छिन्न केले. असा सतित्त्वदर्शक भारतीय नारीच्या सामर्थ्याचा हा प्रत्यय आहे.

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# लिंबू आणि सोनं

समाजमाध्यमं आता गांभीर्याने घेऊच नयेत असे प्रकार दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. त्यापैकी एक 'व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटी' असा शब्द प्रचलित झाला आहे. येथे कल्पना जन्माला येतात आणि टोकाचे भांडणंही होतात. अगदी लग्न तुटेपर्यंतचे या समाजमाध्यमांची मजल गेली आहे. आपल्याकडे चांगले ते घेण्याची प्रथा असताना वाईट ते घेण्यावर आपलाच भर असल्याने असा बाका प्रसंग आपणच ओढवून घेतो. त्याला हात दाखवून अवलक्षण म्हणता येईल. आता तुम्ही म्हणाल हे रोजचेच रडगाणं झालं आहे. उठसूट मोबाईल बघणं वाईट म्हटले जात असले, तरी आपले डोळे लागल्यानंतर तेवढाच मोबाईलला आराम मिळतो. पुन्हा डोळे चोळत उठत असतानाही 'कराग्रे वसते लक्ष्मी' ऐवजी 'कराग्रे बसतो भ्रमणध्वनी' असे काहीसे जीवन झाले आहे. तुम्ही कितीही वाईट म्हणा, पण 'मोबाईल के बिना सब कुछ अधुरा है!' सध्या देशात सर्वात जास्त दु:खी कोण असेल तर शेतकरी... त्याच्याविषयी राजकारण्यांना जी तळमळ आहे ना तीही मतांपुरतीच बरं का... बाकी त्याचा तारणहार तोच! देवही त्याची जमेल तेवढी परीक्षा घेतो. तोही देवाच्या परीक्षेला तेवढ्याच ताकदीने उत्तर देतो. शेतकऱ्यांचा 'वाली' सध्या तरी कोणीच नाही. सर्व काही देवाच्या हवाली करून तो आषाढीला पांडुरंगाच्या दर्शनाला पायी वारीत सहभागी होतो. हे सारं सांगण्याच्या मागे वेदना आहेत. त्या समजून घेणे अवघडही असेल. काल-परवा एका वैदर्भीय युवकाने केलेली रिल बघितली. कोण काय शोधून काढेल, याचे नवल वाटले. आम्ही शेतकऱ्याची मुलं असल्याचे ठासून सांगत असलो, तरी शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेण्याऐवजी टीका करण्याची संधी सोडत नाही. उन्हाळ्याच्या सुरुवातीपासून लिंबाचे भाव वाढलेले असतात. एरवी लिंबाला फारशी मागणी नसते. उन्हाळ्यात सरबत वगैरेसाठी लिंबू लागत असल्याने १ रुपयाला १ लिंबू मिळणारे उन्हाळ्यात १ लिंबू ५ रुपयाला १ आणि २० रुपयाला ३ लिंबू विकत मिळतात. एप्रिल ते मेच्या पहिल्या आठवड्यापर्यंत १० रुपयाला १ लिंबू असे भाव होते. गाव वा जिल्हापरत्वे त्यात कमी-जास्त भाव असतीलही. पण, एप्रिलमध्ये एका वृत्तवाहिनीने जळगाव जिल्ह्यात लिंबाचे भाव गगनाला भिडल्याची बातमी पंधरवड्यात दोन वेळा दाखवली.



असो. ते चोवीस तास दाखवण्याच्या भानगडीत वेगळे काय दाखवणार. पण, दोन दिवसांपूर्वी जे काही समाजमाध्यमावर व्हायरल झाले, त्याने आम्ही किती दरिद्री विचारांचे आहोत, हेच वाटू लागले. श्रद्धेपोटी नजर लागू नये म्हणून काही जण वाहनाला लिंब-मिरची बांधतात. त्यावर अंधश्रद्धा निर्मूलनवाले टीकाही करतात. तरीही लोकं लिंबू-मिरची बांधल्याशिवाय राहत नाहीत. रिल निर्मात्याने मात्र आता लिंबू परवडत नसल्याने मिरचीसोबत 'लिंबा' ऐवजी 'व्हीमबार' लावल्याचे दाखवले. घटका भर आपण दातही दाखवले असतील. पण, सध्या लिंबूच महाग आहेत का? पण, कोटी करायला लिंबूच मिळाले. हो, अर्थशास्त्रानुसार पुरवठा कमी आणि मागणी जास्त असल्यास भाव वधारतात. बरं, हे लिंबाचे भाव वाढले तो पैसा शेतकऱ्यांच्या हातात लागतो का? तर, याचे उत्तर १०० टक्के नाही असे आहे. मधला पैसा दलाल, ठोक विक्रेता व किरकोळ व्यावसायिकाच्या खिशात जातो. शेतकऱ्यांच्या पदरी मेहनतीनंतर दोन-अडीच रुपये पडतात. पिकवणाऱ्या पेक्षा विकणारा फायद्यात राहू लागला आहे. ही कथा झाली लिंबाची, पर्यायाने शेतकऱ्यांची आणि हे सर्व शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पुजलं आहे. आता पुढचा भाग सोन्याचा! तुम्ही म्हणाल सोनं आणि लिंबाची तुलना तरी होऊ शकते का? तर याचेही उत्तर नकारार्थीच... पण, सोन्याचे भाव वाढले कौतुकाने दाखवले जाते. शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाचे भाव वाढले म्हणजे सामान्यांच्या डोळ्यात पाणी येतं, महिलांच्या स्वयंपाकघराचे बजेट बिघडतं. पण, अक्षय्य तृतीया, गुढीपाडवा, दसरा या साडेतीन मुहूर्ताशिवाय गुरुपुष्यामृताला नेमाने सोने खरेदी करणाऱ्यांची संख्या बघा; त्यातही सामान्यांची संख्या मोठी असते. आपल्या संस्कृतीत अनेक अशा वस्तू आहेत ज्यांचा उपयोगच नाही तर त्याला गूढ अर्थ आणि परंपरा आहे. त्यातलेच 'सोनं आणि लिंबू!' दोन्हीही पिवळेच! त्यांचे स्थान आणि महत्त्व वेगळं आहे. लिंबू सामान्य फळ तर सोनं मौल्यवान धातू! आध्यात्मिकदृष्ट्या विचार केला तर लिंबू नकारात्मक ऊर्जा शोषते म्हणजे ते सकारात्मकतेला वाव देते. दुसरीकडे सोनेही सकारात्मकचे प्रतीक! लिंबू चोरी जातात आणि सोन्यावर तर कायम चोरट्यांची नजरच असते. पण, जी टीका लिंबाचे भाव वाढल्यानंतर करण्यात आली ती सोन्याचे दर लाखाच्या घरात गेल्यावर झाली नाही. कारण ते शेतकरी पिकवतात. सोनं श्रीमंतांच्या घरात आणि गळ्यात असतं. लिंबाचे दर फक्त उन्हाळ्यात दोन-चार रुपयांनी वाढतात. सोन्याचे दर एक वर्षात जवळपास १९ हजारांनी वाढले. बोंब मात्र लिंबाचे दर वाढल्याची... 'श्रीमंताच्या घरचे श्वान त्याला सर्व देती मान' असेच काहीसे आहे नाही का...!

९८८१९०३७६५


## दखल

# फडणवीस सरकारची ताकद वाढली

**मोरेश्वर बडगे**

राजकारणात काहीही घडू शकतं. 'जहाँ नहीं चैना, वहा नहीं रहना' असे अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी सहा महिन्यांपूर्वी आपल्याच पक्षप्रमुखाला सुनावले होते. त्याच भुजबळांनी आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारमध्ये मंत्रिपदाची शपथ घेतली. राजकारण किती प्रवाही असतं याचा साक्षात्कार जनतेला पुन्हा एकदा झाला. महायुती सरकारच्या विस्तारात मंत्रिपद नाकारल्याने भुजबळ प्रचंड नाराज झाले होते. ही नाराजी त्यांनी लपवलीही नव्हती. थेट अजितदादांना टार्गेट केले होते. 'मी यांच्या हातचे खेळणे नाही' अशा शब्दात भुजबळांनी आपल्या संतापाला वाट मोकळी करून दिली होती. नागपूरचे विधानसभा अधिवेशन सोडून ते परतले होते. त्यानंतर भुजबळ पक्षात फारसे सक्रिय नव्हते. भुजबळ भाजपाच्या वाटेवर असल्याची चर्चा जोरात होती. गेल्या १० वर्षांत काँग्रेस आणि इतर अनेक पक्षांच्या नेत्यांनी भाजपामध्ये आश्रय शोधला आहे. भुजबळही भाजपामध्ये दिसतील, असं अनेकांना वाटत होते. खासकरून या संघर्षाच्या काळात फडणवीस यांनी ज्या पद्धतीने भुजबळांना सांभाळलं, ते प्रत्येक राजकीय पक्षाने अभ्यास करण्यासारखे आहे. अजितदादांना धनंजय मुंडे यांचे बीडचे राजकारण सांभाळायचे होते. त्यापायी दादांनी मुंडे यांची खूप मस्ती सोसली. मात्र मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर मराठवाड्यात विशेषत: मराठा समाजात उसळलेला असंतोष अजितदादांना रोखता आला नाही. मुख्यमंत्र्यांनी मुंडेंचा राजीनामा घेतला. रिकाम्या झालेल्या त्या जागेवर राष्ट्रवादीने भुजबळांना संधी दिली. 'शेवट गोड झाला' अशा शब्दात भुजबळांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. अजितदादा आणि भुजबळ यांच्यातला दुरावा कमी करण्यासाठी खुद्द फडणवीसांनी पुढाकार घेतला होता, हे लपून राहिलेले नाही. अजितदादा, त्यांच्याशी पंगा घेणाऱ्या कोणाला माफ करीत नाहीत. पण भुजबळांच्या बाबतीत त्यांचा नाईलाज झाला असावा. समोर निवडणुका आहेत. ७७ वर्षे वयाचे भुजबळ हे या सरकारमधले सर्वात ज्येष्ठ नेते आहेत. त्यांच्या खालोखाल गणेश नाईक हे ७३ वर्षांचे आहेत. भुजबळांसारखा मातब्बर तसेच आक्रमक ओबीसी चेहरा मंत्रिमंडळात दाखल झाल्याने फडणवीस सरकारची ताकद नक्कीच वाढली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लवकरच व्हायच्या निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर महायुतीच्या नेतृत्वाला आणखी धार आली आहे.

राज्यात एकूण ४० मंत्री घेऊ शकतात. त्या हिशोबाने मंत्रिमंडळातील आणखी एक जागा रिकामी आहे. भाजपाच्या वाट्याला असलेले हे मंत्रिपद कोणाला जाते की तसेच रिकामे ठेवले जाते, याची उत्सुकता आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासाठी ते राखून ठेवल्याची जुनी चर्चा आहे. पण तसे व्हायचे तर तो मोठा भूकंप असेल. राज्याचे



राजकारणच उलटेपालटे होईल. त्याची सुरुवात झाली आहे. पत्ते कसे पडतात ते पाहायचे. महाराष्ट्राच्या राजकारणात खूप मोठ्या उलथापालथी पाहायला मिळू शकतात. एकट्या भुजबळांनाच का घेतले? केवळ एकासाठी एवढा तामझाम का केला, असा प्रश्न अनेकांना पडू शकतो. भुजबळांना घेतले नसते तर फडणवीस सरकार चालले नसते अशातला भाग नव्हता. मग नक्कीच काही खास कारण असावे. भुजबळांना डच्चू दिला होता तेव्हा नव्यांना संधी द्यायची आहे, असे सांगितले गेले. सहा महिन्यांपूर्वी म्हातारे झालेले भुजबळ आज दादांसाठी एकदम तरणेबांड कसे झाले? याचेच नाव राजकारण आहे. शिर्डीचे साईबाबा दोन गोष्टी सांगून गेले. पहिली म्हणजे श्रद्धा आणि दुसरी सबुरी; ज्यांना या दोन गोष्टी साधता आल्या ते आयुष्यात पुढे गेले आहेत. दिवंगत मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे उदाहरण आहे. दोन-दोन निवडणुका हरल्याने विलासराव संपल्यात जमा झाले होते. १९९९ ची गोष्ट आहे. काँग्रेसला सत्ता मिळणार नाही, अशी हवा होती. त्यामुळे विलासरावांना विरोधी नेता जाहीर करून काँग्रेस मोकळी झाली होती. पण पुढे हवाच बदलली. परिस्थितीने विलासरावांना मुख्यमंत्री बनवले. देवेंद्र फडणवीस यांचे उदाहरण तर ताजे आहे. भाजपा-शिवसेना युतीने मिळून निवडणुका लढवल्या. निकालानंतर उद्धव ठाकरे यांनी दगा दिला. निवडणूक जिंकूनसुद्धा फडणवीस यांना विरोधी बाकांवर बसावे लागले. त्या काळात 'सबुरी' म्हणजे संयम राखण्याचा फायदा फडणवीसांना आज मिळतो आहे. तावातावात भुजबळांनी अजितदादांना सोडले असते तर आज धनंजय मुंडे यांच्या रिकाम्या जागी दुसरे कोणी असते. भुजबळ सोबत असण्याचे अनेक सुप्त फायदे आहेत. 'जेल रिटर्न' आहेत म्हणून भुजबळांची उपयोगिता संपत नाही. फडणवीसांनी ते हेरले. त्याला कारणं आहेत. पहिली गोष्ट म्हणजे भुजबळांना लढायला आवडते. एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाचा मोठा झंझावात उभा केला तेव्हा भुजबळांनीच त्यांना अंगावर घेतले होते. त्या काळात शिंदे मुख्यमंत्री असले, तरी जरांगे यांचे टार्गेट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. जरांगे यांच्या 'अरे'ला भुजबळांनी 'कारे' केले. त्यातून फडणवीस यांच्याशी भुजबळांची जवळीक वाढली. ओबीसी ध्रुवीकरणासाठीही फायदा झाला. नव्या हवेतही भुजबळ सोबत हवेत यासाठी फडणवीस विशेष आग्रही होते. पण अजितदादांनी धनंजय मुंडे यांना उचलले. मुंडे यांना त्यांच्याच माणसाने म्हणजे वाल्मीक कराड याने गिळले. अनेक नेत्यांना हा धडा आहे. कुणी 'वाल्मीक कराड' बंदोबस्ताला ठेवले असतील तर लगेच त्याला मोकळे करा. नाहीतर तुमचा 'मुंडे' ठरला आहे. फडणवीसांना मराठ्यांच्या आंदोलनाशी पुन्हा एकदा सामोरे जावे लागू शकते. भुजबळ आल्याने मराठा विरुद्ध ओबीसी हा वाद नव्याने भडकणार आहे. जरांगे पाटील नव्याने हल्लाबोल करणार आहेत. अशा वेळी जरांगे यांना रोखायला भुजबळ हा मोठा चेहरा असेल. पावसाळ्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागू शकतात. केंद्र सरकारने जातीय जनगणना करायचे योजिले आहे. अशा वातावरणात ओबीसी व्होट बँकेसाठी प्रतिष्ठेची लढाई राहणार आहे.

जे व्हायचेच नाही त्या गोष्टींवर आपल्याकडे खूप चर्चा होते. ठाकरे बंधू एकत्र येणार का? पवार ताई-बंधू एकत्र येणार का? हे असेच नेहमीचे प्रश्न आहेत. राज ठाकरेंनी २५ वर्षांपूर्वी शिवसेना सोडली. त्या नंतरच्या काळात अनेकदा राज आणि उद्धव यांच्या एकत्र येण्याच्या चर्चा झाल्या. ज्या कारणासाठी हे दोन भाऊ वेगळे झाले त्याच कारणासाठी ते एकत्र येणार नाहीत. पण मीडियाला तसली चर्चा चघळायला आवडते. तोच मामला पवार काका-पुतण्या यांच्या एकत्र येण्याचा. 'तो निर्णय सुप्रियाने घ्यायचा आहे' असे शरद पवारांनी नुकतेच एक वक्तव्य केले. सुप्रियाला निर्णय घेऊ देत नाहीत म्हणूनच तर पुतण्या काकाचा पक्ष फोडून बाहेर पडला होता. लोकांना हे सारं ठाऊक आहे. तरीही मीडिया ते सारखं वाजवते. लोक कंटाळले आहेत. पवार किंवा ठाकरे एकत्र आले नाहीत तर जग थोडेच बुडणार आहे? तरीही पवार तसेच ठाकरे कुटुंबाला चर्चेत खेचले जाते. काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ल्यानंतर तर शरद पवारांनी भूमिका एकदम बदलली आहे. उद्धव ठाकरेही नरमले आहेत. पाकिस्तानचा दहशतवादी बुरखा फाडण्यासाठी भारताने विदेशात शिष्टमंडळं पाठवायचे योजिले आहे. एका शिष्टमंडळाचे आपल्यालाही प्रमुख बनवले जाईल, अशी आशा उद्धव ठाकरे यांचे हनुमान खासदार संजय राऊत यांना होती. पण उद्धव यांनी त्यांच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी यांचे नाव सुचवले. त्यामुळे संजय राऊत तोंडावर आपटले आहेत.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## डॉ. जयंत नारळीकरांना श्रद्धांजली

सुप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ व विज्ञानकथा लेखक पद्मविभूषण डॉ. जयंत नारळीकर यांच्या निधनाची बातमी धक्कादायक आहे. त्यांच्याशी संबंध आला तो विज्ञानकथा लेखक या नात्याने. 'यक्षांची देणगी' हा त्यांचा राज्य पुरस्कार प्राप्त विज्ञान कथासंग्रह अतिशय रंजक आहे. हॉयल-नारळीकर सिद्धांतामुळे डॉ. नारळीकर प्रसिद्धीच्या झोतात आले. त्याच सुमारास नागपूर विद्यापीठाच्या फिजिक्स डिपार्टमेंटमध्ये त्यांचे एक व्याख्यान होते. तेव्हा आम्ही दुसऱ्या विभागात पदव्युत्तर विद्यार्थी होतो. त्यांना केवळ पाहण्यासाठी त्या व्याख्यानाला जाऊन बसलो. विषय कळण्याचा काही संबंधच नव्हता. पुढे मराठी विज्ञान परिषद नागपूरने त्यांच्या वार्षिकोत्सवात डॉ. नारळीकरांना आमंत्रित केले होते. इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समधल्या त्यांच्या व्याख्यानाला प्रचंड गर्दी झाली होती. 'यज्ञांची देणगी' ही विज्ञानकथा डॉ. नारळीकरांनी टोपण नावाने एका कथा स्पर्धेत दिली होती. या कथेला प्रथम पुरस्कार मिळाला, ती किर्लोस्कर मासिकात प्रसिद्ध झाली व नारळीकरांना एक विज्ञानकथा लेखक म्हणून लोकप्रियता मिळाली. पुढे त्यांनी धोंड, कृष्णमेघ यासारख्या अनेक विज्ञानकथा लिहिल्या. 'वामन परत न आला' ही त्यांची विज्ञान कादंबरी चांगलीच लोकप्रिय झाली होती. डॉ. नारळीकर यांच्या निधनाने आंतरराष्ट्रीय कीर्तीचा खगोलशास्त्रज्ञ, श्रेष्ठ वैज्ञानिक व अतिशय लोकप्रिय विज्ञान कथाकार काळाच्या पडद्याआड गेला आहे. या थोर शास्त्रज्ञाला विनम्र श्रद्धांजली.

**विश्वेश्वर सावदेकर**/नागपूर

## वाचक पत्रे

### पाण्याचा अपव्यय टाळा

गेल्या काही वर्षांत वातावरणीय बदलामुळे पाऊस लहरी झाला आहे. त्यामुळे राज्याला पाणीपुरवठा करणाऱ्या धरण क्षेत्रातही पावसाचे आगमन उशिरा होते आणि जनतेला पावसाच्या मोसमात पाणी कपातीला सामोरे जावे लागते. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत आणिबाणी स्थिती निर्माण झाली तर त्याची ओरड होते. नळाला पाणी आले, काम झाले, तर नळ बंद करणे हा प्रकार होत असतो. पाण्याचा अपव्यय टाळणे हे तुम्हा-आम्हा सर्वांच्या हातात असते. मात्र, पाणी वाया घालवणे हा आपल्या सवयीचा जणू भागच झाला आहे. पाणी हा प्रत्येक व्यक्तीचा मलभत अधिकार आहे. भविष्यात रोजच्या पाणीपुरवठ्याच्या मागणीत प्रचंड वाढ होण्याचे संकेत वाढत्या लोकसंख्येमुळे मिळू लागले आहेत. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळत पाण्याची टंचाई निर्माण होणार नाही. समुद्राचे पाणी गोडे करणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पिण्यायोग्य उपलब्ध करणे यासाठी पालिका प्रशासनाने नियोजनबद्ध प्रयत्न केले तर भविष्यात पाणीबाणी परिस्थिती निर्माण होणार नाही. एप्रिल-मे महिन्यात तर ग्रामीण भागातील लोकांना पाण्यासाठी मोठी पायपीट करावी लागते. प्रत्येकाच्या घरात पिण्याच्या पाण्याचे थेट नळ कनेक्शन व्हावे म्हणून केंद्राने सुरू केलेल्या जल जीवन मिशन योजनेंतर्गत अनेक जिल्ह्यांत, तालुक्यात कामे अतिशय संथ गतीने सुरू आहेत. जल जीवन मिशन या योजनेसाठी महाराष्ट्र राज्य सरकारने कोट्यवधी रुपये खर्च केले. मात्र, केंद्र सरकारने सुरू केलेल्या या महत्त्वाकांक्षी योजनेला महाराष्ट्रातील तालुक्यात घरघर लागली आहे. त्यामुळे पाणी हे जीवन असून पाण्याची चोरी म्हणजे जनतेच्या सहनशीलतेचा उद्रेक होणार आणि याला तुम्ही-आम्ही सगळेच जबाबदार असणार. गेल्या दोन दशकांपूर्वी एखाद्याच्या लग्नकार्यात हवा तसा पैसा खर्च केला, तर त्यावेळी लाईक म्हणत, असे काय पाण्यासारखा पैसा खर्च केला. याचा अर्थ त्यावेळी पाण्याला फारसे महत्त्व दिले जात नसावे; मात्र आजच्या घडीला राज्यातील विविध भागात पिण्याच्या पाण्याची भयंकर टंचाई जाणवू लागली आहे.

**मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### नियोजनाचा अभाव की सुजलेली शहरे?

शहरांच्या विस्ताराच्या नादी लागलेली आपली शहरे आज पर्यावरणाच्या आणि नियोजनाच्या दुहेरी संकटात अडकली आहेत. याचे जिवंत उदाहरण म्हणजे नद्यांच्या पूर रेषेत बांधले गेलेले बंगले, अपार्टमेंट्स आणि उच्चभ्रू वसाहती जे आज एका पावसात जमीनदोस्त होत आहेत. अनेक राज्यांतील महत्त्वाच्या शहरांमध्ये वाढत्या शहरीकरणामुळे नद्यांची पात्रे आकुंचन पावत गेली. पररेषा म्हणजे नदीच्या नैसर्गिक प्रवाहासाठी राखून ठेवलेली जागा. मात्र, बिल्डर-राजकारणी-प्रशासन या त्रिकुटाच्या गाठोड्यात ही जागा 'सोन्याची खाणी' ठरली. या क्षेत्रांमध्ये मोठमोठे बंगले आणि प्रकल्प उभे राहिले. पावसाळ्यात पुराचे पाणी थेट या वसाहतींत घुसते. नुकत्याच आलेल्या मुसळधार पावसात अनेक शहरांमध्ये पूररेषेतील घरांचे मोठे नुकसान झाले. काही ठिकाणी स्थानिक प्रशासनाने अशा घरांवर कारवाई करत ती जमीनदोस्त केली, पण हा उपाय उशिरा आणि अपुरा वाटतो. हा केवळ बांधकाम व्यावसायिकांचा वा घरमालकांचा प्रश्न नाही ही एक व्यापक शहरी नियोजनाची चूक आहे. नागरिकांनी घर घेताना थोडे अधिक सजग राहणे गरजेचे आहे, पण त्याहून अधिक गरज आहे ती स्थानिक प्रशासनाने नियमांचे कडक पालन करण्याची.आज पूररेषेतील बंगले जमीनदोस्त करण्याची वेळ आली, ती केवळ निसर्गाच्या रौद्र रूपामुळे नाही, तर मानवी बेफिकिरीमुळे. आपण जर आजही शहाणपण शिकलो नाही, तर उद्याचे शहर हे अपयशी नियोजनाचा स्मारक बनून राहील.

**सागर पिंगळे**/७७५६८३६०९१

## कांदा चोरी रोखण्याची जबाबदारी अडते, व्यापारी आणि कर्मचाऱ्यांवर

### अन्यथा कारवाई करण्याचा सभापती दिलीप माने यांचा ईशारा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ मे-**

शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने पिकवलेला कांदा सोलापूर मार्केट कमिटीमध्ये विक्रीस आणल्यानंतर त्याच कांद्याचे चोरीचे प्रकार सोलापूर बाजार समितीत मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. या चोरीला आळा घालण्यासाठी बाजार समिती प्रशासनासह व्यापारी, कर्मचारी आणि सुरक्षारक्षकांनी सजग राहिले पाहिजे, अन्यथा यांच्यावर कारवाई केली जाईल. असा सज्जड इशारा सभापती दिलीप माने यांनी कांदा लिलावाच्या पाहणीवेळी दिला.

दरम्यान, सभापती माने यांनी कार्यालयीन वेळेपूर्वी मार्केट कमिटीमध्ये जाऊन कर्मचाऱ्यांसमोर चर्चा केली. कर्मचाऱ्यांनी वेळेचे बंधन पाळावे, कार्यालयीन कामकाज सांभाळून मार्केट कमिटी क्षेत्रात लक्ष देण्याची जबाबदारी देखील आपली आहे. शेतकरी मोठ्या कष्टाने कांदा व इतर शेतीमाल पिकवतात, मोठा विश्वासाने तो शेतमाल विक्रीसाठी बाजारपेठेत आणतात. मात्र या ठिकाणी त्याच शेतमालाचे चोरीचे प्रमाण वाढत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी दिसत आहे. वाढत्या चोरीचे प्रकरण घडणे योग्य नाही अशा तक्रारी उपलब्ध झाल्यास संबंधित अडते व्यापारी कर्मचारी आणि सुरक्षारक्षक यांना जबाबदार धरले जाईल असे माने यांनी सुनावले.

यावेळी त्यांनी सर्व कर्मचाऱ्यांसमवेत कांदा मार्केटमध्ये जाऊन लिलावाची पाहणी केली. तेथील स्वच्छता व्यवस्था सुरक्षारक्षकांची नेमणूक यांची माहिती घेतली. तसेच लिलावावेळी त्यांनी समक्ष थांबून शेतकऱ्यांशी संवाद साधला शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि यापुढे चोरीचे प्रकार घडणार नाहीत असा विश्वास देखील त्यांनी यावेळी शेतकऱ्यांना दिला. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या मालाची चोरी वजन मापात हेराफेरी यापुढे होणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

## छत्रपती शिवाजी महाराजस्व अभियानात...

# जिल्ह्यात ७७ हजार २०६ विविध दाखल्यांचे वाटप

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचा हटके पॅटर्न

### १२६ महसुली मंडळापैकी ७६ मंडळात शिबिरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानांतर्गत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच विविध शासकीय योजना यांच्यासाठी लागणारे प्रमाणपत्र वाटप जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्याच्या महसुली मंडळात शिबिराच्या माध्यमातून करण्यात यावे असे आदेश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी त्यांच्या हटके पॅटर्नमधून सर्व तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांना दिलेले होते. त्या अनुषंगाने दि. २५ मार्च ते २१ मे २०२५ पर्यंत १२६ महसुली मंडळापैकी ७६ महसुली मंडळात समाधान शिबिराचे आयोजन करून यामध्ये एकूण ७७ हजार २०६ दाखल्यांचे वाटप करून विद्यार्थी व पालक यांची शैक्षणिक प्रवेशासाठी होणारी गैरसोय टाळण्यात प्रशासन यशस्वी होत आहे.

या दाखल्यांमध्ये जातीचे दाखले, उत्पन्न, अधिवास, रहिवासी दाखले, नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र आदींचा समावेश आहे. शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ ची सुरुवात माहे जून २०२५ पासून होत आहे; या पार्श्वभूमीवर शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशासाठी आवश्यक जातीचे दाखले, उत्पन्न अधिवास रहिवास दाखले तसेच नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र व अन्य दाखले हे सर्व विद्यार्थी व पालकांना वेळेत मिळावे यासाठी शासनाच्या सूचनेप्रमाणे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली ११ तहसील कार्यालय व एक अप्पर तहसील कार्यालय यांच्या अंतर्गत असणाऱ्या १२६ महसुली मंडळात समाधान शिबिरे आयोजन करून परिसरातील विद्यार्थी व पालकांना आपले वाटत केले जात आहेत. आजपर्यंत ७६ शिबिरांचे आयोजन करण्यात आलेले असून, उत्तर सोलापूर तालुक्यातील सर्व पंचवीस मंडळात शिबिरे घेण्यात आलेली आहे, तर ज्या महसुली मंडळात अद्याप पर्यंत शिबिरे घेण्यात आलेली नाहीत त्या मंडळाने शिबिरांचे आयोजन करून दाखले वाटप करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले आहेत.

दि. १ मे ते २१ मे २०२५ या कालावधीत महाराजस्व अभियानांअंतर्गत २ हजार ९६९ जातीचे दाखले, १८ हजार ८३७ उत्पन्नाचे दाखले, २२७९ आदिवासी दाखले,२०९२ रहिवास दाखले, २७२६ नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र तर २६६६ इतर दाखले असे एकूण ३१ हजार ५६९ विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणेच दि. २५ मार्च २०२५ पासून ते एप्रिल २०२५ अखेरपर्यंत एकूण ४५ हजार ६३७ विविध दाखले वाटप करण्यात आलेले आहेत. तर आज रोजी पर्यंत ७७ हजार २०६ विविध शालेय दाखल्यांचे वाटप करून जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांना दिलासा देण्याचे काम प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

### एकही विद्यार्थी दाखल्याअभावी प्रवेशापासून वंचित राहणार नाही



छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील ११ तहसील कार्यालय व एक अप्पर तहसील कार्यालय अंतर्गत च्या १२६ महसुली मंडळात शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विविध दाखले व प्रमाणपत्राच्या वाटप करण्यासाठी दि. २५ मार्च २०२५ पासून समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आलेले आहे आज रोजी पर्यंत ७६ शिबिरांचे आयोजन झाले असून, ७७ हजार २०६ विविध प्रकारच्या दाखल्यांचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित महसुली मंडळातही शिबिरे घेण्याचे प्रस्तावित आहे. एक ही विद्यार्थी दाखल्या अभावी शैक्षणिक प्रवेशापासून वंचित राहणार नाही यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे.

**-कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी, सोलापूर**





**बुलेटराजांना दणका...**

**सोलापूर : शहर वाहतूक शाखेच्यावतीने फॅन्सी नंबर प्लेट, मॉडिफायड सायलेन्सर करून बुलेट वापरणाऱ्यांवर २० दुचाकींवर कारवाई करण्यात आली. यावेळी ट्रिपल सिट, लायसन आदी कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.**

## घरात पाणी शिरलेल्या ठिकाणी उपाययोजना करा : आयुक्त डॉ. ओम्बासे

### शहरातील मान्सूनपूर्व कामांची महापालिका आयुक्तांनी केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

काल झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील विविध भागात घरांमध्ये पाणी शिरले त्या ठिकाणची महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी पाहणी केली. तातडीने यासंदर्भात उपाययोजना करण्याचे आदेश आयुक्तांनी अधिकाऱ्यांना दिले.

महापालिकेच्या १ ते ८ विभागीय कार्यालयाकडून मान्सूनपूर्व कामे सुरू आहेत. सोलापूर शहरातील क्षेत्र एकूण १७८ चौरस किलोमीटर असून त्यामध्ये ४२ किलोमीटरचे उघडे नाले आहेत. तसेच वेगवेगळ्या डायमीटरचे २१७ किलोमीटरचे ड्रेनेज लाईन आहे. मान्सूनपूर्व नालेसफाई कामे सुरु करण्यात आली आहेत. त्याची पाहणी आज महापलिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केली.





- शहरातील एकूण क्षेत्रफळ १७८ चौरस किलोमीटर
- शहरात ४२ किलोमीटरचे उघडे नाले
- वेगवेगळ्या डायमीटरचे २१७ किलोमीटरचे ड्रेनेज लाईन
- महापालिकेच्या १ ते ८ विभागीय कार्यालयाकडून मान्सूनपूर्व कामे सुरू

यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता सारिका अकुलवार ,विभागीय अधिकारी, अधिकारी,कर्मचारी आदी उपस्थित होते. त्यानंतर काल सोलापूर शहरात मुसळधार पावसामुळे काही भागांमध्ये व घरामध्ये पाणी शिरले होते अश्या हांडे प्लॉट, बाळे परिसर इतर ठिकाणाची पाहणी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केली. उपस्थित असलेल्या अधिकारी यांना उपायोजना करण्यासंदर्भात सूचना दिल्या. नागरिकांकडून अडीअडचणी जाणून घेतल्या. यावेळी सामाजिक कार्यकर्ते किरण पवार व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

### जागतिक जैवविविधता दिनानिमित्त

## सिद्धेश्वर वनविहारात निसर्गफेरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ मे -**

जागतिक जैवविविधता दिनाचे औचित्य साधून सोलापूर वन विभाग, सोलापूर महानगरपालिका-माझी वसुंधरा उपक्रम तसेच वाईल्डलाईफ कॉंझर्वेशन असोसिएशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने सिध्देश्वर वन विहार येथे निसर्ग फेरी काढण्यात आली.

यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांचे मार्गदर्शनाखाली सिद्धेश्वर वन विहार सोलापूर येथे उपायुक्त किरणकुमार मोरे यांचे प्रमुख उपस्थितीत निसर्गफेरीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सोलापुरातील ज्येष्ठ पक्षीतज्ज्ञ शिवानंद हिरेमठ यांनी सोलापुरातील पक्षीवैभव व जैवविविधता दिनाचे महत्त्व यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. नंतर उपस्थित पर्यावरणप्रेमी निसर्ग फेरीसाठी रवाना झाले.



या निसर्गफेरीमध्ये पर्यावरणप्रेमींना विविध प्रकारच्या पक्ष्यांची, झाडांची, वनस्पतींची व वन्यजीवांची माहिती देण्यासाठी तर्फे शिवानंद हिरेमठ, अजित चौहान, संतोष धाकपाडे यांनी परिश्रम घेतले. सोलापूर वन विभागाचे वनरक्षक श्रीशैल पाटील यांनी सिद्धेश्वर वनविहारातील सघन वन म्हणजे मियावाकी जंगल या नवीन संकल्पनेबद्दल विस्तृत माहिती दिली. यावेळी पर्यायवरणप्रेमींनी विचारलेल्या पर्यावरणावरणासंबंधित विविध प्रश्नांची समाधानकारक उत्तरे व माहिती देण्यात आली. तसेच पर्यावरण संवर्धन व जतन करण्यासंदर्भात काय उपाययोजना करता येतील याबाबत सखोल चर्चा झाली.

या उपक्रमात सोमपा चे उपायुक्त किरणकुमार मोरे, पर्यावरण अधिकारी स्वप्नील सोलनकर, प्रवीण तळे,तसेच परस बागेचे सदस्य व वनविभागाचे प्रवीण जेऊरे, वाईल्डलाईफ कॉंझर्वेशन असोसिएशनचे साक्षी हिरेमठ, प्रवीण गावडे, सुरेश क्षीरसागर, दीपक करकी आदी पर्यावरणप्रेमी उपस्थित होते.

या उपक्रमात ५० ते ६० पर्यावरण प्रेमींनी आपला सहभाग नोंदवला.

### न्यू जॉगर्स फाउंडेशनतर्फे

## दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार


**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दिनांक २१-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ आणि केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १० वी व १२ वी वर्गातील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार समारंभ न्यू जॉगर्स फाउंडेशनच्या वतीने शासकीय मैदान नेहरूनगर येथे आयोजित करण्यात आला होता.

न्यू जॉगर्स फाउंडेशनच्या नवनिर्वाचित पदाधिकारी आणि बाली मांडेपू यांची सफाई कामगार ट्रेड युनियन महाराष्ट्र स्टेटच्या प्रदेश अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. १० वी उत्तीर्ण विद्यार्थी विश्वजीत हौसनूर, कृतिका बँकापुरे, अंजली औरसंग, संस्कृती अरवतु, हर्षवर्धन नलावडे आणि १२ वी उतीर्ण प्रतीक नसले या विद्यार्थ्यांना शाल आणि कृष्ण तुळस सत्कार करण्यात आला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आले.



यावेळी संतोष आरवत्तू, वीरेश नसले, अंबादास यादव, प्रकाश जाधव, प्रशांत जोशी, भरत धनशेट्टी,शिवराज कांबळे, अण्णाप्पा संगोळगी, जितेंद्र बंकापुरे,शांताराम शिंदे, दीपक नलावडे,उमेश पवार, दिलीप कदम, विजयसिंह बायस, योगेश जोशी, संतोष कदम, सुहास साळुंखे, अतुल लकडे, सुहास अभंगराव, विजय पाटील, मुन्ना राठोड, काशिनाथ औरसंग, सतीश घोडके, गुरुलिंग प्रचंडे, डॉ शिवप्पा मलाडे, अशोक देशपांडे आणि शिवशंकर लाळसंगी आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते.



**श्रीमंत मानाचा कसबा गणपती शहाळा महोत्सव**

**सोलापूर : कसबा पेठेतील श्रीमंत मानाचा गणपतीसमोर एक हजार शहाळे व नारळाची खुंटे वापरून रोषणाई करून शहाळा महोत्सव साजरा करण्यात आला. (छायाचित्र : केवल तिवारी)**

**CHANGE IN NAME**

I Hereby Declare that My Old Name **Pathan Rehan Rahim** has been changed to **Rehan Rahimkha Pathan** Resi. Plot No. 13, House No.216 Shastri Nagar, Solapur.

**Kindly Note the same**

**Affidavit No. 22417 Dtd.22.05.2025**

### जाहिर आवाहन
### सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

सोलापूर शहरातील नागरीकांना कळविणेत येत आहे की, सोलापूर महानगरपालिकेमार्फत सद्यस्थितीचे पावसाळयाच्या अनुषंगाने शहरामध्ये काही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास त्याचे निराकरण करण्याच्या दृष्टिकोनातून आपत्कालीन कक्ष स्थापन करुन त्या ठिकाणी अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली असून, सदर ठिकाणी २४ तास यंत्रणा कार्यरत आहे.

| अ. क्र. | कक्षाचे ठिकाण | तक्रारींचे स्वरुप | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | नगर अभियंता स्टोअर, इंद्रभुवन पुण्यश्लोक अप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर. | इमारत पडणे, झाड पडणे, सखल भागात पावसाचे पाणी साचणे, नाल्या लगत पावसाचे पाणी तुंबणे इ. | दुरध्वनी क्रमांक ०२१७-२७४०३३५ टोल फ्री नं. १८००२३३१९१६ |
| २ | सार्व. आरोग्य अभियंता स्टोअर, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय (सिव्हील हॉस्पीटल) समोर सोलापूर. | ड्रेनेज लाईन तुंबून पाणी ओव्हरफ्लो होणे तसेच ड्रेनेज संदर्भात आपत्ती, पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन फुटणे इ. | दुरध्वनी क्रमांक ०२१७-२७४०३६२ व ०२१७-२७४०३६३ टोल फ्री नं. १४४२० |

शहरातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी शहरामध्ये कोणत्याही प्रकारची आपत्ती अथवा समस्या निर्माण झाल्यास नागरीकांनी वरील ठिकाणी संपर्क साधावा. जेणेकरुन पावसाळयात होणा-या संभाव्य धोका टाळणेस, जिवित व वित्त हानी होवू नये याकरीता वरील प्रमाणे सोलापूर महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती.

**सही/-**
**(डॉ. सचिन ओम्बासे) आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांना विशेषतः गाव मौजे कुई, ता. माढा, जि. सोलापूर येथील व आसपासचे लोकांना व १) जगन्नाथ कृष्णा भोंग, २) तानाजी विश्वनाथ भोंग, ३) कलावती विश्वनाथ भोंग, ४) मैना विश्वनाथ भोंग, ५) नागनाथ विश्वनाथ भोंग, ६) तारामती विश्वनाथ भोंग, ७) अंजनाबाई विश्वनाथ भोंग, ८) शकुंतला मुकुंद राऊत सर्व रा. कुई, ता. माढा, जि. सोलापूर यांना आमचे अशिल १) देवेंद्र दत्तात्रय भोंग रा. लऊळ, ता. माढा, जि. सोलापूर, २) प्रताप दत्तात्रय भोंग, रा. माळेवाडी (अ), ता. माळशिरस, जि. सोलापूर, ३) पांडुरंग दत्तात्रय भोंग, रा. लऊळ, ता. माढा, जि. सोलापूर, ४) राजेंद्र दत्तात्रय भोंग, रा. माळीनगर, श्रीहरीनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर, ५) दिपक दत्तात्रय भोंग, रा. प्लॉट नं. १३अ, सुमित्रानगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांनी दिलेल्या व समक्ष सांगितलेल्या माहितीवरून त्यांचेतर्फे ॲड. पंकज पी. सुर्यवंशी रा. ४० फुटी रोड, महादेव मंदीराशेजारी इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे यांजकडून या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

गाव मौजे कुई, ता. माढा, जि. सोलापूर येथील जमीन गट नं. ३३४/अ व गट नं. ३३४/ब या तुमचे व आमचे अशिलांचे मालकी वहिवाटीच्या आहेत. सदर मिळकतींमध्ये सदर आमचे अशिलांचा अविभक्त हिस्सा आहे व सदर जमीन गट नं. ३३४/अ पैकी पश्चिमेची ०३ हे. ५३ आर क्षेत्रात अविभक्त हिश्यामध्ये सदर आमचे अशिलांची प्रत्यक्ष कब्जे वहिवाट आहे. तसेच सदर जमीन गट नं. ३३४/व पैकी पश्चिमेची ०५ हे. ७२ आर क्षेत्रात अविभक्त हिश्यामध्ये सदर आमचे अशिलांची प्रत्यक्ष कब्जे वहिवाट आहे. तसेच सदर आमचे अशिलांची बहिण द्वारकाबाई दत्तात्रय भोंग ही मयत असून तिस आमचे अशिलांशिवाय इतर कोणीही वारस नाहीत. असे असता सदर मिळकतींचे सदर क्षेत्रांपुरती ७/१२ मधील नवीन शर्त शेरे कमी करून भोगवटा वर्ग २ मधून भोगवटा वर्ग १ मध्ये रूपांतरण करणेकामी सदर आमचे अशिलांनी मा. जिल्हाधिकारी सो. सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर (महसूल शाखा) यांचेकडे दिनांक २४/०२/२०२५ रोजी अर्ज दाखल केले आहेत. सदरचे अर्ज चौकशी करून स्वयंस्पष्टः अभिप्रायासह परिपुर्ण अहवाल आवश्यक कागदपत्रांसह विहीत मुदतीत सादर करावा बाबत सध्या मा. मंडल अधिकारी सो. कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर यांचे कार्यालयात आले आहेत व सदरचे अर्जाचे कामकाज सध्या चालू आहे. सदर मिळकती भोगवटा वर्ग १ करणेबाबत तुमची अथवा इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची काही हरकत, तक्रार इत्यादी असल्यास तुम्ही अथवा अशा व्यक्तींनी प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ५ दिवसांचे आत आमचे खालील दिलेल्या पत्त्यावर किंवा मा. मंडल अधिकारी सो. कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर यांचे पत्त्यावर किंवा मा. अप्पर जिल्हाधिकारी सो. जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर (महसूल शाखा) या पत्त्यावर आपली हरकत नोंदवावी. सदर कालावधीत तुमची अथवा इतर कोणाचीही हरकत प्राप्त न झालेस सदर बाबत तुमची अथवा इतर कोणाचीही हरकत नाही असे समजून सदर मिळकतींचे क्षेत्रांचे नवीन शर्त शेरे कमी करून भोगवटादार वर्ग १ मध्ये रूपांतरण करणेचे कामकाज विधीग्राहय होणेसाठी पुढील कार्यवाही करणेत येईल त्यानंतर कोणाचीही तकार चालणार नाही याची नोंद घ्यावी, ही जाहीर नोटीस दिली. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे. दिनांक: २३/०५/२०२५

**सही/-**
**ॲड. पंकज सुर्यवंशी,**
**ऑफिस पत्ता : ४० फुटी रोड महादेव मंदीरा शेजारी इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे.**
**अशिल तर्फे ॲडव्होकेट**



## महत्त्वाचे

### इंग्लंड कसोटी मालिकेसाठी भारतीय संघाची निवड उद्या

**नवी दिल्ली** : इंग्लंड दौऱ्यासाठी भारताचा कसोटी संघ निवडण्यासाठी अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय निवड समितीची शनिवार, २४ मे रोजी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) मुख्यालयात बैठक होणार आहे. रोहित शर्मा व कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतर, निवड समिती शुभमन गिलला नवीन कर्णधार म्हणून नियुक्त करण्याची शक्यता आहे, तर जून ते ऑगस्ट दरम्यान खेळल्या जाणाऱ्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी ऋषभ पंतला त्याचा उपकर्णधार म्हणून निवडले जाण्याची शक्यता जास्त आहे. राष्ट्रीय निवड समितीने संघासाठी नवीन कर्णधार निवडण्याचा निर्णय घेतला आहे व जसप्रीत बुमराह पाचही कसोटी सामन्यांसाठी उपलब्ध असण्याची शक्यता कमी असल्यामुळे निवडकर्त्यांना मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरच्या मार्गदर्शनाखाली गिलसारख्या तरुण कर्णधाराला तयार करायचे आहे आणि त्याला दीर्घकाळ संघात स्थान द्यायचे आहे. गिलने भारतासाठी कसोटी क्रिकेटमध्ये तिसऱ्या क्रमांकावर सलामीवीर म्हणून खेळला आहे आणि त्याने ३२ कसोटी सामन्यांमध्ये पाच शतके आणि सात अर्धशतकांसह १८९३ धावा केल्या आहेत.

### जोकोविच, सिनर एकाच गटात

**पॅरिस** : आगामी फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेसाठी गुरुवारी पॅरिसमधील रोलँड गॅरोस येथे झालेल्या ड्रॉनुसार नोवाक जोकोविच व जॅनिक सिनर एकाच गटात आहे. गत वर्षीचा उपविजेता अॅलेक्झांडर झ्वेरेव्ह आणि तीन वेळा विजेता नोवाक जोकोविच उपांत्यपूर्व फेरीत एकमेकांना भिडू शकतात आणि विजेत्याची अंतिम फेरीत स्थान मिळविण्यासाठी सिनरशी लढण्याची शक्यता आहे. द्वितीय विश्वमानांकित स्पेनचा कार्लोस अल्काराझ आपल्या फ्रेंच ओपन जेतेपदाच्या बचावाची सुरुवात जपानच्या केई निशिकोरीविरुद्ध पहिल्या फेरीत करेल. प्रथम विश्वमानांकित जॅनिक सिनर सलामीच्या सामन्यात फ्रान्सच्या आर्थर रिंडरकनेचशी लढेल. इटालियन ओपनमध्ये तीन महिन्यांच्या डोपिंग बंदीनंतर परतलेला २३ वर्षीय सिनर दुसऱ्या फेरीत फ्रान्सचा आणखी एक खेळाडू वाइल्डकार्डधारी रिचर्ड गास्केटशी लढू शकतो. ३८ वर्षीय गास्केट आपल्या २२ व्या आणि शेवटच्या खेळानंतर व्यावसायिक टेनिसमधून निवृत्त होणार आहे. अपेक्षित उपांत्यपूर्व फेरी अशी आहेत - सिनर विरुद्ध पाचवा मानांकित ब्रिटीश जॅक ड्रेपर, झ्वेरेव्ह विरुद्ध नोवाक जोकोविच, आठवा मानांकित इटालियन लोरेन्झो मुसेट्टी विरुद्ध चौथा मानांकित अमेरिकन टेलर फ्रिट्झ आणि अल्काराझ विरुद्ध दोन वेळा उपविजेता कॅस्पर रुड.

### पाचव्या जेतेपदासाठी स्वियातेकचा मार्ग कठीण

**पॅरिस** : गुरुवारी पॅरिसमधील रोलँड गॅरोस येथे झालेल्या ड्रॉनुसार, जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकाची आर्यना साबालेन्का पहिल्या फ्रेंच ओपन जेतेपदासाठी तिच्या मोहिमेची सुरुवात कामिला राखिमोवाविरुद्ध पहिल्या फेरीत करणार आहे. पाचव्या मानांकित आणि चार वेळा विजेती इगा स्वियातेक आपल्या स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात स्लोवाकियाच्या रेबेका स्रामकोवाशी लढेल. पोलंडच्या २३ वर्षीय स्वियातेकचा संभाव्य पाचव्या जेतेपदासाठीचा प्रवास कठीण आहे, कारण ती तिसऱ्या फेरीतच युक्रेनियन मार्टा कोस्ट्युकविरुद्ध लढू शकते. अंतिम सोळाच्या फेरीत स्वियातेक माजी विजेत्या जेलेना ओस्टापेन्कोशी सामना करू शकते, जिच्याविरुद्ध तिच्याविरुद्ध ६-० असा हेड-टू-हेड रेकॉर्ड आहे.


### क्लब विश्वचषकानंतर लुका रिअल माद्रिद सोडणार

**माद्रिद** : क्लब विश्वचषकानंतर लुका मॉड्रिक रिअल माद्रिद सोडेल आणि या आठवड्याच्या शेवटी सॅण्टियागो बर्नाबेऊ येथे आपला शेवटचा सामना खेळेल, असे क्रोएशियन मिडफिल्डरने गुरुवारी सांगितले. लुका मॉड्रिक हा रिअल माद्रिद क्लबचा सर्वात यशस्वी खेळाडू असून त्याने २०१८ चा बॅलन डीओर पुरस्कार पटकावला होता. २०१२ मध्ये क्लबमध्ये आलेल्या मॉड्रिकने रिअलसाठी जवळजवळ ६०० सामने खेळले आहेत आणि जवळजवळ ३० ट्रॉफी जिंकल्या आहेत, ज्यात विक्रमी सहा चॅम्पियन्स लीग जेतेपदे आणि चार ला लीगा ट्रॉफींचा समावेश आहे. ३९ वर्षीय मॉड्रिक पुढील महिन्यात सुरू होणाऱ्या क्लब वर्ल्ड कप मोहिमेनंतर निवृत्त होईल. वेळ आली आहे. तो क्षण मी कधीच येऊ इच्छित नव्हतो, पण तो फुटबॉल आहे, आणि आयुष्यात प्रत्येक गोष्टीची सुरुवात आणि शेवट असतो... शनिवारी मी सॅण्टियागो बर्नाबेऊ येथे माझा शेवटचा सामना खेळेन, असे लुका मॉड्रिकने इंस्टाग्रामवर लिहिले. रिअल माद्रिदकडून खेळल्याने फुटबॉल खेळाडू आणि व्यक्ती म्हणून माझे आयुष्य बदलले. इतिहासातील सर्वोत्तम क्लबच्या सर्वात यशस्वी युगांपैकी एकाचा भाग असल्याचा मला अभिमान आहे, असेही तो म्हणाला.

# आरसीबीचे अव्वल स्थानावर लक्ष्य

**◆ लखनौ, २२ मे**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामाच्या अंतिम टप्प्यात शुक्रवारी एकाना स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू व सनरायझर्स हैदराबाद यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. प्लेऑफमध्ये पोहोचल्यानंतर बंगळुरू नऊ वर्षांत प्रथमच साखळी फेरीत अव्वल दोनमध्ये स्थान मिळवण्याचे लक्ष्य ठेवेल.



२०१६ च्या हंगामात उपविजेता राहिल्यापासून तेव्हापासून आरसीबीला पहिल्या दोन क्रमांकामध्ये स्थान मिळवता आलेले नाही. सध्या आयपीएल हंगामाच्या गुणतालिकेत आरसबी १२ सामन्यांतील १७ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे, उर्वरित दोन सामन्यांमधील विजयामुळे त्यांना अव्वल दोन स्थान मिळू शकते.

वास्तविक शुक्रवारी होणारा हा सामना मूळतः बंगळुरू संघासाठी घरच्या मैदानावर होता, परंतु पाऊस पडण्याची शक्यता असल्याच्या शक्यतेमुळे तो लखनौमध्ये हलवण्यात आला.

भारत-पाकिस्तान लष्करी संघर्षामुळे लीगमध्ये व्यत्यय येण्यापूर्वी आरसीबी जोरदार फॉर्ममध्ये होता व संघाने सलग चार विजय मिळवले होते.

आरसीबीचा भरवशाचा व तडाखेबंद विराट कोहली सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. त्याने ११ डावांमध्ये सात अर्धशतके झळकावली आहेत व संघाच्या अव्वल फळीला बळकटी दिली आहे. कर्णधार रजत पाटीदार, टिम डेव्हिड व रोमारियो शेफर्डने मोक्याच्या क्षणी जोरदार फटकेबाजी करून त्याला चांगली साथ दिली आहे.

भारतद-पाक संघर्ष होण्याच्या अगदी आधी पाटीदारचा फॉर्म कमी झाला. पहिल्या पाच सामन्यात त्याने ३७.२ च्या सरासरीने धावा काढल्या होत्या, परंतु पुढील पाच सामन्यात तो १०.६ च्या सरासरीने केवळ ५३ धावा करू शकला. चेन्नई सुपर किंग्जविरुद्धच्या घरच्या सामन्यात त्याच्या बोटाला दुखापत झाली.तथापि, तो पुन्हा एकदा नेटमध्ये मुक्तपणे फलंदाजी करत आहे आणि हे आरसीबीसाठी एक आशादायक संकेत आहे. कृणाल पंड्या व सुयश शर्मा ही फिरकी जोडी खूप प्रभावी ठरली आहे तर जोश हेझलवूड व यश दयालने वेगवान गोलंदाजी करत आहेत.

> **आजचा सामना**
>
> **रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू वि. सनरायझर्स हैदराबाद**
>
> **स्थळ** : एकाना स्टेडियम, लखनौ
>
> **वेळ** : सायं. ७ .३० वाजतापासून
>
> **थेट प्रसारण** : स्टार स्पोर्टस्वर



तथापि, हेझलवूड खांद्याच्या दुखापतीतून सावरत असल्याने तो या सामन्यासाठी उपलब्ध राहणार नाही.या सामन्यात आणि त्यानंतरही आरसीबीचे बहुतेक परदेशी खेळाडू उपलब्ध आहेत.

गत वर्षीच्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या सनरायझर्स हैदराबाद संघाने लखनौ सुपर जायण्ट्सवर सहा गड्यांनी विजय मिळवला आहे आणि हीच गती कायम राखण्यासाठी व या विस्मरणीय हंगामाचा शेवट उच्च पातळीवर करण्यास उत्सुक आहे.

सलामीवीर अभिषेक शर्मा व ट्रॅव्हिस हेड चमकदार कामगिरी करत असले त्यांचा हैदराबाद संघ गुणतालिकेत आठव्या स्थानावर पोहोचले आहेत.

कर्णधार पॅट कमिन्स व भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी हे दिग्गज खेळाडू असूनही, त्यांच्या गोलंदाजी विभागाला सांघिक कामगिरी करण्यात व महत्त्वाच्या क्षणी नियंत्रण मिळविण्यात संघर्ष करावा लागत आहे. ◂(वृत्तसंस्था)

# इंग्लंड दौऱ्यासाठी १९ वर्षांखालील भारतीय संघाची घोषणा

## आयुष म्हात्रे कर्णधार; वैभव सूर्यवंशीचा समावेश

**◆ नवी दिल्ली, २२ मे**

राष्ट्रीय कनिष्ठ गट क्रिकेट समितीने २४ जून ते २३ जुलै २०२५ दरम्यान होणाऱ्या इंग्लंड दौऱ्यासाठी भारताच्या १९ वर्षांखालील संघाची घोषणा केली आहे. महिनाभर चालणाऱ्या या दौऱ्यात ५० षटकांचा सराव सामना, पाच सामन्यांची युवा एकदिवसीय मालिका आणि इंग्लंड अंडर-१९ विरुद्ध दोन बहु-दिवसीय सामन्यांचा समावेश आहेत.

**भारतीय संघ असा** : आयुष म्हात्रे (कर्णधार), वैभव सूर्यवंशी, विहान मल्होत्रा, मौल्यराजसिंह चावडा, राहुल कुमार, अभिज्ञान कुंडू (उपकर्णधार व यष्टिरक्षक), हरवंश सिंग (यष्टिरक्षक), आर. एस. अंबरीश, कनिष्क चौहान, खिलन पटेल, मोहम्मद पटेल, युवराज पटेल, युवराज सिंह, रावल ईनान, आदित्य राणा, अनमोलजीत सिंग. **राखीव खेळाडू** : नमन पुष्पक, डी. दीपेश, वेदांत त्रिवेदी, विकास तिवारी, अलंकृत रापोले (यष्टिरक्षक). ◂(वृत्तसंस्था)






**इंग्लंड दौऱ्याचे वेळापत्रक**

- २४ जून, लॉफब्रुग युनिव्हर्सिटी मैदान, येथे ५० षटकांता सराव सामना
- २७ जून, होव येथे पहिला वन-डे सामना
- ३० जून, नॉर्दम्पटन येथे दुसरा वन-डे सामना
- २ जुलै, नॉर्दम्पटन येथे तिसरा वन-डे सामना
- ५ जुलै, वॉर्सेस्टर येथे चौथा वन-डे सामना
- ७ जुलै, वॉर्सेस्टर येथे पाचवा वन-डे सामना
- १२ ते १५ जुलै, बेकेनहॅम येथे तीन दिवसीय सामना
- २० ते २३ जुलै, चेल्मफोर्ड येथे तीन दिवसीय सामना

# किदाम्बी श्रीकांत उपांत्यपूर्व फेरीत



**मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन**

**◆ क्वालालम्पूर, २२ मे**

अभारताचा अनुभवी बॅडमिंटनपटू किदाम्बी श्रीकांतने गुरुवारी येथे झालेल्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात आयर्लण्डच्या न्हाट न्गुयेनला पराभूत करून मलेशिया मास्टर्सच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

श्रीकांतने जागतिक क्रमवारीत ३३ व्या स्थानावर असलेल्या न्गुयेनविरुद्ध ५९ मिनिटांच्या लढतीत २३-२१, २१-१७ असा विजय मिळवला.

दीर्घकाळ वाईट कामगिरीमुळे जागतिक क्रमवारीत ६५ व्या स्थानावर घसरलेल्या श्रीकांतचा सामना अंतिम आठच्या फेरीत फ्रान्सच्या टोमा ज्युनियर पोपोव्हशी होईल. पोपोव्हने दुसऱ्या फेरीच्या सामन्यात आणखी एक भारतीय आयुष शेट्टीचा २१-१३, २१-१७ असा पराभव केला.

सतीश करुणाकरन्लाही पराभव पत्करावा लागला. टोमाचा भाऊ आणि दुहेरीचा साथीदार क्रिस्टो पोपोव्हने त्याला १४-२१, १६-२१ असा पराभव पत्करावा लागला. दुहेरीत, तनिषा क्रॅस्टो व ध्रुव कपिलाने फ्रान्सच्या ली पालेर्मो आणि ज्युलियन मायो यांचा २१-१७, १८-२१, २१-१५ असा पराभव करून मिश्र प्रकाराच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. त्यांचा पुढील सामना जियांग झेन बँग आणि वेई या झिन या चिनी जोडीशी होईल. ◂(वृत्तसंस्था)

### दिल्ली कॅपिटल्सच्या मुकेश कुमारला दंड

**◆ मुंबई, २२ मे**

दिल्ली कॅपिटल्सचा वेगवान गोलंदाज मुकेश कुमारला बुधवारी मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात आयपीएलच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल त्याच्या सामन्याच्या व शुल्काच्या १० टक्के व आयपीएलच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल एक डिमेरिट पॉइंट ठोठावण्यात आला.

'मुकेश कुमारने कलम २.२ (सामनादरम्यान क्रिकेट उपकरणे किंवा कपडे, मैदानी उपकरणे किंवा फिक्स्चर आणि फिटिंग्जचा गैरवापर) अंतर्गत लेव्हल १ चा गुन्हा मान्य केला आहे आणि मॅच रेफरीची शिक्षा स्वीकारली आहे. लेव्हल १ च्या आचारसंहितेच्या उल्लंघनासाठी, मॅच रेफरीचा निर्णय अंतिम व बंधनकारक आहे, असे आयपीएलच्या निवेदनात म्हटले आहे. या हंगामात, मुकेश दिल्ली कॅपिटल्सच्या आतापर्यंतच्या १३ पैकी ११ सामन्यांमध्ये खेळला आहे. त्याने ३२.६३ च्या सरासरीने आणि १०.११ च्या इकॉनॉमीने ११ बळी टिपले आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# हॉकी प्रो लीग युरोपियन लेगसाठी भारतीय पुरुष संघाची घोषणा

**◆ नवी दिल्ली, २२ मे**

हॉकी इंडियाने गुरुवारी एफआयएच हॉकी प्रो-लीग २०२४-२५ च्या युरोपियन लेगसाठी २४ सदस्यीय भारतीय पुरुष संघाची घोषणा केली. हा युरोपियन लेग ७ ते २२ जून दरम्यान नेदरलॅण्डमधील अॅमस्टेलवीन व बेल्जियममधील अॅण्टवर्प येथे होणार आहे.

अनुभवी ड्रॅगफ्लिकर हरमनप्रीत सिंग संघाचे नेतृत्व करत राहील आणि मिडफिल्डमधील हुकमी खेळाडू हार्दिक सिंग उपकर्णधार म्हणून त्याच्यासोबत सहभागी होईल.

भारत आपल्या युरोपियन लेगची सुरुवात ७ आणि ९ जून रोजी नेदरलॅण्डविरुद्ध प्रत्येकी दोन सामन्यांनी करेल, त्यानंतर ११ व १२ जून रोजी अॅमस्टेलवीनमधील वॅग्नर स्टेडियमवर अर्जेंटिनाविरुद्ध दोन सामने खेळेल. त्यानंतर संघ १४ व १५ जून रोजी ऑस्ट्रेलियाचा सामना करण्यासाठी अॅण्टवर्पला जाईल व त्यानंतर २१ आणि २२ जून रोजी यजमान बेल्जियमविरुद्धचा त्यांचा शेवटचा सामना होईल. संघात



हॉकी प्रो-लीग युरोपियन लेगसाठी भारतीय पुरुष संघ सज्ज

गोलरक्षक म्हणून कृष्ण बहादूर पाठक व सूरज करकेराचा समावेश आहे. सुमित, अमित रोहिदास, जुगराज सिंग, नीलम संजीप झेस, कर्णधार हरमनप्रीत सिंग, जर्मनप्रीत सिंग, संजय व यशदीप सिवाच संघाच्या बचावफळीची धुरा सांभाळतील.

मध्य फळीत राजकुमार पाल, निलकांत शर्मा, उपकर्णधार हार्दिक सिंग, तरुण प्रतिभावान राजिंदर सिंग, मनप्रीत सिंग, विवेक सागर प्रसाद आणि शमशेर सिंग आहेत तर गुरजंत सिंग, अभिषेक, शिलानंद लाक्रा, मनदीप सिंग, ललित कुमार उपाध्याय, दिलप्रीत सिंग आणि सुखजीत सिंग हे आक्रमक असतील.

भारताने या वर्षाच्या सुरुवातीला भुवनेश्वर येथे २०२४-२५ च्या हॉकी प्रो-लीगचा होम लेग खेळला होता, जिथे त्यांनी आठ सामन्यांत पाच विजयांसह पंधरा गुण मिळवले आणि आता गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर आहे. लीगमधील सर्वोच्च स्थानावर असलेल्या संघाने २०२६ च्या पुरुष हॉकी विश्वचषकात स्थान मिळवल्याने, भारत त्यांच्या कामगिरीत सुधारणा करण्याची आणि स्पर्धेतील उर्वरित आठ सामन्यांमध्ये जास्तीत जास्त गुण मिळविण्याची आशा करेल. ◂(वृत्तसंस्था)

# सोलापुरात ९ वर्षाखालील राज्य निवड बुद्धिबळ स्पर्धा सोमवारपासून

**२० हजार रुपयांची पारितोषिके, चषक व मेडल्स देणार**

**सोलापूर, दि. २२ मे-**

महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटना यांच्या मान्यतेने तसेच सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशन व हेरिटेज समुहाच्या सहकार्याने सोलापुर चेस अकॅडमीने '' चषक'' ९ वर्षाखालील खुला व मुलींच्या राज्यस्तरीय निवड चाचणी बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन सोमवार दिनांक २६ ते २७ मे दरम्यान आयोजन हेरिटेज गांधीनगर येथे केले आहे.

जागतिक बुद्धिबळ संघटनेच्या स्विस लीग नियमानुसार एकूण आठ फेऱ्यात स्पर्धा संपन्न होणार असुन खेळाडूंना प्रत्येकी ३० मिनिटे व प्रत्येक चालीला ३० सेकंद वाढीव वेळ देण्यात येणार आहे. या स्पर्धेत दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेले खेळाडू सहभाग घेऊ शकतात. सदर स्पर्धेतुन दोन मुले व दोन मुलींची निवड राष्ट्रीय अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेसाठी करण्यात येणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना २० हजार रकमेची रोख पारितोषिके व आकर्षक चषक व मेडल्स देण्यात येणार आहेत.

या स्पर्धेतुन निवड झालेल्या खेळाडूंना राज्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी प्राप्त होणार आहे. जिल्हा पातळीवर निवड झालेल्या खेळाडूंची राहण्याची मोफत सोय अकॅडमीकडून केली जाणार असुन या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सोलापुर जिल्ह्यातील तसेच राज्यभरातील नवोदित बिगरमानांकित बुद्धिबळ खेळाडूंसह आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडू यांचा सहभाग निश्चित झाल्याची माहिती संस्थेचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड यांनी सांगितली आहे. इच्छुक खेळाडूंनी अधिक माहितीसाठी वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे मो.क्र. ८८८८०४५३४४ यांच्याकडे संपर्क साधावा, असे अकॅडेमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर यांनी कळविले आहे. या स्पर्धेत भाग घेण्याचे आवाहन सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष खासदार धैर्यशील मोहिते पाटील, हेरिटेज समूहाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज शहा, सहसंचालक अमृता मखिजा, महाराष्ट्र चेस असोसिएशनचे निरंजन गोडबोले आदींनी केले आहे.

### थायलंड खुल्या मुष्टियुद्ध स्पर्धेसाठी १९ सदस्यीय संघाची घोषणा

**नवी दिल्ली** : भारतीय मुष्टियुद्ध महासंघाने (बीएफआय) आगामी २४ मे ते १ जून दरम्यान बँकॉक येथे होणाऱ्या चौथ्या थायलंड खुल्या आंतरराष्ट्रीय मुष्टियुद्ध स्पर्धेसाठी १९ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे.

१० पुरुष व ९ महिलांचा समावेश असलेल्या या भारतीय संघाची निवड पतियाळा येथील नेताजी सुभाष नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स येथे सुरू असलेल्या एलिट राष्ट्रीय शिबिरातून करण्यात आली आहे, जो हंगाम महत्त्वाच्या स्पर्धांकडे वाटचाल करत आहे.

आशियाई बॉक्सिंगच्या तत्वाखाली आयोजित होणाऱ्या थायलंड ओपनमध्ये चीन, कझाकस्तान, उझबेकिस्तान, जपान, कोरिया व यजमान देश थायलंड सारख्या बलाढ्य संघ स्पर्धा करतील.

# क्रीडा संघटनांसाठी निधी नियमांमध्ये सुधारणा

**◆ नवी दिल्ली, २२ मे**

जागतिक क्रीडा महासत्ता आणि २०३६ च्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांचे संभाव्य यजमान होण्याच्या भारताच्या महत्त्वाकांक्षेला बळकटी देण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल म्हणून, युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने राष्ट्रीय क्रीडा महासंघांना (एनएसएफ) सहाय्य योजनेअंतर्गत सुधारित निकषांचे अनावरण केले आहे.

फेब्रुवारी २०२२ नंतरचा हा पहिलाच बदल - पॅरिस २०२४ नंतरच्या नवीन ऑलिम्पिक चक्राशी सुसंगत आहे आणि भारताच्या क्रीडा क्षेत्रात वाढत्या गरजा व आव्हानांना संबोधित करतो.

प्रशिक्षण, पायाभूत सुविधा, उपकरणे व खेळाडू कल्याणाच्या वाढत्या खर्चाचे प्रतिबिंबित करून, सुधारित निकषांमध्ये प्रमुख क्षेत्रांमध्ये वाढीव आर्थिक मदतीचे आश्वासन दिले आहे. राष्ट्रीय स्पर्धांना आता वाढीव पाठिंबा मिळेल, ज्यामध्ये उच्च प्राधान्य असलेल्या खेळांना ९० लाख व प्राधान्य असलेल्या खेळांना ७५ लाख मिळतील - पूर्वीच्या ५१ लाखांच्या मर्यादेपेक्षा ही एक मोठी वाढ आहे. भारतात आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजित करण्याचे बजेट देखील दुप्पट झाले आहे, आता क्रीडा महासंघांना २ कोटी पर्यंत प्रवेश मिळू शकेल.

खेळाडूंच्या प्रवासाचा कणा मानल्या जाणाऱ्या प्रशिक्षकांना आता मानधनात लक्षणीय वाढ दिसेल. मुख्य राष्ट्रीय प्रशिक्षकांना मासिक वेतन ५ लाखांवरून ७.५ लाख रुपये मिळणार आहे, तर इतर प्रशिक्षकांना २ लाखांवरून ३ लाख रुपये मिळणार आहेत.

त्याचबरोबर, खेळाडूंच्या आहार शुल्कातही मोठी वाढ झाली आहे. वरिष्ठ खेळाडूंना आता दररोज १००० रुपये आणि कनिष्ठ खेळाडूंना अनुक्रमे ८५० रुपये आणि ४८० रुपये मिळतील.

नवीन चौकटीचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे तळागाळातील खेळाडूंच्या विकासावर भर देणे. प्रत्येक एनएसएफला आता त्यांच्या वार्षिक बजेटच्या किमान २० टक्के कनिष्ठ व युवा विकासासाठी वाटप




करण्याचे बंधन आहे. महासंघाने वरिष्ठ आणि कनिष्ठ दोन्ही स्तरावरील खेळाडूंचा एक 'संभाव्य गट' देखील शोधला पाहिजे, जो उच्च कामगिरीची क्षमता असलेला असेल.

या खेळाडूंना पारदर्शक प्रक्रियेद्वारे निवडलेल्या आणि खेळाच्या उच्च-कार्यक्षमता संचालक (एचपीडी) यांच्या देखरेखीखाली असलेल्या मान्यताप्राप्त अकादमींमध्ये प्रशिक्षण दिले जाईल. पोषण सुसंगतता सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक खेळाडूला शिबिराच्या बाहेरील काळात आहार भत्ता म्हणून दरमहा १० हजार रुपये मिळतील.

भारताची कोचिंग इकोसिस्टम मजबूत करण्यासाठी, ही योजना आपल्या अर्थसंकल्पाच्या १० टक्के केवळ प्रशिक्षक विकासासाठी राखीव ठेवते. हे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रम, अभ्यासक्रमांचा विकास, कार्यशाळा आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना समर्थन देईल. ◂(वृत्तसंस्था)

## नेहरूनगर शासकीय मैदानावर

# आजपासून दोन दिवसीय योग शिबिर

## केंद्रीय संचार ब्यूरो आणि जिल्हा क्रीडा कार्यालय यांचा उपक्रम

**सोलापूर, दि. २१ मे-**

दरवर्षी २१ जून हा ''आंतरराष्ट्रीय योग'' दिन म्हणून साजरा केला जातो. ''एक पृथ्वी एक आरोग्यासाठी योग'' ही यावर्षीची संकल्पना आहे. लहान मुले-मुली, युवा-युवती, खेळाडू आणि वरिष्ठ नागरिक यांच्यामध्ये योग दिन आणि योग अभ्यासाचा सराव व्हावा या उद्देशाने केंद्रीय संचार ब्यूरो आणि जिल्हा क्रीडा कार्यालय सोलापूर यांच्या सयुंक्त विद्यमाने शासकीय मैदान, नेहरू नगर येथे २३ व २४ मे रोजी सकाळी ६ ते ८ यावेळेत योग शिबिराचे आयोजन केले आहे, अशी माहिती सहायक प्रसिद्धी अधिकारी अंबादास यादव यांनी दिली आहे.

या योग शिबिराला आमदार सुभाष देशमुख, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह, जिल्हा माहिती अधिकारी सुनिल सोनटक्के, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, नीर सोशल फौंडेशनचे अध्यक्ष हेमंत जाधव, न्यू जॉगर्स फौंडेशनचे अध्यक्ष संतोष आरवत्तु, उपाध्यक्ष वीरेश नसले आणि केंद्रीय संचार ब्यूरोचे निवृत्त अधिकारी सतीश घोडके आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.




### क्यू आर कोडच्या माध्यमातून मोबाईलमध्ये आसनांची माहिती

भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाने निश्चित केलेल्या ४५ मिनिटाचे कॉमन योग प्रोटोकॉल अनुसार प्रार्थना, शिथिलीकरण, दंड स्थितीतील ताडासन, वृक्षासन, पादहस्तासन, अर्ध चक्रासन, त्रिकोणासन, बैठक स्थितीतील दंडासन, भद्रासन/बध्दकोनासन, वज्रासन, अर्ध उष्ट्रासन उष्ट्रासन, शशांकासन, उत्तान मंडूकासन, वक्रासन, पोटावर झोपून करावयाची आसने मकरासन, भुजंगासन, शलभासन, पाठीवर झोपून करावयाची आसने सेतुबंध सर्वांगासन, उत्तानपादासन, अर्धहलासन, पवनमुक्तासन, शवासन, कपालभाती, प्राणायाम, ध्यान, संकल्प आणि शांति पाठ आदी आसनांचा सराव योग सेवा मंडळाचे संस्थापक तथा योगगुरू मनमोहन भुतडा, विवेकानंद केंद्राचे नगर प्रमुख रवी कंटली आणि त्यांचे सहकारी घेणार आहेत. तसेच शिबिरात घेण्यात येणाऱ्या सर्व आसनांची माहिती नागरिकांना क्यू आर कोडच्या माध्यमातून मोबाईल मध्ये बघता यावी अशी व्यवस्था शिबिराच्या ठिकाणी करण्यात आली आहे. या योग शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# सहकार शिरोमणीची फसवणूक केल्याप्रकरणी वाहन मालकास अटक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २२ मे -**

ऊस तोडणी करुन वाहनांद्वारे ऊस पुरवठा करण्याचे करार करून, प्रत्येकी ५ लाख प्रमाणे एकूण १५ लाख रूपये उचल घेऊनही संबंधित यंत्रणा न पुरविता (चंद्रभागानगर) भाळवणी येथील सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे नुकसान व फसवणूक केल्याप्रकरणी ३ ज़णांविरूद्ध ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. यातील दुसरा आरोपी याला पोलिसांनी मेडद ता.माळशिरस येथून अटक करण्यात आली होती. दरम्यान या आरोपीस २१ मे २०२५ ते २२ मे २०२५ पर्यंत पोलिस कोठडी देण्यात आलेली होती. त्यानंतर न्यायालयात हजर केले असता न्यायालयीन कोठडीत रवानगी झाली आहे. देविदास विठ्ठल तरडे, राणी देविदास तरडे (रा.बज़रंग वस्ती, कचरेवाडी, ता.माळशिरस) व यशवंत बाळासाहेब लवटे (रा.मेडद, ता.माळशिरस) अशी गुन्हा दाखल झालेल्या तिघांची नावे आहेत. सन २०२४-२५ या ऊस गळीत हंगामात 'सहकार शिरोमणी' साखर कारखान्यासाठी मजुरां मार्फत ऊस तोडणी करून वाहनांद्वारे पुरवठा करण्याबाबतचे करार यातील तिघांनी केलेले होते. त्यापोटी कारखान्याने त्यांना प्रत्येकी ५ लाख रूपये प्रमाणे एकूण १५ लाख रूपये निशिगंधा सहकारी बँकेतून अदा केले होते. प्रत्यक्षात ऊस गळीत हंगाम सुरू झाल्यानंतर यातील तिन्ही वाहन मालक यंत्रणेसह कारखान्याकडे हज़र झाले नाहीत. 'सहकार शिरोमणी'कडे करार करून, पैसे घेऊन ते अन्य कारखान्यांकडे ऊस तोडणी -वाहतूक यंत्रणा घेऊन गेल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे कारखान्याचे नुकसान व फसवणूक केल्याबाबतची फिर्याद शेती अधिकारी प्रतापराव थोरात यांनी ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल केली. मात्र, गुन्हा दाखल झाल्यानंतर तिन्ही ठेकेदार पसार झाले होते. अखेर यातील देविदास तरडे याला अटक केली होती. दुसरा आरोपी यशवंत बाळासाहेब लवटे (रा.मेडद, ता.माळशिरस) यांना पोलिसांनी अटक केली आहे त्यास गुरुवारी २२ मे २०२५ न्यायालयात हज़र केले असता त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्याचे आदेश देण्यात आले आहे.कारखान्याच्या वतीने ड.बी.व्ही.भादुले यांनी काम पाहिले. सदर गुन्हयाचा तपास पंढरपूर ग्रामीण पोलिस स्टेशनचे पी.आय.श्री.हुंबे व पी.एस.आय. श्री.राऊत हे पुढील तपास करीत आहे.



गेल्या २५ वर्षात 'सहकार शिरोमणी'ने कधीही ऊस वाहतूकदार वाहन मालकांविरूद्ध तक्रार दाखल केली नाही. उलट ज्यांच्या टोळ्या पळून गेल्या, त्यांना कारखान्याने सर्व कायदेशीर मदत केली. येणारा खर्चही भरला. ज्या कारखान्याकडे करार करून पैसे उचललेले असतात, त्याच कारखान्यास ऊस पुरवठा करणे अपेक्षित असतो. परंतु, गत हंगामात कांही ज़णांनी 'सहकार शिरोमणी'कडे करार करून अन्य कारखान्यांना ऊस पुरवठा केला. त्यामुळे कारखान्याचे नुकसान आणि फसवणूक झाली आहे म्हणून पंढरपूर ग्रामीण पोलिस स्टेशन मध्ये तक्रार दाखल करावी लागली. त्या अनुषंगाने पोलिसांनी आरोपीस अटक केली त्यामुळे तोडणी वाहतुक ठेकेदारांच्या मध्ये वचक बसेल अशी अपेक्षा आहे.

# अखेर बार्शी शहर पोलिसांनी काढला बेवारस वाहनांचा लिलाव

## ५ लाख ११ हजारांला गेली बोली

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २२ मे -**

बार्शी शहर पोलीस ठाणे येथे अनेक वर्षांपासून पडून असलेल्या बेवारस वाहनाचा जाहीर लिलावाची कायदेशीर प्रक्रिया पार पडली असून १२३ मोटारसायकल, १९ ऑटोरिक्षा व इतर चारचाकी वाहने ११ अशा १५३ वाहनाच्या लिलावातून ५ लाख ११ हजार रुपयांचा महसूल शासनाला मिळाला आहे.



याबाबत अधिक माहिती देताना पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे म्हणाले की, या सर्व वाहनांचे आरटीओ कार्यालयाने ४,९८,३०० रुपये व्हॅल्युएशन निश्चित केले होते. सदर लिलावामध्ये बार्शी व पंचक्रोशीमधील ३५ व्यापाऱ्यांनी सहभाग नोंदवला. लिलावाची सरकारी बोली ५ लाख रुपये होती. सदरचा लिलाव हा ५,११,००० रुपयाला एस. आर. एंटरप्राइजेस, बार्शीचे सुरज राऊत यांनी घेतला. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, नायब तहसीलदार रवींद्र सानप, नालपे उपस्थित होते. ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, पोलीस निरीक्षक बार्शी शहर बालाजी कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली बार्शी शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश गळगटे, पोहेकॉ कदम व त्यांच्या टीमने विशेष प्रयत्न केले.

# बार्शी-कांदलगाव-शिरसाव रस्त्यावरील पुलासाठी ४ कोटी रुपये मंजूर : गोरे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२२ मे-**

बार्शी - कांदलगाव - शिरसाव रस्त्यावरील पुलासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे य़ांनी चार कोटी रूपयांचा निध मंजूर केल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे आभार व्यक्त होत आहेत. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते दि. ६ मे रोजी कांदलगाव येथील पंतप्रधान ग्राम सडक योजनेंतर्गत रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन झाले होते. त्यावेळी माजी आमदार राजाभाऊ राऊत यांनी बार्शी कांदलगाव रस्त्यावरील पूल मंजूर करण्याची मागणी केली होती. त्या मागणीला न्याय देत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी कार्यक्रमामध्येच पूल मंजूर केला असा शब्द दिला होता. दिलेला शब्द पूर्ण करत सदर पुलाच्या कामासाठी शासनाच्यावतीने ४ कोटी रुपये मंजूर केले आहेत. बार्शी - कांदलगाव - शिरसाव रस्त्यावरील पुलासाठी ४ कोटी रुपये मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे व महायुती सरकारचे माजी आ.राजाभाऊ राऊत व गावकऱ्यांनी आभार मानले.



# कत्तलीकरता ३२ जनावरे घेऊन जात असताना ३ वाहनासह आरोपी ताब्यात

## सांगोला पोलिसांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२२ मे-**

कत्तलीकरता ३२ जनावरे घेवुन जात असताना सांगोला पोलिसांनी केलेल्या वेगवेगळ्या कारवाईत ३ वाहनासह आरोपी ताब्यात घेण्यात आल्याची माहिती सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती अशी, अवैद्य धंद्यावर कारवाई करण्याकरिता पेट्रोलींग करीत असताना सांगोला पोलिसांना गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहिती वरून दि.१७ मे रोजी रात्री १० वा.चे सुमारास वाकी घेरडी ता.सांगोला येथे आरोपी सचिन कांबळे रा.वाकी घेरडी ता. सांगोला व चालक रंगनाथ लक्ष्मण सकट रा.खुपसंगी ता. मंगळवेढा हे महिंद्रा बुलेरो पिकअप गाडी नं.एम.एच.०३. सी डी.०५१३ व दि.१९ मे रोजी दु.२.१५ वा. सुमारास सांगोला ते सोलापूर जाणारे रोडवर पंढरपूर ब्रिज जवळ आरोपी शरद धोंडिराम लाटने (वय-५३) रा. धनगर मळा, कोरोची ता.हातकलगणे जि.कोल्हापूर याचे ताब्यातील आयशर टॅम्पो नंबर एम.एच.५१ सी.०६३९ तसेच दि. २१ मे रोजी रात्री ११.०५ वा. सुमारास आलेगाव ते वाकीघेरडी जाणारे रोडवरती माळेवाडी येथे दोन अज्ञात इसम यांनी एक अशोक लेलंड कंपनीचे चारचाकी वाहन नं.एम.एच. ११.सीएच.७४३६ या वाहनात कोणत्याही प्रकारचा पशु वाहतुकीचा बोर्ड न लावता आरटीओच्या परवानगी शिवाय कोणत्याही प्रकारचे अधिकृत पशु वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र नसल्याचे माहीत असताना सुध्दा जर्शी गाई, लहान खोंडे व म्हैशीचे एक रेडकु अशी जनावरे दाटीवाटीने कोंडुन त्यांना नर्दयतेने वागणुक देवुन चारा पाणी व औषध पाण्याची सोय न करता कत्तलीकरता घेवुन जात असल्याचे मिळुन आले आहेत. याबाबत सांगोला पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल करुन कायदेशीर कारवाई केली आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, मंगळवेढा उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांचे आदेशान्वंये पोसई. विनायक माहुरकर, पोसई. हणमंत हिप्परकर, पोहेकॉ. घुले, पोना. व्यवहरे, पोकॉ. कुलकर्णी, पोकॉ. देसाई, पोकॉ. भोई, पोकॉ. नदाफ, पोकॉ. कांबळे यांनी केली.

# 'ओंकार'चे ७ लाख मेट्रीक टन गाळपाचे उद्दीष्ट



## ओंकार साखर कारखान्याचे मिल रोलरचे पुजन

**तभा वृतसेवा**
**पिलीव दि २२ मे -**

माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखान्याच्या मिल रोलरचे पुजन कारखान्याचे संचालक प्रशातराव बोत्रे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले.यावेळी बोलताना ओंकार साखर कारखाना परिवाराचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील, संचालीका रेखाताई बोत्रे पाटील, यांच्या मार्गदशनाखाली कारखान्याने प्रति दिन गाळप क्षमतेत वाढ करुन कारखाना गत वर्षीच्या गळीत हंगामात सुरु करणयात आला. यामुळे या परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनचा ऊसाचा गळीताचा प्रश्न सुटला.या कारखान्यात लवकरच १५० लाख के एल पि डी ची डिस्लरी प्रकल्प काही दिवसातच कार्यान्वित होणार आहे. यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांनच्या ऊसास समाधानकारक दर मिळणार आहे. या कारखान्याची अंतर्गत कामेही अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्याने प्रगतीपथावर आहेत.२०२५-२६ या गळीत हंगामासाठी सज्ज असुन यंदाच्या गळीत हंगामात कारखान्याने सात लाख मेट्रीक टन गाळपाचे उद्दीष्ट ठेवले असल्याचे कारखान्याचे संचालक प्रशातराव बोत्रे पाटील यांनी सांगितले. सदरच्या कार्यक्रमास जनरल मॅनेजर भिमराव वाघमोडे, चांदापुरीचे सरपंच जयवंत सुळ,प्रगतशील बागायतदार रामचंद्र मगर, भगवान सुळ,अंकुश पांढरे,चिफ इंजिनिअर तानाजी देवकते, पि डी पाटील, केन मॅनेजर शरद देवकर, धनाजीराव जाधव, धन्यकुमार जमदाडे, मेजर मोहन घोडके, गणेश धायगुडे, यासह ऊस उत्पादक शेतकरी, कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रमेश आवताडे यांनी आभार मानले.



# ब्रह्माकुमारी राजयोग शिबिरात बार्शीतील २५ जण सहभागी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२२ मे-**

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयादारे मुख्यालय आबूरोड येथील शांतीवन परिसरात पाच दिवसीय राजयोग शिबीर आयोजित केले गेले आहे. वैश्विक एकतेसाठी राजयोगाची अनुभूती विषयावर १४ ते १८ मे पर्यंत हे शिबीर आयोजित केले होते.

या शिबिरात सकारात्मक चिंतन, तणावमुक्त जीवन, संबंधामध्ये मधुरता, राजयोगाच्या अनुभूतीने सुख शांतीची अनुभूती अशा विषयांवर मार्गदर्शन केले जात होते. या शिबिरात बार्शीतील पंचेवीसजण सहभागी झाले होते. बार्शीकरांनी पहिल्या दिवशी ब्रह्माकुमारीज व भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने उभारलेल्या सौर उर्जा प्रकल्प, ब्रह्माकुमारीज गोशाला, टेरेस गार्डन, शंभर एकर शेतीचा तपोवन परिसर, दादी प्रकाशमणी पार्क यांचे अवलोकन केले. दुस-या दिवशी अंबाजीमातेचे दर्शन घेवून रोप वेचा सर्वांनी आनंद घेतला. तिस-या दिवशी मनमोहिनी परिसरातील होम थिएटरमध्ये ब्रह्माबाबांच्या जीवन कहाणीवर आधारीत 'द लाईट ' हा चित्रपट व दादी प्रकाशमणी पार्कमध्ये नवसृजन फाऊंटन शो सर्वांनी पाहिला. चौथ्या दिवशी सर्वजण उदयपूर दर्शन करत असून पाचव्या दिवशी माऊंट आबूदर्शनमध्ये पांडव भवनमधील ब्रह्माबाबांचे समाधीस्थळ शांतीस्तंभ, बाबांचा कमरा, बाबांची झोपडी, हिस्ट्री हॉल तसेच ज्ञानसरोवर परिसर, ग्लोबल हॉस्पिटल, पीसपार्क, देलवाडा मंदिर, नक्की लेक, आध्यात्मिक संग्रहालय आदी स्थळांना भेट देवून १९ एप्रिल रोजी हे शिबारार्थी परतीचा प्रवास सुरु केला. या शिबिरार्थींना मोहनभाई बुचडे, विलासभाई बारंगुळे, शामलबहन बारंगुळे, स्वप्निल पुकाळे हे मार्गदर्शन करत आहेत. बार्शी सेवा केंद्र संचालिका संगीता बहनजी यांनी शिबिरार्थींना शुभेच्छा दिल्या.

# तांबवेतील कुस्ती स्पर्धेत २५ मल्लांचा सहभाग

## शंभर रूपयापासून १ लाखापर्यंत बक्षिसे

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२२ मे-**

तांबवे (ता. माढा) येथे छत्रपती संभाजी महाराज आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त ग्रामस्थांच्या वतीने भव्य कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले होते. शंभर रुपयांपासून ५१ हजार रुपयांपर्यंत कुस्त्या घेण्यात आल्या तर शेवटची कुस्ती एक लाखाची घेऊन मैदान संपन्न झाले. यावेळी २५० पेक्षा जास्त मल्लानी कुस्ती मैदानामध्ये सहभाग घेतला. महाराष्ट्र केसरी वेताळ जाधव यास ५१ हजार रुपये रोंख देऊन सन्मानित करण्यात आले,

या कुस्ती मैदानाचे उद्घाटन तांबवेचे सुपुत्र व पुणे येथील एलसीपी विभागाचे पोलीस उपअधीक्षक शंकर खटके-पाटील यांच्या हस्ते व सभापती विक्रम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी विविध गावचे पदाधिकारी तसेच तांबवे ग्रामस्थ, शेतकरी, कुस्तीप्रेमी उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र केसरी वेताळ उर्फ दादा शेळके, कुस्तीगीर संघाचे जिल्हाध्यक्ष कुस्तीसम्राट पै.अस्लम काझी, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष बंडू नाना ढवळे, हिम्मत सोलनकर, माजी उपसभापती धनाजी जवळगे, मार्केट कमिटीचे संचालक दिलीप भोसले, नागनाथ पाटील, किसन पाटील, धनंजय मोरे, रामभाऊ वाघमारे, बाळासाहेब ढेकणे, परमेश्वर पाटील, अमोल धोत्रे, डॉ राहुल पाटील, भाजपा अध्यक्ष उमेश पाटील, राजू ढेकणे, रोहित देशमुख, निलेश देशमुख, किशोर सलगर, सोमनाथ महाडीक, भीमराव ढवळे, माऊली महाडीक, अमोल ढवळे, विकी ढवळे, अनिकेत काळे, सुग्रीव ढवळे, भाऊ जगताप आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी दहावी बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार सभापती विक्रम शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. आदर्श शिक्षक म्हणून बिरुदेव माने, सार्वजनिक बांधकाम विभाग कनिष्ठ अभियंता कुलदीप खटके, नवोदय विद्यालयमध्ये निवड झालेली काव्या देशमुख हीचा सन्मान करण्यात आला. कुस्ती समालोचक धनाजी मदने, राजेंद्र मुळे आणि वस्ताद म्हणून पैलवान संदीप काळे, अण्णा गायकवाड, उमेश इंगळे, चंदू मिस्कीन, विठ्ठल मिस्कीन यांनी काम पाहिले. पंच म्हणून सदाशिव खटके, आपा करंडे, नवा चव्हाण, गणेश पाटील, नामदेव करंडे, संदीप खटके, किशोर खटके, राजू माने, आबा जाधव, बापू माने यांनी काम पाहिले. कुस्ती स्पर्धेचे मार्गदर्शक म्हणून तांबवे गाव तंटामुक्त समितीचे अध्यक्ष पैलवान नागनाथ भाऊ खटके पाटील, मार्केट कमिटीचे संचालक नागेश बापू खटके पाटील, गोरख खटके, संतोष खटके, विजय खटके, भारत खटके, चंद्रकांत खटके, महारुद्र खटके, श्रीपती खटके, राहुल खटके, नितीन खटके, अक्रूरू खटके, बाळू माने, संजय माने, भजनदास माने, अभिमान माने, भरत माने, किरण जाधव, रमेश गोडसे, किशोर पाटील, सुधीर खटके, पोलीस पाटील जयसिंग पाटील, आनंद खटके, शिवलाल थोरात, बापू थोरात, त्रिंबक थोरात, रामभाऊ पाटील, बापू पाटील, चंद्रकांत खटके, ,मंगेश खटके, सुजित खटके, रंजीत खटके, दिपक खटके, दीपक भगत, बप्पा पाटील, बाळासाहेब खटके, डॉ .सचिन खटके, डॉ. सचिन पाटील, हनुमंत खटके, महेश खटके, संदीप खटके, नानासाहेब खटके, विकास खटके, दत्ता खटके, अमोल खटके, प्रकाश खटके, महेश देशमुख, दत्ता चव्हाण, आप्पा लठ्ठे, अमोल लठ्ठे, विश्वंभर गोडसे, नागनाथ गोडसे, सावळा खटके, भालू थोरात, शिवम कोल्हे, हनुमंत भोसले, मेजर संजय थोरात, हनुमंत ढवळे, गणेश करंडे, धनाजी भोसले, सचिन तळेकर, कैलास माने, संतोष गोडसे, आनंद गोडसे, मोहन करंडे, रंगा करंडे, पोपट करंडे, मच्छिंद्र कांबळे, सज्जन कांबळे, अमोल साठे, मलिक तांबोळी, समीर तांबोळी, बाळू तांबोळी आदी शेकडो पैलवानांनी सहभाग घेतला.



## महत्वाचे...



# कुसमोड येथील डॉ. भाळे आदर्श पशुधन अधिकारी पुरस्काराने सन्मानित

**पिलीव दि २२ मे -**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील सहहयाक आयुक्त पशुसंवर्धन डॉंक्टर शंकर भाळे यांना महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन विभाग सांगली जिल्हयाच्या वतीने २०२४-२५ या वर्षात पशुसंवर्धन विषयक केलेल्या तांत्रिक व विकास कार्य तसेच विभागाच्या कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अमंलबजावणी या नाविण्यपूर्ण उपक्रमांची दखल घेऊन डॉक्टर शंकर भाळे यांना आदर्श अधिकारी सन्मान देऊन गौरविण्यात आले. सांगलीचे पशुसंवर्धन अधिकारी डॉकटर अजबनाथ थोरे, व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉकटर कृष्णा माळी व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सदरचा पुरस्कार डॉक्टर शंकर भाळे यांना सन्मान पुर्वक प्रदान करण्यात आला.या पुरस्काराबद्दल डॉक्टर शंकर भाळे यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांकडुन अभिनंदन व कौतुक होत आहे.



# मुंबई पोलीसात भरती झालेल्या साक्षी पलंगेचा टेंभूर्णीत सत्कार

**टेंभुर्णी, दि.२२ मे-**

येथील साक्षी पलंगे हिने मुंबई पोलीसमध्ये आपले स्थान निश्चित केल्याबद्दल मा. पंचायत समिती सदस्य प्रतिनिधी वैभव कुटे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. माढा तालुक्यात अद्यापही शैक्षणिक सुविधा कमी असताना माढा तालुक्यातील अनेक विद्यार्थी अभ्यास करून वेगवेगळ्या मोठ्या पदावरती गेले आहेत अशाच पद्धतीने साक्षीने अभ्यास करून तिने टेंभुर्णीकराची मान उंचावली आहे. तिचे वडील गणेश पलंगे हे कष्टाळू असून गरीब कुटुंबात जन्माला येऊन सुद्धा त्यांनी मुलाप्रमाणे मुलींना शिकवण्यासाठी भरपूर परिश्रम घेतले आहे त्यामुळे आज साक्षीने टेंभुर्णी शहराबरोबर आई-वडिलांची मान उंचावली आहे. या वेळी टेंभुर्णी ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष हरिश्चंद्र गाडेकर, पत्रकार संतोष वाघमारे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटनेचे माढा तालुका अध्यक्ष अनिल जगताप, गणेश पोळ, सतीश चांदगुडे, सुरेश पलंगे, गणेश पलंगे, इत्यादींनी उपस्थित होते.

# पोलीसांकडून १६ मोबाईल मुळ फिर्यादीस परत

**नातेपुते, दि.२२ मे-**

नातेपुते पोलीस ठाणे परिसरात चोरीस गेलेले व गहाळ झालेले वेगवेगळया कंपणीचे एकूण १६ मोबाईल ज्याची किंमत ३ लाख २० हजार रूपये आहे ते मूळ फिर्यादीस परत देण्यात आले आहेत. सदर मोबाईल जप्त करण्यासाठी पोलीस रणजित मदने, रतन जाधव, सायबर पोलीस ठाणे सोलापूर यांनी तांत्रिक विश्लेषण करुन वरील प्रमाणे मोबाईल जप्त केलेले आहेत. सोलापूर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर , अकलूज उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली नातेपुते पोलीस ठाणेचे प्रांगणात समारंभपूर्वक वरिल सर्व गुन्हयातील फिर्यादी यांना बोलावुन घेवुन त्यांना मोबाईल परत करण्यात आले. यावेळी नातेपुते पोलीस ठाणेचे सहा. पोलीस निरीक्षक महारुद्र परजने, पोलीस उपनिरीक्षक विक्रांत डिगे, पोहेकों राहूल रूपनवर, राहुल रणनवरे, राकेश लोहार, अमोल वाघमोडे, रणजित मदने, सोमनाथ मोहिते, रमेश बोराटे, रमेश कर्चे, नेहा बोंदर, वैशाली शेंडे या पोलीसांचे आभार मानले. सदर कामगिरीमुळे नातेपुते पोलीस ठाणे हददीतील नागरीकांकडुन कौतुक करण्यात येत आहे.

# अकलूजमध्ये आज तिरंगा पदयात्रा

**नातेपुते,दि.२२ मे-**

सैनिकांच्या अद्वितीय शौर्याला, निस्सीम देशभक्तीला आणि अमोघ सेवाभावाला विनम्र अभिवादन करण्यासाठी, त्यांचे मनोबल व आत्मविश्वास अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवार दि. २३ मे रोजी सायंकाळी पाच वाजता अकलूज येथे भव्य तिरंगा पदयात्रा आयोजित करण्यात आली आहे. या तिरंगा यात्रेस येथील सदुभाऊ चौकातून सुरुवात होणार आहे. गांधी चौक मार्गे ही पदयात्रा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या नजीक संपन्न होणार आहे या तिरंगा यात्रेत हजारोंच्या संख्येने अकलूज सह आबूरोडमाळशिरस तालुक्यातील देशप्रेमीनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## निधन वृत्त...

# राजश्री बिद्री



**सोलापूर, दि. २२ मे-**

राजश्री सतीश बिद्री (वय ५८) यांचे गुरुवार २२ मे रोजी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा शुक्रवार २३ मे रोजी सायंकाळी ५ वाजता त्यांच्या बसवेश्वर नगर, होडगी रोड येथील निवासस्थानापासून निघुन सहस्त्रार्जुन वैकुंठभूमी येथे अंतसंस्कार करण्यात येतील. सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज सेवा मंडळाचे ट्रस्टी सतीश मोतीलालसा बिद्री यांच्या त्या पत्नी आहेत.

# महादेव भरले



**सोलापूर दि. २२ मे-**

हत्तूर (ता. दक्षिण सोलापूर) येथील प्रगतशील शेतकरी महादेव चनबसप्पा भरले (वय ७२) यांचे निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, मुलगा, दोन मुली, सून व नातवंडे असा परिवार आहे. हत्तुर बृहत विकास सोसायटी हत्तूरचे चेअरमन राजशेखर मल्लेशी भरले यांते ते काका होत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

### चारित्र्याच्या संशयावरून विवाहितेचा छळ; पतीसह तिघांविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. २२ मे -**

चारित्र्याच्या संशयावरून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह तिघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शाहीन बाबू शेख (वय २६, रा. विजय नगर, नई जिंदगी, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती बाबू शेख, सासू साबेरा, नणंद रेश्मा (सर्व रा. लेप्रसी कॉलनी, कुमठा नाका, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ जुलै २०१९ ते २० फेब्रुवारी २०२४ या कालावधीत शाहिन या पती बाबू याच्यासमवेत सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती बाबू व त्याच्या घरातील लोकांनी शाहिन हिस माहेरून पैसे व सोने आण म्हणून तसेच तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला माहराण, शिवीगाळ करून आर्थिक त्रास देऊन घरातून हाकलून दिले. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार पाटील पुढील तपास करीत आहेत.

### जुना बोरामणी नाक्याजवळील अपघातप्रकरणी चालकाविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. २२ मे -**

जुना बोरामणी नाका येथील पेट्रोल पंपासमोरील रस्त्यावर मालट्रकचे चाक डोक्यावरून जाऊन झालेल्या महिलेच्या मृत्यूप्रकरणी ट्रकचालकाविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंबुबाई शंकर बिच्चल (वय ५६, रा. घोंगडे वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) असे ठार झालेल्या महिलेचे नाव आहे.




याबाबत प्रशांत शंकर बिच्चल यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सुनिल दत्तू पवार (वय २८, रा. मंगळवार पेठ, सावरकर चौक, तुळजापूर, जि. धाराशिव) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंबुबाई बुधवारी दुपारी दोनच्या सुमारास त्यांचा भाचा प्रथमेश याच्यासोबत शंकर चिकणी यांच्या एमएच १३ डीडी ६५२८ क्रमांकाच्या दुचाकीवर पाठीमागे बसून विडी घरकुलला जाण्यासाठी घरातून निघाल्या होत्या. घोंगडे वस्तीतील घरातून त्या काही मिनिटांनी मार्केट यार्ड चौकातून जुना बोरामणी नाका जवळील पेट्रोल पंपासमोरील रस्त्यावरून जाताना, अचानक पाठीमागून आलेल्या एमएच १३ एएक्स ३५६८ चा चालक सुनिल पवार याने ट्रक निष्काळजीपणे चालवून दुचाकीला धडक दिली. यामध्ये ट्रकचे चाक डोक्यावरून गेल्याने अंबुबाई या जागीच मृत झाल्या. जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार दुधाळे तपास करीत आहेत.

### वृध्द महिलेस मारहाणप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २२ मे -**

वृध्द महिलेस लाकडाने व फरशीने मारहाण केल्याप्रकरणी चौघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सरूबाई चंद्रकांत उगाडे (वय ६४, रा. गोंधळी गल्ली, झोपडपट्टी नं. १, विजापूर नाका, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन रोहिणी मळगे, राधिका देवकते, रोहित जमगे, किरण जमगे (सर्व रा. गोंधळी गल्ली, झोपडपट्टी नं. १, विजापूर नाका, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सरूबाई यांचा मुलगा दिपक हा त्याच्या मोटारसायकलवरून घराकडे येत असताना सार्वजनिक रोडवर बसलेले रोहिणी मळगे, राधिका देवकते, रोहित जमगे, किरण जमगे यांनी त्यास पुरेसा रस्ता न दिल्याने दिपक यास पायाला खरचटले. म्हणून १९ मे रोजी सायंकाळी सरूबाई या सांगण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी आरोपींनी मिळून दिपक, सरूबाई यांची भावजय काशिबाई व नारायण उगाडे यांना हाताने, लाकडाने व फरशीने मारहाण करून जखमी केले. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार सोनार पुढील तपास करीत आहेत.

# प्रत्येक जीवामध्ये ईश्वर पाहणे हाच सनातन धर्म

- निरूपणकार विवेक घळसासी
- भागवत कथा ज्ञानयज्ञ चतुर्थ पुष्प





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ मे-**

भारतात जन्माला आलेल्यांनी ज्ञान मिळवण्यासाठीच जगले पाहिजे. ज्ञान हा येथील भूमीचा अलंकार आहे. येथील सनातन संस्कृतीतील अनेक ऋषीमुनींनी ज्ञानासाठी घरादाराचा त्याग केल्याचे दिसते. श्रीमद भागवतातील कथांतून जगासमोर तोच आदर्श मांडला गेला आहे. सनानतन संस्कृतीने जगाला प्रत्येक जीवामध्ये ईश्वर पाहण्याचे ज्ञान शिकवले. जगाच्या पाठीवर फक्त सनातन धर्मातच चिकित्सा करण्याचे स्वातंत्र्य आहे. त्यामुळे प्रत्येक जीवमात्रामध्ये भगवंताला पाहणे म्हणजेच सनातन धर्म असल्याचे प्रतिपादन निरूपणकार विवेक घळसासी यांनी केले.

जुळे सोलापूर येथील द्वारकाधिश मंदिरात जवळगेकर परिवारातर्फे श्रीमद भागवत कथा ज्ञान य़ज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. चतुर्थ पुष्प गंफताना श्री. घळसासी बोलत होते. आजच्या कथेची सुरूवात माजी सहकारमंत्री आमदार सुभाष देशमुख व माजी नगरसेविका संगिता लजाधव यांच्या हस्ते ग्रंथपूजनाने झाली. यावेळी न्यायाधिश सोनाली जवळगेकर, दिलीप जवळगेकर, दिपाली जवळगेकर, संदिप जवळगेकर, कंतकी जवळगेकर, कपिल जवळगेकर, सुनिल देशपांडे, सुप्रिया देशपांडे, मंदिराचे व्यवस्थापक दत्तात्रय पाठक आदिसह भाविक उपस्थित होते. कथेच्या सुरूवातीला स्थानिक कलाकरांनी भक्तीगीत सादर केले. श्री. घळसासी यांनी आपल्या ओघवत्या वाणीतून गजेंद्र मोक्ष, संमुद्रमंथन, ध्रुवबाळाची कथा सद्यस्थितीतील उदाहरणांसह सांगितली. गजेंद्रमोक्ष सांगताना त्यांनी पती-पत्नीतील संवादाची वीण कशी असावी याचे मोठे खुमासदार शैलीत वर्णन केले. एकांताचा विषय पती-पत्नीने लोकांतात आणू नये. अता नेमके उलटे होत असल्याचे त्यांनी सांगितले.

समुद्रमंथनावेळी त्यातून निघालेले हलाहल विष भगवान शंकराने प्राशन केले. भगवान शंकर हे ज्येष्ठ असल्याने त्यांनी ते विष घेतले. तसेच संसाररूपी समुद्रमंथनात घरातील ज्येष्ठांनी संसारातील विष प्राशन करण्याची तयारी ठेवली पाहिजे. हे विष प्राशन करताना ते पोटातही जाणार नाही व थुंकून बाहेरही टाकता येणार नाही याची सुक्ष्म दक्षता घेणाराच कुटूंबकर्ता महत्वाचा ठरतो. आसक्तीपासून दूर राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आसक्ती कभी कभी आ सकती है.... या वाक्याला श्रोत्यांनी मोठी दाद दिली. भगवंताने आपल्या कपाळावर श्री यश असे लिहिले आहे. त्यामुळे त्याच्या चिंतनासाठी थडा तरी वेळ दिलाच पाहिजे. सनातन धर्मात जोपर्यंत चराचरामध्ये भगवंत दिसत नाही तोपर्यंत मूर्तीतल्या भगवंताची पूजा सांगितली आहे. जेव्हा प्रत्येक जीवमात्रामध्ये भगवंत दिसतो त्यावेळी मूर्तीपूजा करण्याची आवश्यकता नसल्याचे सनातन धर्मात सांगितल्याचे श्री. घळसासी यांनी सांगितले. कश्यपादितीच्या पोटी देव अन दानव जन्माला आले. आपापल्या वर्तनातूनच देव व दानवत्व दिसून आले. त्यामुळे देवत्व मिळवण्यासाठी आपाल्यातला दानव संपवण्याची गरज आहे असेही ते म्हणाले.

प्रत्येकाने अवधुत आवस्थेत यात्रा करावी. तसेच महिन्यातून एक दिवस आपल्याला कोणीही ओळखत नाही अशा ठिकाणची यात्रा करावी असे त्यांना यावेळी सांगितले. संसाराचे विष पोटात न जाऊ देता व थुंकीतून बाहेर न येऊ देता प्यावे, संसारात आसक्ती धरू नये व कपट करू नये या त्रिसूत्रीचा उपयोग केल्यास संसारात असूनही परमार्थ साधता येणे शक्य असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. कथेच्या पहिल्या दिवसापासून हजेरी लावणारा पाऊस आज मात्र नसल्याने अधिक गर्दी होती. आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते भागवताची आरती होऊन प्रसाद वाटपानंतर आजच्या दिवसाच्या कथेचा समारोप झाला.

# शहरातील रस्त्यांवर पाणीच पाणी

- पूर्व मोसमी कामात प्रशासनाकडून होते दिरंगाई
- महापालिका प्रशासनाच्या व ठेकेदाराच्या नियोजन शून्य कारभारामुळे वाहनधारक त्रस्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२२ मे-**

सोलापूर स्मार्ट सिटीतील रस्ते स्मार्ट बनवणे आवश्यक होते, मात्र शहरातील रस्ते अशास्त्रीय पद्धतीने बनवल्याने पावसाळ्यात रस्त्यावर अक्षरशः तळे साचत असलेले विदारक चित्र वारंवार दिसून येत आहे. हद्दवाढ भागातील अनेक रस्त्यांवर गेल्या काही दिवसांपासून पडलेल्या पावसाच्या पाण्याचा निचरा होत नसल्याने पावसाच्या पाण्याचे तळे साचून राहिलेले आहे. गुरुनानक चौक, कुमठा नाका, आकाशवाणी रोड, नई जिंदगी भागातील अनेक सखल भागातील रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहनधारकांना तारेवरची कसरत करत वाहने चालवावी लागत आहेत. अशा रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पडल्याने अपघात किंवा दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा दयनीय परिस्थितीत महापालिका प्रशासनाने लक्ष देण्याची गरज निर्माण झालेली आहे.

दरम्यान, सोलापूर शहरातील प्रमुख रस्ते व उप रस्ते यांची अवस्था सर्वपरिचित आहे. मात्र ज्या भागात विकास कामे अर्धवट स्थितीत आहेत, त्याच पद्धतीने काही ठिकाणी विकास कामे झालेलीच नाहीत, अशा भागांमध्ये अनेक समस्या डोके वर काढत आहेत. शहरातील अनेक रस्त्यांची निर्मिती करताना शास्त्रीय पद्धत अवलंबली नसल्याने, रस्त्याच्या मधोमध पाणी थांबत आहे.पावसाच्या पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने होत नाही. यामुळे रस्ता आहे की तळे? हा प्रश्न नागरिकांसमोर उपस्थित होत आहे. शहर व जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे गुरुनानक चौक ते कुमठा नाका चौका दरम्यान पाण्याचे तळे साचलेले कायम आहे. सदरच्या पाण्याचा निचरा होत नसल्याने पाणी त्याच ठिकाणी थांबून आहे. अशा अवस्थेत जडवाहने, रिक्षा, दुचाकी, कार तसेच सायकलस्वार आणि पादचारी यांची रहदारी कायम आहे. पाण्यातून नागरिकांना वाट काढावी लागत आहे. अशाप्रसंगी वाहनधारकाचा वाहन चालवताना अंदाज चुकून अपघाताची दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. महापालिका प्रशासनाकडून याबाबत कोणतेही प्रतिबंधात्मक उपाययोजना होत नसल्याचे आरोप स्थानिक नागरिक आणि वाहनधारकांकडून केले जात आहेत. काही दिवसापूर्वी या रस्त्यांवर दुभाजक आणि पथदिवे बसवण्यात आले. या दुभाजकामुळे पावसाचे पाणी योग्य पद्धतीने निचरा होत नसल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. रस्ताच शास्त्रीय व योग्य पद्धतीने बनवला नसल्याने, पाणी साचण्याचे प्रमाण यापूर्वीपेक्षा वाढलेले आहे. मात्र याकडे प्रशासन दुर्लक्ष करताना दिसत आहे. या रस्त्यांवर खड्डे पडलेले आहेत. खड्ड्यामध्ये साचलेल्या पाण्याचा वाहनधारकांना अंदाज न आल्याने वाहनधारकांना इजा होत आहे. खड्डे करण्यासाठी स्थानिक नागरिकांनी या खड्ड्यांमध्ये मोठमोठी दगडे टाकलेली आहेत. तर काही ठिकाणी झाडांच्या फांद्या लावल्या आहेत. जेणेकरून वाहनधारकांना येथे मोठा खड्डा असल्याचे लांबून निदर्शनास येईल आणि होणारा धोका टाळेल.



**सोलापूर : गुरुनानक चौक ते कुमठा नाका चौकादरम्यान रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पावसाच्या पाण्याचे तळे साचल्याने वाहनधारकांना तारेवरची कसरत करत वाहन चालवावे लागत असल्याचे छायाचित्र...**

### अनेक वर्षांपासून समस्या कायम

गुरुनानक चौक ते कुमठा नाका चौक दरम्यान रस्त्यावर नेहमी पाणी साचते. यापूर्वी देखील पाण्याचे तळे या रस्त्यावर साचत होते. आता देखील तीच अवस्था कायम आहे. दुभाजक केल्यामुळे पाणी एका बाजूला जात नाही. रस्त्याच्या मधोमध पाणी थांबत आहे. शास्त्रीय पद्धतीने रस्ते तयार केले नसल्याने वाहनधारकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

**- मनोज कुरले, स्थानिक व्यावसायिक**

### रहदारी कायम मात्र सुविधा नाही

कुमठा नाका या रस्त्यावर नेहमीच रिक्षांची मोठी वर्दळ असते. नई जिंदगी भागाकडे जाणाऱ्या रस्त्यावर रीक्षा, दुचाकी, जडवाहने मोठ्या प्रमाणात जातात. सततच्या रहदारीमुळे रस्ते खचलेले आहेत. प्रत्यक्षात रस्ते तयार करताना योग्य ती काळजी घेतली नाही. उतार योग्य पद्धतीने देण्यात आला नसल्याने पावसाचे पाणी रस्त्यावर थांबत आहे. यामुळे स्थानिक नागरिक आणि वाहनधारक तसेच पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे.

**- शुभम स्वामी, वाहनधारक**



# महापालिकेच्या बदली व रोजंदारी कामगार संदर्भात मंत्रालयात आज बैठक

- माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांनी घेतली आयुक्तांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ मे-**

महापालिकेच्या २४९ रोजंदारी व बदली सेवकांना सेवेत कायम करण्या संदर्भात शुक्रवार दि. २३ मे २०२५ रोजी मुंबई मंत्रालय येथे महाराष्ट्र राज्य नगर विकास विभाग उपसचिव अनिरुद्ध जेवलीकर यांनी समवेत सोलापूर महापालिकेचे आयुक्त सचिन ओम्बासे व अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांची विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे.

दरम्यान, आज राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी या संदर्भात सोलापूर महानगरपालिका आयुक्त सचिन ओम्बासे आणि अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांची भेट घेतली असून सर्व कर्मचाऱ्यांची आवश्यक कागदपत्रे व माहिती सादर केली.

याबाबत सोलापूर महापालिका प्रशासन व महाराष्ट्र शासन सकारात्मक भूमिका घेऊन कार्यरत २४९ रोजंदारी व बदली सेवकांना सेवेत कायम समाविष्ट करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,कॅबिनेट मंत्री दत्ता भरणे व आ. विजयकुमार देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे यांनी याबाबत सतत पाठपुरावा केला असून या संदर्भात बैठक लावण्यात आली आहे, असे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी म्हटले आहे.

# टाकाऊ पासून साकारली टिकाऊ अनोखी स्टेअर क्लायंबिंग व्हीलचेअर

- अवलिया फारुख सय्यद यांचा नवाविष्कार ठरणार ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग अन् रुग्णांसाठी वरदान

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.२२ मे-**

सोलापूर शहरातील गुरुनानक चौकात सायकल रिपेअर करणारे व अवलिया म्हणून समजले जाणारे फारुक सय्यद यांनी पुन्हा एकदा आपला नवा अविष्कार साकारला आहे. टाकाऊ पासून टिकाऊ गोष्ट खरी ठरवत, भंगारातील साहित्य वापरून एक विलक्षण व्हीलचेअर तयार केली आहे. जी थेट पायऱ्यांवरून वर आणि खाली जाऊ शकते. वृद्ध, दिव्यांग आणि रुग्णांसाठी मोठा अडथळा ठरलेल्या पायऱ्या आता यामुळे सहज पार करता येणार आहेत. या व्हीलचेअरचा वापर करताना वापरणाऱ्याला उठण्याची गरज भासत नाही आणि केवळ एका व्यक्तीच्या सहाय्याने पहिल्या मजल्यावर नेणे शक्य होते.

दरम्यान, अवलिया फारूक सय्यद यांचा नवाविष्कार ठरणार ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग अन् रुग्णांसाठी वरदान देणारा ठरणार आहे. यापूर्वीही त्यांनी जुन्या सायकलींपासून अनेक उपयुक्त वस्तू तयार केल्या आहेत. मात्र ही व्हीलचेअर त्यांच्या सर्जनशीलतेचा उत्कृष्ट नमुना ठरते. सर्वसामान्यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांनी अगदी कमी खर्चात आणि सहज उपलब्ध साहित्य वापरून हा प्रयोग साकारला. घरामध्ये किंवा क्लिनिकमध्ये जिथे लिफ्टची व्यवस्था नाही, अशा ठिकाणी ही व्हीलचेअर अत्यंत उपयुक्त ठरते. आजच्या काळात स्वस्त, टिकाऊ आणि उपयुक्त असे उपकरण बनवणे हे एक मोठे आव्हान असते, पण फारूक यांनी ते यशस्वीपणे पेलले आहे.

फारूक सय्यद यांचा हा उपक्रम केवळ तांत्रिक नव्हे तर सामाजिक दृष्टिकोनातूनही अत्यंत प्रेरणादायक आहे. अशा साधनांची गरज असलेल्या अनेकांसाठी ही व्हीलचेअर एक वरदान ठरणार आहे. लोकसहभागातून आणि स्थानिक प्रशासनाच्या मदतीने अशा उपक्रमांचे उत्पादन आणि प्रसार वाढवला गेला, तर अनेकांच्या जीवनात खऱ्या अर्थाने सुलभता आणता येईल असे ते म्हणतात, सोलापूरच्या या यशोगाथेने नवे कल्पक विचार, स्थानिक प्रतिभा आणि जिद्द यांचे उत्तम उदाहरण आहे.



**सोलापूर : वयोवृद्ध व रुग्णांना पायऱ्या चढवण्यासाठी उपयुक्त ठरणारी अशी ही व्हीलचेयर सोबत फारुक सय्यद..**

### अशी केली स्मार्ट व्हीलचेअरची निर्मिती

या अनोख्या व्हीलचेअरच्या निर्मितीसाठी त्यांनी जुन्या सायकलचे सीट स्प्रिंग, नट-बोल्ट, दुचाकीचे शॉकऍब्सॉर्बर, दवाखान्यातील स्ट्रेचरचे व्हील, प्लायवूड, फायबर शीट्स आणि सायकलचे इतर सुटे भाग वापरले. हे सर्व साहित्य त्यांनी स्वतः गोळा करून, तांत्रिक कौशल्य आणि प्रयोगशील बुद्धीच्या साहाय्याने एका वापरण्यास सुलभ अशा व्हीलचेअरमध्ये बदलले. या नव्या पद्धतीच्या व्हीलचेअरसाठी बारा ते पंधरा हजार रुपयांचा खर्च आला आहे. केवळ पुनर्वापरातून निर्माण झालेली ही यंत्रणा पर्यावरणपूरक असून, ''जुनं ते सोनं'' हे वाक्य सार्थ करणारी आहे.

**- फारुक सय्यद, व्हीलचेअर निर्माता**

# शहरातून दोन दुचाकींची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ मे-**



शहरातील विविध ठिकाणाहून दोन दुचाकींची चोरी करण्यात आली. वरद संजय जट्टे (वय २२, रा. भुसार गल्ली, सोलापूर) यांनी त्यांची एमएच १३ सीवाय १७९३ क्रमांकाची दुचाकी ही २० मे रोजी दुपारी सिध्देश्वर पेठेत पार्क केली होती.

ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद फौजदार चावडी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार परीट पुढील तपास करीत आहेत. तर दुसऱ्या घटनेत सतीश श्रीधर माने (वय ३८, रा. आनंद नगर, सांगोला) यांनी त्यांची एमएच ४५ एके ०६२० क्रमांकाची दुचाकी ही २० मे रोजी सकाळी मुरारजी पेठ येथे पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद फौजदार चावडी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार चुंगे पुढील तपास करीत आहेत.

संत चोखामेळा आणि संत कान्होपात्रा यांच्या विठ्ठलभक्तीने ओथंबून वाहणारे अपूर्व संगीत नाटक
संत कान्होपात्रा
हुतात्मा स्मृती मंदिर – सोलापूर
शनिवार दि. २४ मे २०२५ रोजी सायं. ७ वा.
लेखक : ना. वि. कुलकर्णी । संगीत : मास्टर कृष्णराव
सादरकर्ते : बालगंधर्व संगीत रसिक मंडळ, पुणे
कलाकार : सूरगंधर्व सुरेश साखवळकर, सौ. अस्मिता चिंचाळकर, रविंद्र कुलकर्णी, सौ. अभिनेत्री गात, निरंजन कुलकर्णी, सौ. अनुराधा राजहंस, चिन्मय पाटसकर, सौ. अवंती बायस, अजित भालेराव, विवेक काटकर
ऑर्गन : संजय गोगटे । तबला : केदार कुलकर्णी । व्हायोलीन : प्रज्ञा देसाई
पखवाज : नंदकुमार भांडवलकर । टाळ : सुरेश कुलकर्णी । व्यवस्थापन : नाना कुलकर्णी
प्रवेश मूल्य : १००रु./५० रु.
तिकीट संपर्क : हुतात्मा स्मृती मंदिर, मो ९०११४७४४००
पंढरीच्या विठ्ठलाचे दर्शन घ्या! धन्य व्हा!
संत चोखामेळा, संत कान्होपात्रेला रंगमंचावर पहा! डोळ्यांचे पारणे फेडा!

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## महापालिका कोंडवाडा विभागाच्या वाहनावर हल्ला करून चावी काढली

### १५ जणांविरुध्द गुन्हा; जुना पूना नाका परिसरातील घटना

**सोलापूर, दि.२२ मे-**

पालिकेच्या कोंडवाडा विभागाच्या वाहनावर हल्ला करून चालकास मारहाण करून मोकाट जनावरे सोडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या १५ जणांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अंबादास शेखू तळभंडारे (वय ५५, रा. शेटे नगर, लक्ष्मी पेठ, दमाणी नगर, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन मोजम सादीक शेख, जब्बार हाजीसाब लोखंडवाले, हनीफ कुरेशी, अबरार रंगरेज, बिलाल कुरेशी, जैद कुरेशी, नक्टा बाबू, बाबा यांच्यासह अनोळखी ७ ते ८ जण यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या कोंडवाडा विभागातील कर्मचारी अंबादास तळभंडारे हे २१ मे रोजी सकाळी एमएच १३ डीक्यू ८८७३ क्रमांकाच्या गुरे प्रतिबंधक वाहनामध्ये लहान मोठे गायी व कालवड अशी ६ जनावरे घेऊन ती जनावरे गो शाळेत जमा करण्यासाठी जात होते. गुरे प्रतिबंधक वाहन हे शिवाजी चौकाकडून जूना पूना नाक्याकडे जात असताना हॉटेल ॲम्बेसिटरसमोर आले असता मोजम शेख व त्याचे सर्व साथीदार हे खासगी दुचाकींवर आले व गुरे प्रतिबंधक वाहन थांबविण्यास भाग पाडले. शेख व त्याच्या साथीदारांनी तळभंडारे व वाहनाचा चालक यांना शिवीगाळ व दमदाटी करून हाताने चापटा मारून वाहनावर दगडफेक केली. तसेच वाहनाची चावी काढून घेण्याचा प्रयत्न करीत सरकारी कामात अडथळा निर्माण केला. म्हणून याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक खंडागळे पुढील तपास करीत आहेत.

## ▶▶ महत्वाचे...

### मंगळवेढ्यात वाळू तस्करांकडून एकाला मारहाण

**सोलापूर, दि. २२ मे -**

मंगळवेढा येथे वाळू उत्खननाची माहिती दिल्याच्या संशयावरून एकाला वाळू तस्कारांकडून मारहाण करण्यात आली. ही मारहाण मंगळवेढा येथे बुधवारी सायंकाळी ६.४० वाजता घडली. दत्तात्रय रावसाहेब बेंदरे (वय ४५, रा. ब्रम्हपुरी ता. मंगळवेढा) असे मारहाण झालेल्याचे नाव आहे. दत्तात्रय हे बुधवारी सायंकाळी ६.४० वाजता मंगळवेढा तालुक्यातील उचेठाण येथे होते. त्यावेळी माऊली भोसले व इतर ३० जणांनी त्यांना वाळू वाळू उत्खननाची तक्रार केल्याच्या कारणातून लोखंडी सळई, टॉमी व लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने मंगळवेढा येथील रुग्णालयात उपचार करून गुरुवारी सकाळी स्वत: शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

### घराजवळ थांबल्याने एकावर कोयत्याने हल्ला

**सोलापूर,दि. २२ मे-**

घराच्या जवळ का थांबला असे म्हणून एकावर कोयत्याने हल्ला केला. हा हल्ला माढा तालुक्यातील मानेगावात मंगळवारी सायंकाळी ७.३० वाजता घडला आहे.संतोष बाबा माने (वय ५०, रा. मनेगाव ता माढा) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. बुधवारी सायंकाळी ७.३० च्या सुमारास संतोष् हे गावातील चौकात थांबले होते. त्यावेळी गोवर्धन जाधव याने घराच्या जवळ का थांबला असे म्हणून कोयत्याने हल्ला केला. यात संतोष यांच्या डोक्यात जखम झाली आहे. माढा येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून भाऊ संजय माने याने शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर,दि. २२ मे-**

आसरा चौक ते विमानतळ दरम्यानच्या मुलतानी बेकरीसमोरील रस्त्यावर झालेल्या अपघातात दुचाकीस्वार जखमी झाला. हा अपघात २० मे रोजी दुपारी ४.१५ वाजता घडला.केदार सिध्दाराम सुतार (वय ३६, रा. रेवणसिध्देश्वर मंदिरामागे, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. मजरेवाडी येथून केदार हा दुचाकी चालवित विजापूर रोडवरील त्याच्या राहत्या घराकडे जात होता. तो होटगी रस्त्यावरील मुलतानी बेकरीसमोरील रस्त्यावर आला असता, तो चालवित असलेल्या दुचाकीला अज्ञात वाहनाने धडक दिली. यात त्याच्या चेह-याला जखम झाली तसेच छातीला मार लागल्याने बुधवारी दुपारी ४.१० वाजता भाऊ महेश याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कुरुलमध्ये मुलाकडून आईला लाथाबुक्यांनी मारहाण

**सोलापूर,दि. २२ मे-**

घरातील खोलीमध्ये झोपण्याच्या कारणवरून मुलाकडून आईला लाथाबुक्यांनी बेंदम मारहाण करण्यात आली. ही मारहाण बुधवारी रात्री १०.३० वाजता झाली. सत्यभामा बाळू माने (वय ५५, रा. कुरूल ता. मोहोळ) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. सत्यभामा या बुधवारी रात्री दहाच्या सुमारास कुरूल येथील राहत्या घरात होत्या. त्यावेळी घरातील आतल्या खोलीत झोप म्हणून मुलगा सागर आणि सत्यभामा यांच्यात वाद झाला. या वादातून सागर याने आई सत्यभामा यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच चावल्याने डाव्या बोटाला जखम झाल्याने मुलगा राजाराम याने रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

### भावाचा पाय अंगावर पडून १५ दिवसांचे बाळ बेशुध्द

**सोलापूर,दि. २२ मे-**

आईच्या जवळ झोपलेल्या एक वर्षाच्या बाळाचे पाय तेथेच झोपलेल्या १५ दिवसांच्या बाळाच्या अंगावर पडून ते बाळ बेशध्दु पडले. हा प्रकार धाराशिव येथील पापनस नगर येथे मंगळवारी घडला. मनिषा बाजी काळे (वय १५ दिवस) असे बाळाचे नाव आहे. मनिषा हे १५ दिवसाचे बाळ मंगळवारी आईच्या जवळ झोपले होते. त्याच्याच शेजारी एक वर्षाचे बाळही झोपलेले होते. पहाटे पाचच्या सुमारास एक वर्षाच्या बाळाचा पाय १५ दिवसाच्या बाळाच्या अंगावर पडला होता. यामुळे १५ दिवसाचे बाळ रडू लागले. त्यात त्याला त्रास होत असल्याने त्याला धाराशिव येथे उपचारास दाखल केले. परंतु प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने रुग्णालयात दाखल केले. मात्र बाळाची शुध्द हरपली असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.




## आगामी महापालिका निवडणुकीत महायुतीचा भगवा फडकवणार

- नूतन शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांचा निर्धार
- नीता केळकर यांच्या उपस्थितीत स्वीकारला शहराध्यक्षपदाचा पदभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कार्यकारी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह शहरातील बुजुर्ग नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीच्या सोलापूर शहराध्यक्षपदाची जबाबदारी घेतली असून, आगामी काळातील पहिल्या महापालिका निवडणुकीत महायुतीचा भगवरा फडकवणार असल्याचा निर्धार भाजपच्या नूतन शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी आज (दि. २२) व्यक्त केला. दरम्यान, आज तडवळकर यांनी सोलापूरच्या निवडणूक निरीक्षक तथा प्रदेश चिटणीस निता केळकर यांच्या हस्ते भाजप शहराध्यक्ष पदाचा पदभार घेतला.

यावेळी माजी शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी त्यांना पदभार देवून शुभेच्छा दिल्या. या पदग्रहण सोहळ्यासाठी माजी आ. नरसिंग मेंगजी, माजी महापौर किशोर देशपांडे, श्रीकांचना यन्नम, सोलापूर शहर सरचिटणीस पांडुरंग दिड्डी, रामचंद्र जन्नू, विशाल गायकवाड, नारायण बनसोडे, विक्रम देशमुख, संपदा जोशी, प्रा. मोहिनी पत्की, बजरंग कुलकर्णी, रामेश्वरी बिरू, इंदिरा कुडक्याल, विजया वडेपल्ली, नागेश सरगम, विनायक विटकर आदींसह इतर पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना नूतन शहराध्यक्षा तडवळवर पुढे म्हणाल्या की, भारतीय जनता पार्टीत आजही जुन्या कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांचा विचार केला जातो.

यामुळेच मला या पदाची संधी मिळाली आहे. भविष्यात भाजपाचे जुने आणि नवीन पदाधिकारी-कार्यकर्त्यांमध्ये समन्वयाची भावना ठेवून पक्षाचे कामकाज करीत राहणार आहे. पक्षातील स्थानिक लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून जास्तीत जास्त सामान्य माणसांच्या अडचणी सोडविण्यासाठी मी प्राधान्य देईन आणि पक्ष बळकटीसाठी मी कायम प्रयत्नशील राहणार आहे. यावेळी मोहिनी पत्की, रामचंद्र जन्नू, नरसिंग मेंगजी यांच्यासह इतर नेत्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन नारायण बनसोडे यांनी केले.

### भाजपाचे वाढणार भविष्यात बळ

रोहिणी तडवळकर यांच्या रूपाने प्रथमच भाजप शहराध्यक्षपदी महिला विराजमान झाल्या आहेत. तडवळकर या भाजपच्या जुन्या अनुभवी नेत्या, अभाविप पासून झालेली त्यांची सुरुवात ते आज भाजपा शहराध्यक्ष होत असताना मोठा संघर्ष यांनी राजकीय जीवनात केला. सोलापूर महापालिकेच्या विरोधी पक्षनेत्या असताना जनतेच्या विविध प्रश्नांवर आवाज उठविणाऱ्या एक आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून देखील यांचे कार्य सर्वांना ज्ञात आहे. यामुळे भविष्यात सर्वांना सोबत घेऊन काम करण्याच्या यांच्या कौशल्याने नक्कीच येणाऱ्या काळात भारतीय जनता पार्टीला बळ भेटणार यात तिळमात्र शंका नाही, अशी चर्चा भाजपा कार्यकर्त्यांमध्ये आज ऐकायला मिळाली.

### जुन्या-नव्या कार्यकर्त्यांची घालणार सांगड

अध्यक्षपदाच्या माध्यमातून भारतीय जनता पक्ष सर्वसामान्य जनतेपर्यंत नेण्याची जबाबदारी पक्षाने दिली आहे. त्याचबरोबर आगामी काळात कार्यकर्त्यांनाही न्याय देण्यासाठी प्रयत्नरत राहणार आहे. २०१७ मध्ये राजकीय कार्य थांबवून पूर्वीपासून सुरू असलेले सामाजिक कार्य करत राहण्याचा निर्णय घेतला होता. परंतु तत्कालीन शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी सरचिटणीस करून नव्या-जुन्यांची सांगड घालत एकोप्याने काम केले. भारतीय जनता पार्टीचे सर्व ज्येष्ठ नेते आणि कार्यकर्त्यांच्या बळावर सोलापूर महानगरपालिकेवर पुन्हा एकदा वाढीव जागांसह सत्ता आणणार आहे.

**- रोहिणी तडवळकर, शहराध्यक्षा, भाजपा**



## पर्यटकांनी ऐतिहासिक पर्यटनांचा लाभ घ्यावा

- विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाने (आयआरटीसीटी) ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा परिचय करून देण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज सर्किट' या एका विशेष रेल्वेची घोषणा केली आहे.



ही यात्रा 'भारत गौरव टुरिस्ट ट्रेन' अंतर्गत ९ जून २०२५ पासून सुरू होत आहे. या सहलीद्वारे महाराष्ट्रातील विविध ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व असलेल्या ठिकाणांचा पर्यटकांनी अनुभव घ्यावा, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले आहे. या ५ दिवसांच्या विशेष प्रवासात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट,इतिहासावर आधारीत कार्यक्रम असणार आहेत. भारत गौरव ट्रेनच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तेजस्वी इतिहासाशी निगडीत धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांना व्यापक प्रसिद्धी मिळवून देण्याचा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा मानस आहे.

याबाबत पर्यटनमंत्री शंभूराज देसाई व राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यात्रेदरम्यान गडकोटावर, ऐतिहासिक स्थळी पर्यटकांना आवश्यक सुविधा देण्यात येणार आहेत.

## विमानतळ, पाणी टंचाईवर जनआंदोलन उभारा

- ✔ विरोधी पक्षनेते दानवेंचा पदाधिकाऱ्यांना सल्ला
- ✔ जिल्हाप्रमुख पाटील यांच्या संपर्क कार्यालयाचे केले उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

गेल्या अनेक वर्षांपासून सोलापूर येथे विमानसेवा चालू करण्यासाठी अनेकजण धडपडत आहेत; मात्र सत्ताधारी ही विमानसेवा चालू करीत नाहीत. इतकेच कायतर शहरातील पाणीटंचाई, उड्डाणपुलांचा विषय व सामान्यांचे विविध विषय घेवून शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी जनआंदोलन उभारावे, असे आवाहन विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केले.

शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांच्या विजापूर रोडवरील मध्यवर्ती संपर्क कार्यालयाचे उद्घाटन दानवे यांच्या हस्ते आज पार पडले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकिळ, आ. प्रविण स्वामी, शिवसेना उपनेत्या अस्मिता गायकवाड, शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वानकर, संभाजी शिंदे, लोकसभा क्षेत्रप्रमुख पुरूषोत्तम बरडे, शहर महिला संघटिका प्रिया बसवंती, शहरप्रमुख मीनल दास यांच्यासह युवासेना पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमात विरोधी पक्षनेते दानवे यांनी शहरातील विविध प्रश्नावर भाष्य करीत सत्ताधाऱ्यांवरही टिका केली. तर नूतन जिल्हाप्रमुख पाटील यावेळी म्हणाले की, मी लहानपणापासून शिवसेनेतच असून, सामान्य नागरिकांच्या प्रश्नांची मला चांगली जाण आहे. पक्षाने जिल्हाप्रमुख पदाची संधी दिल्याने पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनातून शहरातील महत्वाचे ज्वलंत प्रश्न आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना या संपर्क कार्यालयातून न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहे. यावेळी इतरही पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



### सोलापूर रेल्वे स्थानकावर झाले जंगी स्वागत

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे सोलापूर शहरात आगमन होताच जिल्हाप्रमुख संतोष पाटील, अजय दासरी यांनी त्यांचे रेल्वेस्थानकावर जंगी स्वागत केले. यावेळी जय भवानीऽ जय शिवाजी घोषणांनी रेल्वे स्थानक परिसर दणाणला.

### दानवे यांची सेंट्रल टेक्सटाईल्सला भेट

सोलापुरात दानवे आल्यानंतर प्रथम त्यांनी अक्कलकोट औद्योगिक वसाहतीकडे प्रयाण करून दुर्घटनाग्रस्त सेंट्रल टेक्सटाईल्स कारखान्यास भेट देवून पाहणी केली. यावेळी शासकीय अधिकाऱ्यांचीही उपस्थिती होती. या घटनेची माहिती घेवून दानवे यांनी शिवसेनेच्या उपनेत्या अस्मिता गायकवाड यांच्या अस्मिता व्हिजन कार्यालयास भेट दिली. याचबरोबर अजय दासरी यांच्या निवासस्थानी,संपर्क कार्यालयास दानवे यांनी भेट दिली आणि शासकीय विश्रामगृहावरून ते तुळजापूरकडे मार्गस्थ झाले.

## राज्यात मराठीपेक्षा इंग्रजीच सरस

### अध्यादेश काढूनही मराठी विषय अडगळीत?

**तभा वृत्तसेवा । अमोगसिद्ध मुंजे**
**सोलापूर दि. २२ मे-**

सर्व व्यवस्थापन, माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा करण्याचा आदेश शासनाने काढला आहे. तरीही अनेक शाळांत मराठी विषयाकडे दुर्लक्ष झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे अध्यादेश काढूनही मराठी विषय अडगळीत पडल्याची चर्चा शिक्षकांमध्ये होत आहे. नुकत्याच लागलेल्या दहावी परीक्षेच्या निकालात राज्यातील ३८ हजार विद्यार्थी मराठी विषयात अनुत्तीर्ण झाल्याने मराठी भाषेविषयी चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

मराठी विषय वर्गात न शिकवणाऱ्या शाळांची संख्या मोठी असल्याची माहिती शिक्षकांनी दिली आहे. त्यामुळे शासनाने अध्यादेश काढूनही मराठी विषयाकडे दुर्लक्ष करत असल्याचे वास्तव आहे.




राज्य शासनाने मराठी भाषेचे सक्तीने अध्ययन आणि अध्यापन अधिनियम २०२० साली केला आहे. या अधिनियमांची अंमलबजावणी एक एप्रिल २०२० पासून झाली होती. कोरोना संसर्गामुळे नियमितपणे शाळा सुरू नसल्याने २०२२-२३ इयत्ता आठवी २०२३-२४ मध्ये नववीत आणि २०२४-२५ मध्ये दहावीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना एकवेळची सवलत दिली होती. त्यात मराठी विषयाची परीक्षा गुणांकनाची न ठेवता श्रेणी स्वरूपात मूल्यांकन करण्याचा निर्णय १९ एप्रिल २०२३ रोजी घेतला होता. मराठी भाषा विषयाचे मूल्यांकन श्रेणी स्वरूपात करण्याचे सवलत दिली असली तरी राज्यातील शासकीय आणि खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्ययन होणे गरजेचे आहे. मात्र, शाळा याकडे दुर्लक्ष करत आहेत.

देशाच्या आर्थिक जडणघडणीत महाराष्ट्राचे अनन्यसाधारण योगदान आहे. त्यामुळे देशातील कानाकोपऱ्यातून लोक येथे वास्तव्यास येत असतात. महाराष्ट्रातील अनेक मोठी शहरं आता बहुभाषिक शहरं झाली आहेत. त्यामुळे सामान्य माणसासाठी सर्वपरिचीत भाषा म्हणून हिंदी किंवा इंग्रजीचा वापर केला जातो. यामुळे मराठी भाषा साहजिकच मागे पडते. अशावेळी तुम्ही सार्वजनिक ठिकाणी मराठीचा आग्रह धरलात तर इतर राज्यातून आलेले परभाषिक लोकही मराठी भाषा शिकण्यास प्रवृत्त होतील आणि किमान मराठी बांधवांशी तरी मराठीतून संवाद साधतील.

### मराठीत ३८ तर इंग्रजीत ६ हजार नापास

राज्यात २०२५-२६ला घेतल्या गेलेल्या इयत्ता दहावीची परीक्षा पार पडली. यामध्ये मराठी विषयात अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे.मराठी विषयात ३८ हजार ४४७ तर इंग्रजी विषय ६ हजार ७३८ विद्यार्थी नापास झाले आहेत.




### आधुनिक शिक्षणामुळे मराठी भाषेकडे दुर्लक्ष

राज्यातील प्राथमिक व खाजगी आस्थापनातील सर्व स्तरावरील शाळांमध्ये आधुनिक शिक्षणामुळे इंग्रजीवर भर दिले जात आहे. आज सीबीएससी, इंग्रजी माध्यम किंवा आयसीएससी या शाळांमध्ये प्रामुख्याने मराठीला दुय्यम दर्जा दिला जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा इंग्रजीकडे जास्त कल व मराठीकडे दुय्यम स्तर म्हणून बघितले जात आहे. यामुळे मराठी भाषा शिकण्यामध्ये किंवा शिकवण्यामध्ये विद्यार्थी पालकांचा निरूउत्साह दिसून येते.

### मराठी भाषेला अभिजात दर्जा तरी इतर राज्याच्या तुलनेने मागे



केंद्र सरकारने महिनाभरापूर्वी मराठी भाषेला अभिजात दर्जा म्हणून मान्यता दिली आहे. देशांमध्ये इतर राज्यात त्यांचे मूळ भाषांना प्राधान्य दिले जाते. नंतर इतर भाषांना ते स्थान देतात. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात सुद्धा मराठी भाषा व मराठी विषय सक्तीचे व अधिनियमन असताना सुद्धा मराठी भाषा व मराठी विषयाकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे . मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यावर सुद्धा मराठी विषय अडगळीत पडत आहे.

**-विद्यानंद हिरेमठ, शिक्षक, लोकसेवा विद्यामंदीर व महाविद्यालय मंद्रुप.**

### वाचन, लेखनाची सवय मोडल्यामुळे शुध्दलेखनाचा अभाव



मराठी विषय किंवा भाषा म्हणून वरवर सोपा वाटत असल्याने अभ्यास काळजीपूर्वक केला जात नाही. तसेच वाचन आणि लेखनाची सवय मोडल्यामुळे शुध्दलेखनाचा अभाव दिसून येत आहे. त्याचबरोबर पुस्तकातील पूर्ण अभ्यासक्रम शिकवला जात नाही. सोपे अगोदर शिकवले जाते आणि अवघड भागाकडे दुर्लक्ष केले जाते.. एवढेच नव्हे तर इंग्रजी खूपच अवघड म्हणून मराठीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते.

**-प्रा. जवाहर मोरे, संतोष भीमराव पाटील महाविद्यालय मंद्रुप.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी ११२४

**सोनियाचें ताट क्षीरीनें भरिलें ।**
**भक्षावया दिलें श्वानालागीं ।।**

कोणाला काय द्यावे व कोणाकडून काय घ्यावे हे माणसाच्या लक्षात आले पाहिजे. योग्य-अयोग्यतेचा, विचार न करता केलेले कार्य व्यर्थ जाऊ शकते, किंवा अंगलट येऊ शकते. आपली कृती व्यर्थ जाऊनही किंवा अंगलट येऊन माणूस बऱ्याचवेळा त्या वृत्तीची पुनरावृत्ती करतो. बुध्दीजीवी माणसांकडून समजत असूनही चुकीच्या गोष्टी जेव्हा घडतात, जेव्हा मात्र आश्चर्यच वाटते. अशा आश्चर्य किंवा लाजीरवाण्या वाटणाऱ्या कृती करणाऱ्यांची संख्या समाजात कमी नाही. कोठे काय करावे व कोठे काय करु नये, याचा योग्य तो विचार न करता वर्तन करण्यामुळे अशा लोकांची संख्या वाढत आहे. ज्याला जे हवे व ज्या पध्दतीने हवे किंवा ज्याच्याकडून जे घ्यावे किंवा ज्या पध्दतीने घ्यावे याचा विचार अनेकजण करीत नाहीत. कुत्र्याला अन्न देणे आवश्यक असले तरी सोन्याच्या ताटात दुध भरुन त्याच्यापुढे ठेवणे मूर्खताच होईल. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**सोनियाचें ताट क्षीरीनें भरिलें ।**
**भक्षावया दिलें श्वानालागीं ।।**

मोलाचा हार तयार करायचा आणि गाढवाच्या गळयात घालायचा किंवा सुगंध घेता यावा म्हणून कस्तुरी डुकराच्या नाकाला लावायची म्हणजे निश्चितच शहापणा नव्हे. बहिऱ्या माणसाला अजिबात ऐकू जात नाही, याचे ज्ञान होवूनही एखादया वेदाचार्यांनी त्याच्यापुढे वेद सांगीतले तर त्या बहि-याला वेदातील कांही तरी कसे कळणार ? अर्थात, एखादी गोष्ट, कृती करतांना ती समोरच्यासाठी कितपत योग्य आहे, त्याचबरोबर त्या कृतीचा आपल्यावर कांही विपरीत परिणाम होईल का? या कृतीतून योग्य अशी फलनिष्पत्ती आहे का? या प्रश्नांचा सारासार विचार केला पाहिजे. एखाद्या कमच्या फलात आपणाला अडकायचे नाही, हे जरी सत्य असले तरी ती कृती व्यर्थ जाणार नाही, याचाही विचार आपण केला पाहिजे. गरजवंताला न देता लोक ज्याच्याकडे उपलब्ध आहे किंवा ज्याला गरजच नाही अशांना देतात. आपल्या देण्याने ज्याला कांहीच फरक पडणार नाही किंवा आपल्या देण्याची ज्याला महती वाटत नाही, त्याला देण्यात अर्थ नसतो. अर्थात, आपणाला जसे देता आले पाहिजे तसे समोरच्याला घेताही आले पाहिजे. याचाच अर्थ असा होतो की, देणाऱ्यालाही देताना योग्य वाटायला हवे, आणि घेणाऱ्यालाही घेतांना योग्य व आवश्यक वाटले पाहिजे. समाजव्यवस्थेतील गरीबी-श्रीमंती, लहान-मोठा अशी विविध प्रकारची दरी मिटण्यासाठी आपल्या योग्य-अयोग्यतेच्या विचाराअंती केलेल्या कृतीची मदत होऊ शकते. आपण योग्य-अयोग्यतेचा विचार न करता वाट्टेल तशी कृती करीत गेलो तर विषमतेची दरी वाढत जाईल. गरजवंताला दयायलाही भाग्य लागते हे लक्षात ठेवावे. सुर्दैवाने आपणाला गरजवंत सापडला तर त्याला मन:पूर्वक जेवढे जमेल तेवढे द्यावे. ज्याला गरजच नाही त्याला कौतुक म्हणून सुध्दा देऊ नये. अन्यथा केलेली कृती व्यर्थ तर जाईलच पण एखाद्यावेळी ती अजीर्ण झाल्यासारखीही होईल.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# एलटीटी मुंबई-रायचूर, रायचूर-पुणे विशेष रेल्वे गाड्या धावणार

### प्रवाशांची वाढती गर्दी पाहता रेल्वे प्रशासनाने घेतला निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ मे-**

प्रवाशांच्या मागणीनुसार,प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वे सोलापूर विभागातून एलटीटी मुंबई-रायचूर आणि रायचूर-पुणे एकेरी विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय मध्य रेल्वे विभागाने घेतला आहे. याविशेष गाड्या मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील कुईवाडी, सोलापूर, कलबुर्गी, वाडी या चार स्थानकांवर थांबणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाकडून माध्यमांना देण्यात आली.



दरम्यान, २२ मे २०२५ रोजी दुपारी ३:३० वाजता एलटीटी मुंबईहून निघणार असून, दुसऱ्या दिवशी पहाटे ५:३० वाजता रायचूरला पोहोचणार आहे. या गाडीच्या २ फेऱ्या आहेत. हीच गाडी २३ मे २०२५ रोजी सोलापूर, कुडूवाडी, वाडीला गाडी थांबणार आहे. रायचूर-पुणे वन वे स्पेशल गाडी २५ मे २०२५ रोजी दुपारी ३ वाजता रायचूरहून निघणार असून, दुसऱ्या दिवशी दुपारी पुण्याला पोहोचणार आहे. या गाडीला कृष्णा, यादगीर, नालवार, वाडी, कलबुर्गी, सोलापूर, कुडूवाडी आणि दौंड याठिकाणी थांबा देण्यात आला आहे. ही गाडी १ एसी-२ टियर, ४ एसी-३ टियर, ११ स्लीपर क्लास, २ जनरल सेकंड क्लास आणि २ सामानासह गार्ड ब्रेक व्हॅन धावणार आहे.

### गाड्यांचा वेग अन् प्रवासी संख्या वाढली

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात असलेल्या गाड्यांचा वेग वाढला असून, प्रवाशांची संख्याही वाढली आहे. या वाढलेल्या प्रवासी संख्येमुळे रेल्वेच्या उत्पन्नात सातत्याने भर पडत असल्याचे सांगण्यात आले.दुपारी ३ वाजता रायचूरहून निघेल आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ४ वाजता एलटीटी मुंबईला पोहोचणार आहे. या गाडीचे एक फेरी होणार आहे. या गाडीला ठाणे, कल्याण, लोणावळा, पुणे, दौंड, कुईवाडी, सोलापूर, कलबुर्गी, वाडी, नालवार, यादगीर आणि कृष्णा याठिकाणी थांबा असणार आहे. या विशेष ट्रेनचे आरक्षण विशेष शुल्कासह सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि रेल्वेच्या वेबसाइटवर उपलब्ध असणार असून, अनारक्षित डब्यांसाठी बुकिंग यूटीएस प्रणालीद्वारे प्रवाशांना करता येणार आहे, असेही रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

## मतदारास धमकी दिल्याचे प्रकरण; सपाटे यांचेसह पाच जणांची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ मे -**

सन २०१२ रोजीच्या सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीदरम्यान मतदार फिर्यादीस पैशाचे आम्हीच दाखवले, धमकी दिली, साक्षीदारास मारहाण केल्याच्या गुन्ह्यातून माजी महापौर मनोहर गणपत सपाटे (वय-६०), ज्ञानेश्वर बबन सपाटे (वय-४०), बालाजी उर्फ बंटी किरण सोनके (वय-३२), ज्ञानेश्वर जगन्नाथ सुरवसे (वय-३७, सर्व रा. निराळे वस्ती, मुरारजी पेठ, सोलापूर), प्रवीण ज्ञानेश्वर झूंजुरडे (वय-३५, रा. खमितकर अपार्टमेंट जवळ, सोलापूर) यांची यांनी मुख्य न्यायदंडाधिकारी विक्रमसिंह भंडारी यांनी त्यांची निर्दोष मुक्तता केली.

प्रभाग क्रमांक ११ ब मधून मनोहर सपाटे यांना राष्ट्रवादी पक्षाकडून तर प्रकरणातील साक्षीदार योगेश पवार यांना मनसेकडून उमेदवारी मिळाली होती. ४ फेब्रुवारी २०१२ रोजी मनोहर सपाटे यांनी योगेश पवार यांना नामांकन अर्ज माघार घेण्याकरिता दमदाटी केली, तसेच १६ फेब्रुवारी २०१२ रोजी रात्री साडेबाराच्या सुमारास मनोहर सपाटे यांचे सह वर नमूद चार आरोपी हे फिर्यादी राणीबाई येरटे या महिलेच्या घरी जाऊन तिस पैसे घ्या व मत मनोहर सपाटे यांना द्या असे म्हणाले, त्यावर फिर्यादीने नकार दिला. त्यानंतर आरोपींनी फिर्यादीचे घरात घुसून तिस शिवीगाळ करून जीवे ठार मारण्याची धमकी दिली, दरम्यान बाळू लोंढे यांनी सोडवण्याचा प्रयत्न केला असता मनोहर सपाटे यांनी त्यास चापट मारली तर ज्ञानेश्वर सपाटे यांनी फरशी उचलून फेकून मारली अशा आशयाची फिर्याद राणीबाई येरटे यांनी आरोपींविरुद्ध फौजदार चावडी पोलिसात दिली. या खटल्याच्या सुनावणीवेळी दोघांचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपींची सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली. यांत सरकारतर्फे ॲड. अमर डोके यांनी तर आरोपींतर्फे ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड. श्रीपाद देशक, ॲड. सिद्धाराम पाटील यांनी काम पाहिले.

## डायग्रोस्टीक्स सेंटरमध्ये महिलेचा विनयभंग

### फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ मे -**

शहरातील एका डायग्रोस्टीक्स सेंटरमध्ये सिटी स्कॅन करण्यासाठी आलेल्या महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी सिटी स्कॅन करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ९ मे रोजी सायंकाळी घडली असून याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन स्वामी नावाच्या व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिडीत महिला हीच्या नाकामधील मांस





वाढल्याने त्यांना त्रास होत होता. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार नाकाचीतपासणी करण्यासाठी पिडीता या ९ मे रोजी दत्त चौकातील डायग्रोस्टीक्स सेंटरमध्ये गेल्या होत्या. त्यावेळी सिटी स्कॅन करणाऱ्या स्वामी नावाच्या व्यक्तीने सिटी स्कॅन करताना वाईट उद्देशाने पिडीतेला स्पर्श करून तिचा विनयभंग केला. म्हूणन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक मोरे-पाटील पुढील तपास करीत आहेत.

## अग्नीदुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर आ. रोहित पवार यांनी पीडित कुटुंबाची घेतली सांत्वनपर भेट

### आर्थिक सहाय्यासाठी आवाज उठवणार : आ. पवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ मे-**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे युवा नेते आमदार, रोहित पवार हे सोलापूर दौऱ्यावर आल्यानंतर शहरातील एमआयडीसी परिसरात घडलेल्या दुर्दैवी अग्नीतांडवाच्या दुर्घटनेतील पीडित कुटुंबाची भेट घेतली. यावेळी त्यांनी आगीच्या दुर्घटनेची संपूर्ण माहिती घेत पाहणी केली. सदर घटनेचा राज्यात व देशात शोक व्यक्त करण्यात आला. घडलेल्या दुर्घटनेत नऊ जणांचा मृत्यू झाला. त्यात एक दीड वर्षाच्या बाळाचा



समावेश होता. आमदार रोहित पवार यांनी घटनास्थळी जाऊन पीडित कुटुंबाची सांत्वनपार भेट घेतली. यावेळी त्यांनी पीडित कुटुंबाला आधार दिला. आगामी विधानसभा अधिवेशनात सोलापुरातील अग्निशामक दलाचा मुद्दा आक्रमकपणे मांडून पीडित कुटुंबीयांना सामाजिक व आर्थिक स्वरूपात न्याय देण्याचा प्रयत्न करणार अशी ग्वाही दिली

तत्पूर्वी, सोलापूर शहरातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या कार्यालयामध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी पवार यांनी ज्येष्ठ आणि कनिष्ठ अशा सर्व पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना आगामी महापालिका निवडणुकीसाठी सज्ज राहण्याचा सल्ला दिला. निवडणुकीमध्ये कॉंग्रेसने शेवटच्या क्षणी आघाडी तोडण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे पक्षाचे मोठे नुकसान झाले. परंतु यंदाच्या निवडणुकीमध्ये आघाडी किंवा स्वबळ निवडणूक लढवण्याचा निर्णय वरिष्ठ पातळीवरून घेऊ, मात्र गाफील न राहता स्थानिक पातळीवर सन्मानाने वागणूक मिळत असेल तर आघाडी करून निवडणूक लढवू, अन्यथा स्वबळावर निवडणूक लढण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहण्याच्या सूचना देखील यावेळी त्यांनी दिल्या. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल, माजी महापौर यू.एन. बेरिया,प्रशांत बाबर, माजी नगरसेवक प्रथमेश कोठे, सुनिता रोटे, सरफराज शेख, चंद्रकांत पवार आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शुक्रवार
दि. २३ मे २०२५
विक्रम संवत् २०८१
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसू
मास - वैशाख
कृ. एकादशी (२२.३०)
ऋतु - वसंत
नक्षत्र - उ.भाद्रपदा (१६.०२)
योग - प्रीति (१८.३६)
करण - बव (१९.५४)

दिनविशेष - चांगला दिवस, संत श्री पारनेरकर महाराज वार्षिकोत्सव, अपरा एकादशी

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष :** लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल.मन उत्साही राहिल्याने आजचा दिवस चांगला जाईल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृषभ :** कार्यक्षेत्रात प्रगती होईल. आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक राहील.

**मिथुन :** खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क :** नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.

**सिंह :** पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. वहान चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे.

**कन्या :** व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ :** प्रवास सावधानीने करावा. चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक :** व्यापारिक कामे यशस्वी होतील. सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु :** आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील. आळस करू नका.

**मकर :** खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे.

**कुंभ :** सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन :** आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या. व्यापारा निमित्ताने केलेला प्रवास सफल होईल. अश्वासन देऊ नका.

# चला जाणून घेऊया हे नक्षत्र आहेत तरी काय ! आणि ते कसे तयार होतात

शास्त्रीय हिंदू धर्मग्रंथामध्ये उदा. महाभारत, हरिवंश यामध्ये नक्षत्रांच्या निर्मितीचे श्रेय दक्ष राजाला दिले जाते. ब्रह्मांडामध्ये अगणित तारे, ग्रह असतात या ताऱ्यांचा अभ्यास केल्यावर आपल्या ऋषीमुनींना या ताऱ्याचे समूह दिसले आणि याच ताऱ्याच्या समूहाला आपण नक्षत्र असे म्हणतो.

चंद्र पृथ्वीभोवती ज्या मार्गाने भ्रमण करतो त्या मार्गाला 'क्रांतिवृत्त' असे म्हणतात. या क्रांतिवृत्ताचे २७ समान भाग केलेले आहेत आणि याच भागांना नक्षत्र असे म्हणतात.तर आकाश मंडल मध्ये २७ नक्षत्र आहेत आणि या २७ नक्षत्रांना १२ भागांमध्ये विभाजित केले गेले आहे, ज्याला आपण १२ राशी म्हणतो.

### राशीचक्र :२७ नक्षत्राचे वर्तुळ

राशीचक्र म्हणजेच २७ नक्षत्राचे वर्तुळ आहे .भारतीय ज्योतिषशास्त्रामध्ये राशी ठरवण्यासाठी ब्रह्मांडाला ३६० अंशामध्ये विभाजन केले आहे. ३६० अंशला २७ ने भागले असता ३६० /२७ =१३.३३ म्हणजेच प्रत्येक नक्षत्र १३.३३ डिग्री एवढे क्षेत्र व्यापते. ज्योतिष शास्त्रामध्ये डिग्री म्हणजे=अंश, मिनिटाला = कला , सेकंदला=विकला म्हटले जाते. १३.३३ अंश = १३ अंश + .३३ म्हणजे १/३ .१ अंश = ६० मिनिटे असतात.१/३ अंश = ६० मिनिटे /३ = २० मिनिटे = मिनिटाला कला म्हटले जाते म्हणून = २० कला म्हणजेच प्रत्येक नक्षत्र १३.३३ अंश = १३ अंश २० कला , एवढे असते .

राशी ३० अंश च्या असल्यामुळे काही नक्षत्रे दोन राशीमध्ये विभागले जातात . साधारणत : एक नक्षत्राचे चार भाग असून प्रत्येक भाग ३ अंश २० कलाचा असून त्या प्रत्येक भागाला चरण असे म्हणतात . म्हणजेच प्रत्येक नक्षत्रा मध्ये ४ चरण असतात . एकून २७ नक्षत्रे आहेत म्हणजेच २७ ÷ ४ = १०८ चरण असतात.एक राशीत ९ चरण असतात .तसेच तैतरिय संहितेत आणि अथर्ववेदात २८ नक्षत्रांचा उल्लेख आढळतो . त्यातील २८ व्या नक्षत्राचे नाव आहे 'अभिजीत ' परंतु कालांतराने हे क्रांतिवृत्तावरून बाजूला सरकले म्हणून आज केवळ २७ नक्षत्रे मानली जातात.

### पावसासाठीची नऊ नक्षत्रे

सूर्याच्या नक्षत्रात असण्याबद्दल





व चांद्रमासाबद्दल काही सामाजिक व सांस्कृतिक संकल्पना/तथ्ये/म्हणी- सत्तावीस वजा नऊ = शून्य... मृग, आर्द्रा, पुनर्वसू, पुष्य, आश्लेषा, मघा, पूर्वा, उत्तरा आणि हस्त ही महाराष्ट्रातल्या

पावसासाठीची नऊ नक्षत्रे आहे. सूर्य मृग नक्षत्रात आला की, पावसाळा सुरू होतो आणि तो हस्त नक्षत्रात गेला की,पावसाळा संपतो. म्हणून मृग ते हस्त ही सारी पावसाची नक्षत्रे मानली जातात. एकूण नक्षत्रे सत्तावीस असली तरी यांच नऊ नक्षत्रांत पाऊस पडला नाही तर परिणाम शून्य. त्यामुळे, सत्तावीस वजा नऊ = शून्य!

जेव्हा सूर्य मृग नक्षत्रात असतो, तेव्हा गडगडाटासह मॉन्सूनपूर्व पाऊस पडतो. नैर्ऋत्य दिशेकडून मॉन्सून भारतात प्रवेश करण्याचा प्रयत्न करीत असतो,पण देशावरची परिस्थिती त्याला अडथळा करते.या संघर्षातून ढगांचा गडगडाट होतो. काही दिवसातच मॉन्सूनचा जोर वाढतो आणि सर्व अडथळे दूर करून मॉन्सून भारतभर पसरतो. जेव्हा सूर्य हस्त नक्षत्रात असतो, तेव्हा महाराष्ट्रात हत्तीच्या सोंडेसारखा मुसळधार गडगडाटी पाऊस पडतो.(परतीचा मान्सून /वळीव)त्या काळात हत्तीचे चित्र काढलेल्या बसायच्या लाकडी पाटाभोवती फेर धरून स्त्रिया व मुली भोंडला खेळतात. परतीच्या वाटेवरचा नैर्ऋत्य मॉन्सून आणि येऊ पाहणारा ईशान्य मॉन्सून यांच्या संघर्षामुळे हा गडगडाट होतो. २५ मे रोजी सूर्य रोहिणी नक्षत्रात येतो.तो दिवस धरून पुढचे एकूण नऊ दिवस मध्य प्रदेश आणि आजूबाजूच्या राज्यांत हवेचे तापमान खूप जास्त असते आणि उन्हाळ्याची सर्वाधिक तीव्रता जाणवते. या घटनेला 'नौतपा' म्हणतात.

**वैशाख वणवा :-** वैशाखात जंगलांना आगी लागण्याचे प्रमाण जास्त असते. अश्या आगीला वैशाख वणवा म्हणतात. एखाद्याच्या आयुष्यात रखरखाट असेल, तर त्यालाही वैशाख वणव्याची उपमा देतात.

### अशी आहेत २७ नक्षत्रे

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अश्विनी | १५ | स्वाती |
| २ | भरणी | १६ | विशाखा |
| ३ | कृतीका | १७ | अनुराधा |
| ४ | रोहिणी | १८ | जेष्टा |
| ५ | मृगशीर्ष | १९ | मूळ |
| ६ | आर्द्रा | २० | पूर्वाषाढ |
| ७ | पुनर्वसु | २१ | उत्तराषाढ |
| ८ | पुष्य | २२ | श्रवण |
| ९ | अश्लेषा | २३ | धनिष्ठा |
| १० | मघा | २४ | शततारका |
| ११ | पूर्व फाल्गुनी | २५ | पूर्वाभाद्रपदा |
| १२ | उत्तरा फाल्गुनी | २६ | उत्तरभाद्रपदा |
| १३ | हस्त | २७ | रेवती |
| १४ | चित्रा | | |

**काल वैसाखी :** बंगालमध्ये वैशाख महिन्यात ज्या स्थानिक वावटळी आणि धुळीची वादळे हतात त्यांना काल वैसाखी म्हणतात.

**श्रावणधारा :** महाराष्ट्रात श्रावण महिन्यात सौम्य ऊन व झिमझिम पाऊस पडतो, अशा पावसाला श्रावणधारा म्हणतात.

**चैत्रपालवी :** चैत्र महिन्यात झाडांनी जी नवी पालवी फुटते तिला चैत्रपालवी म्हणतात.

**पानगळ :** समशीतोष्ण प्रदेशांत नैसर्गिकरीत्या झाडांची पाने गळण्याचा कालावधी शरद ऋतूचा असतो तर उष्ण कटिबंधात हवामान शुष्क होण्याआधी पानगळ होते.

**आधीच उल्हास त्यातून फाल्गुन मास - मराठी म्हण**
**दुष्काळात तेरावा महिना. - वाक्प्रचार**

**चतुर्मास (चातुर्मास) :** आषाढी एकादशीला (शयनी एकादशीला) भगवान विष्णू झोपायला जातात, ते कार्तिकी एकादशीला (देवउठणी/प्रबोधिनी एकादशीला) उठतात. या चार महिन्यांच्या काळाला *'चातुर्मास'* म्हणतात. या काळात हिंदूंची व्रतवैकल्ये असतात, आणि जैन साधू 'स्थानकवासी होतात.

सूर्याच्या धनुराशीत प्रवेश केल्यानंतर, म्हणजे १६ डिसेंबरच्या आसपास खरमास सुरू होतो आणि १४ जानेवारीच्या आसपास संपतो. या महिन्यात सूर्याचा रथ गाढवे (खर) ओढतात व रथाच्या घोड्यांना विश्रांती मिळते.

सूर्याच्या मकर राशीतील प्रवेशाच्या दिवशी भारतात मकरसंक्रांत हा सण असतो. इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे हा दिवस २०व्या-२१व्या शतकात बहुतेक वेळा १४ किंवा १५ जानेवारीला आला आहे/येईल.

### पाऊसाचे प्रकार

**आसाळकाचा पाऊस :** आश्लेषा नक्षत्रातला पाऊस. **तरणा पाऊस :** पुनर्वसू नक्षत्रातला पाऊस. **नागडा पाऊस :** ऊन असताना पडणारा पाऊस. **म्हातारा पाऊस :** पुष्य नक्षत्रातला पाऊस. **सासूचा पाऊस :** मघा नक्षत्रातला पाऊस. **सुनेचा पाऊस :** पूर्वा फाल्गुन नक्षत्रातला पाऊस. **रब्बीचा पाऊस :** उत्तरा फाल्गुन नक्षत्रातला पाऊस. **हत्तीचा पाऊस :** हस्त नक्षत्रातला पाऊस पडतील स्वाती तर पिकतील माणिक मोती स्वाती नक्षत्रातल्या पावसाचा थेंब शिंपल्यात पडला, की त्याचा मोती होतो, अशी कल्पना आहे. स्वाती नक्षत्रात पाऊस पडला की चांगले पीक येते.

**पडतील चित्रा तर भात खाईल कुत्रा :** चित्रा नक्षत्रातला पाऊन बिन भरवशाचा असतो. पडला तर इतका पडतो की, तो काहीच शिल्लक ठेवत नाही. अगदी वाडग्यात काढून ठेवलेले उष्टावण असो की ताजे जेवण असो, ते एकतर सादळून तरी जाते किंवा बेचव होते. मग त्याचे वर्णन भात खाईना कुत्रा अशा बोलक्या शब्दांत आले आहे.

**आला आर्दोडा झाला गर्दोडा :**आर्द्रा नक्षत्रात पडणारा पाऊस गर्दोडा (चिखल) करतो. (एक ग्रामीण म्हण)पडता हत्ती कोसळतील भिंती. पडतील आद्रा तर झडतील गडदरा- आर्द्रा नक्षत्रात पाऊस बरसला तर, गडकोटांच्या तटबंदी ढासळतील. मथितार्थ असा की आर्द्रा नक्षत्रातला पाऊस पडझड करून जातो.

**पडतील मघा तर चुलीपुढे हगा:** मघा नक्षत्रातला पाऊस इतका सातत्याने पडतो की, माणूस घराबाहेर पडू शकत नाही, उबेसाठी तो चुलीपाशी बसतो. .

**पडल्या मिरगा (मृग) तर टिरीकडे बघा :** मृगात पेरणी होत नाही, मात्र पेरणीपूव मशागतीची कामे होतात. ही कामे महत्त्वाची असतात. जर का मृगाचा पाऊस पडला तर ही कामे खोळंबतात. परिणामी पुढच्या सर्व कामांचा विचका होतो. मग पावसाच्या मोसमाअखेरीस पोटावरून हात फिरविण्याची अनुभूती येत नाही. जुन्या मागच्या गोष्टींतच समाधान मानावे लागते. त्या अर्थाने टिरीकडे पहा असे शब्दप्रयोजन आहे.

**आश्लेषा नक्षत्र :** मी येते सळासळा, मामाजी तुम्ही पुढे पळा. आश्लेषाचा पाऊस असा असतो, आता होता आता नाही. तुम्ही पुढे पाऊस मागे, नाहीतर पाऊस पुढे तुम्ही मागे, असे याचे कोसळणे. हा सूर-ताल लावून पडत नाही, आली लहर केला कहर आणि गेला सरसर अशी याची तऱ्हा असते.

**पुष्य नक्षत्र(म्हातारा पाऊस):** पडतील पुक (पुष्य) तर चाकरीच्या गड्याला सुख! (पुष्य नक्षत्राचा पाऊस दिवसा ढवळ्या धो धो कोसळतो. आता थांबला म्हणेपर्यंत पुन्हा संततधार सुरू होते. औताला बैल जुंपेपावेतो आभाळ पुन्हा गळू लागते. मग अश्या वेळेला गड्याला कामाला लावता येत नाही. त्याच्यासाठी हा आरामच असतो. हे सुख त्याला क्वचित लाभते.)

## महत्वाचे...



## मंद्रूपमध्ये हास्य तुषार ग्रुपतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे**

मंद्रुप (ता.दक्षिण सोलापूर) येथील हास्य तुषार या समूहाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. इयत्ता १२ वी परीक्षेत भरघोस यश संपादन केल्याबद्दल यशराज केवटे व समर्थ स्वामी यांचा तर इयत्ता १० वी परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल श्रेया सुतार, अंकिता बगले, गिरीजात्मक शिंगाडे, प्रितम कुंभार, शुभम स्वामी यांचा तर रणजीत म्हेत्रे याचा शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त शिक्षक अर्जुन थोरात, रेवणसिध्द म्हेत्रे, संगप्पा बगले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशामध्ये सिंहाचा वाटा असलेल्या श्री कोचिंग क्लासेसचे सर्वेसर्वा संजीवकुमार बगले यांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनी व पालकांनी आपले मनोगत व्यक्त करुन यश मिळवण्यासाठी कराव्या लागलेल्या प्रयत्नाची, मेहनतीची व अभ्यासाच्या पध्दतीची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समूहाचे संस्थापक प्रा. डॉ. जवाहर मोरे यांनी करुन ग्रुपच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमासाठी शिवानंद सलगरे, चंद्रकांत कुंभार, सिध्दाराम स्वामी, काशिनाथ बिराजदार, संजय म्हेत्रे, रवी म्हेत्रे, अनिल म्हेत्रे, शिवानंद जोडमोटे, धोंडीबा केवटे , राजेश शिंगाडे, अमोगसिध्द बडेगीर, सुभाष सुतार आदि उपस्थित होते.सूत्रसंचालन राजू राठोड यांनी केले तर आभार धिरज राठोड यांनी मानले.

## शेतकऱ्यांना हेक्टरी दोन लाख मदत द्यावी : अतुल खुपसे-पाटील

**टेंभुर्णी, दि.२२ मे-**

गेल्या दोन -चार दिवसात सोलापूर तसेच महाराष्ट्रातील बहुतांश भागात अवकाळी पाऊस प्रचंड मोठ्या प्रमाणात झाला आहे. शेतकरी अक्षरशः हवालदिल झाला असून यामुळे सोलापूर जिल्ह्यातील केळी व डाळिंब बागा, ऊस शेती तसेच शेतीतील इतर पिके मातीमोल झाल्याने शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे राज्य सरकारने शेतकऱ्यांबद्दल सहानुभूती दाखवून बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी २ लाख रुपयांचे अर्थसहाय्य करावे अशी मागणी जनशक्ती शेतकरी संघटनेचे अतुल खुपसे पाटील यांनी केली आहे.ते म्हणाले की, यंदाचा उन्हाळा म्हणावा तसा जाचक गेला नाही. याचे कारण म्हणजे पावसाने मान्सूनपूर्व हजेरी लावली आहे. भारतीय हवामान विभागाने दिनांक २१ ते २४ मे दरम्यान दिलेल्या मुसळधार वादळी पावसाच्या अंदाजानुसार तो बरसला आहे. वास्तविक पाहता अवकाळी पाऊस थोडाफार शेतकऱ्यांनी सहन केला असता. मात्र यावर्षी मान्सूनपूर्व झालेल्या प्रचंड पावसाने शेतकऱ्यांचे वेळापत्रक कोलमडून पडले आहे. त्यात अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याने शेतपिकांचे नुकसान झाल्याने हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. त्यामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्याला मायबाप सरकारने मदतीचा हात द्यावा. करमाळा, माढा, पंढरपूर तसेच सोलापूर भागातील सर्व बाधित शेतकऱ्यांचे लवकरात लवकर पंचनामे करून तातडीने हेक्टरी २ लाख रुपयांची मदत करावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशाराही अतुल खुपसे पाटील यांनी यावेळी दिला.

## बार्शीच्या सेंट जोसेफ स्कूलची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम

**बार्शी, दि. २२ मे-**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई ) इयत्ता दहावी परीक्षेत येथील सेंट जोसेफ सीनियर सेकंडरी स्कूलने यंदा १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. येथील एकूण ८६ विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते. त्यापैकी २४ विद्यार्थ्यांनी ९० टक्केपेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. विशेष कौतुक म्हणजे शाळेतील पाच विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवून उज्वल यश संपादन केले आहे. त्यापैकी जान्हवी बारबोले या विद्यार्थिनीने 'इंग्रजी' व 'मराठी' या दोन विषयांमध्ये १०० पैकी १०० गुण मिळविले आहेत. तसेच ९८.४ टक्के गुण मिळवून तिने शाळेत पहिला क्रमांक पटकावला आहे. शुभ्रा सरवदे ९७.६ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर हर्षिता माळी ९७.४ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. जान्हवी बारबोले व श्रावणी इनामदार या विद्यार्थिनींनी 'मराठी' विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले. प्रितिका शहा या विद्यार्थिनीने 'गणित' विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले, तसेच मयंक जैन या विद्यार्थ्याने आय टी विषयात पैकीच्या पैकी गुण मिळून यश संपादन केले आहे. उत्कृष्ट यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक फादर वर्गीस अगस्ती, शिक्षक, पालक यांनी अभिनंदन करुन त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. बार्शी पंचक्रोशीतून सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले जात आहे.

## खरीप पेरणीसाठी घाई नको; कृषीतज्ञ अप्पासाहेब पाटील

**अक्कलकोट, दि. २२ मे-**

खरीप हंगामाकरिता शेतकऱ्यांनी घाई करू नये असे आवाहन निर्मल सीड्स कंपनीचे जिल्हा वितरक तथा कृषी तज्ञ आप्पासाहेब पाटील यांनी केले आहे जिल्हात सध्या मे महिन्यातच हंगाम पूर्व जोरात पाऊस पडत असून जमीन पेरणी योग्य ओलावा झालेली असली तरी सुद्धा शेतकरी बांधवांनी सात जून नंतरच पेरणी पेरणी करावी असे आवाहन कृषी तज्ञ आप्पासाहेब पाटील यांनी केले आहे. शेतकऱ्यांनी शंभर मिलिमीटर पावसाची नोंद झाल्याशिवाय पेरणी करू नये. खरिपाची पेरणी लवकर केली असता सोयाबीन, उडीद, तूर, कापूस या पिकास मोठ्या प्रमाणावर बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. मृगाचा पाऊसच योग्य असल्याचे श्री पाटील यांनी सांगितले.



# नवीन आराखड्यानुसार ३५० पेक्षा जास्त मालमत्तांना बाधा

### क्रेडाई पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन, शंका निरसन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ मे -**

कॉरिडॉर प्रमाणेच पंढरपूरकरांच्या मानगुटीवर बसलेल्या डी. पी. प्लॅन म्हणजेच शहर विकास आराखड्यानुसार सुमारे ३५० पेक्षा अधिक मालमत्ताधारकांना बाधा पोचणार असल्याचे समोर येत आहे. याबाबत येथील क्रेडाईच्या पदाधिकाऱ्यांनी बाधित क्षेत्रातील मालमत्ताधारकांना मार्गदर्शन व शंका निरसन केले.

या कार्यक्रमाचे आयोजन येथील हिंदुम हासभा व तिर्थक्षेत्र बचाव समितीच्यावतीने करण्यात आले होते. हिंदुमहासभा भवनात सोमवारी (दि.१९मे) नागरिकांना मार्गदर्शन करण्यासाठी सभेचे आयोजन केले होते. आधीच कॉरिडॉरने अनेक मालमत्ताधारक व नागरिक भयभीत असून त्यातच डीपी प्लॅनची संक्रांत आली आहे. कायदेशीरपणे जरी नगरपालिकेत नकाशे लावले असले तरी ते दुर्बोध व गुंतागुंतीचे तसेच अनाकलनीय आहेत. त्यामुळे प्लॅन सम



जावून सांगण्याची विनंती क्रेडाईला केली गेली. क्रेडाई ही बांधकाम व्यावसायिकांची देशातील मान्यवर संस्था असून पंढरपूर शाखेचेही कार्य समाजोपयोगी आहे. पंढरपूर शाखेचे अभियंता मंडळी जातीने उपस्थित राहून, स्वतःचा प्रोजेक्टर, स्क्रीन सर्व तांत्रिक साहित्य आणून नागरिकांना सदर डीपी प्लॅन दाखवून समजावून दिला.

यावेळी बऱ्याच नागरिकांनी शंका विचारल्या त्यांचे समाधानही केले.आणखीही काही असल्यास पुढेही मार्गदर्शन करणेचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी आक्षेप नोंदणीबाबत ही माहिती दिली. क्रेडाईचे अध्यक्ष आशिष शहा, उपाध्यक्ष शार्दुल नलबिलवार, प्रदेश समन्वयक अमित शिरगावकर, सचिन पंढरपूरकर, मिलिंद वाघ, महेश आराध्ये आदि उपस्थित होते.

प्रत्यक्ष प्लॅन समजावून सांगणेचे काम सचिव शशिकांत सुतार व संतोष कचरे यांनी परिश्रमपूर्वक केले. माजी अध्यक्ष व माजी नगरसेवक तुकाराम राऊत यांनी देखील बरेच सखोल मार्गदर्शन केले. तांत्रिक बाबी समजावून दिल्या. यानिमित्ताने बचाव समितीचे वतीने क्रेडाई पदाधिकाऱ्यांचा सत्कार अभयसिंह इचगांवकर व कौस्तुभ गुंडेवार व ॲड विनायक उंडाळे, ओंकार वाटणे यांनी केला.

### साडेतीनशे पेक्षा जास्त मालमत्ता होणार बाधित

कॉरिडॉर बरोबरच डी पी प्लॅन म्हणजेच डेव्हलपमेंट प्लॅन तिर्थक्षेत्र पंढरीत राबविला जाणार आहे. विशेष म्हणजे २०१२ सालचा हा खडलेला प्लॅन असून केवळ दोन रस्ते जादा होणार असुन बाकी आराखडा जुनाच आहे. त्यामुळे आराखडा म्हणजे दारु तीच केवळ बाटली नवी असे गंमतीने मार्गदर्शनानंतर नागरिक बोलत होते. या डीपी प्लॅन मध्ये ३५० हुन जास्त मालमत्ता बाधीत होणार आहेत.

### फी भरुन, उतारे जोडा

प्रदक्षिणा मार्ग, मंदिर परिसरातील काही लोकांच्या जागा, दुकाने बाधीत होणार आहेत. अनेकांना प्रत्यक्षात किती क्षेत्रफळ जाईल याची कल्पना नाही. यासाठी सिटी सर्व्हे (नगररचना भू मापन कार्यालय) येथे रीतसर फी भरुन उतारे जोडून शासकीय योग्य व अचूक माहिती घेण्यात यावी. यामुळे कुणावरही अन्याय होणार नाही असे, क्रेडाईच्या पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन करताना आवर्जून सांगितले.

### आराखड्यात काही चुका

आराखड्यात बारा मीटर रस्ता असलेल्या ठिकाणी नऊ मीटर दाखविण्यात आले आहे. नगरपालिकेत नकाशा पाहण्यासाठी स्थानिक येत आहेत पण काहीच लक्षात येत नसल्याने अखेर क्रेडाई संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी नागरिकांना मागदर्शन केले.

## सुरक्षेसाठी ग्रामपंचायतींनी पंचसूत्री उपक्रम राबवावेत

### पोलीस निरीक्षक पवार यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२२ मे-**

सध्याच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत गावामध्ये कायदा व सुव्यवस्था टिकवून ठेवणे, शांतता प्रस्थापित करणे आणि ग्रामस्थांची सुरक्षा सुनिश्चित करणे यासाठी ग्रामपंचायतींनी पंचसूत्री उपक्रम प्रभावीपणे राबवावेत, असे आवाहन टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी केले आहे.

पोलीस निरीक्षक पवार म्हणाले की, शरीरा विरुद्धचे गुन्हे व मालम त्तेचे गुन्हे रोखण्यासाठी ग्रामस्तरावर दक्षता घेणे अत्यंत आवश्यक आहे. ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन तंटामुक्त समिती स्थापन करून ती कार्यान्वित करणे,ग्राम सुरक्षा यंत्रणा सुरू ठेवणे,राम सुरक्षा दल स्थापन करून ते सक्रीय ठेवणे, महिला सुरक्षा समिती स्थापन करणे आणि कार्यरत ठेवणे, गावातील मुख्य चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे हे पंचसूत्री उपक्रम तातडीने सुरू करावेत. या उपक्रमांमुळे गावामध्ये शांतता नांदेल, गुन्हेगारीला आळा बसेल आणि गाव सुरक्षित राहील, असा विश्वास पोलीस निरीक्षक पवार यांनी व्यक्त केला. या उपक्रमासाठी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन पवार यांनी केले आहे. गावामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे पोलीस यंत्रणे सोबतच ग्रामपंचायत, तंटामुक्त समिती, पोलीस पाटील आणि ग्रामस्थ यांची सामूहिक जबाबदारी आहे. पंचसूत्री उपक्रम प्रभावीपणे राबवले, तर गाव गुन्हेमुक्त होईल आणि शांतता नांदेल.

## विशेष शिबिरांमुळे विद्यार्थ्यांना मिळताहेत वेळेत दाखले

### प्रांताधिकारी पडदुणे; ५ हजार १२ दाखल्यांचे झाले वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२२ मे-**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत महसूल विभागाच्यावतीने विविध दाखले देण्यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले. त्यातून आतापर्यंत ५ हजार १२ दाखल्यांचे वाटप झाले आहे. प्रवेश प्रक्रिया न अन्य कामासाठी लागणारे दाखले विद्यार्थ्यांना वेळेत मिळत आहेत असे प्रतिपादन प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे यांनी केले.

जिल्हाधिकारी यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोयीसाठी येथील शिवाजी महाविद्यालयातही विशेष शिबीर घेण्यात आले. त्यामध्ये ७०० दाखल्यांचे वाटप प्रांताधिकारी पडदुणे यांच्या हस्ते झाले. यावेळी तहसीलदार एफ.आर. शेख, महाविद्यालयाचे प्राचार्य अब्दुल शेख, निवासी नायब तहसीलदार सुभाष बदे, नायब तहसीलदार रवींद्र सानप, यावलकर उपस्थित होते. यामध्ये सेतू संकलन, अव्वल कारकून, ११ मंडल अधिकारी, ६५ तलाठी व महसूल कर्मचारी, विविध भागांतील म हा ई सेवा केंद्र, आपले सरकार केंद्रचालक यांनी सहभाग नोंदविला. शिबिरातील दाखल्याबाबत नायब तहसीलदार सानप म्हणाले, दि. २ ते २१ मे या कालावधीत महाराजस्व अभियानांतर्गत सर्व मंडळ अधिकारी स्तरावर ५ हजार १२ दाखल्यांचे वाटप झाले. दि. २० मे रोजी शिवाजी महाविद्यालय येथे तलाठी उत्पन्न दाखले तसेच तहसील कार्यालय स्तरावरील उत्पन्न, रहिवास, नॉन क्रिमिलियर आदी विविध प्रकारचे असे एकूण ७०० दाखले वाटप करण्यात आले. तर दि. २१ मे रोजी झाडबके महाविद्यालयात तलाठी व तहसील कार्यालय स्तरावरून ३८५ दाखले वाटप करण्यात आले आहेत. प्रांताधिकारी पडदुणे म्हणाले, विद्यार्थ्यांना जातीचा दाखला, उत्पन्न प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलियर आदी विविध प्रकारच्या दाखल्यांची आवश्यकता असते. प्रवेशासाठी ठराविक मुदत असते. मुदतीत सदरचे दाखले न मिळाल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसानही होऊ शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी महसूल विभागाच्यावतीने महाराजस्व अभियानांतर्गत शैक्षणिक दाखले वाटपासाठी बार्शी शहरासह मंडळ स्तरावर विविध ठिकाणी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. शिवाजी महाविद्यालयात सदरचे शिबीर आयोजित केल्याबद्दल प्राचार्य अब्दुल शेख यांनी महसूल विभागाचे आभार मानले. यामुळे पालक व विद्यार्थ्यांची चांगली सोय झाल्याचे त्यांनी सांगितले.



## विठ्ठल विठ्ठल गजरी, अवघी दुमदुमली भुसावळ नगरी

### श्री विठ्ठल व संत निवृत्तिनाथ भेट सोहळा भक्तीला उधाण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२२ मे -**

श्री संत मुक्ताबाईच्या ७२८ व्या अंतर्धान समाधी सोहळ्यास उपस्थित राहण्यासाठी श्री क्षेत्र पंढरपूरहून निघालेल्या श्री अनंतकोटी ब्रह्मांडनायक श्री पांडुरंगराय पादुका पालखी सोहळ्याने बुधवारी दि.२१ मे रोजी सायंकाळी ६.३० वाजता भुसावळ नगरीत प्रवेश केला. श्री पांडुरंगराय व श्री निवृत्तिनाथांच्या पादुका भेटीचा सोहळा येथे रंगला.देव व संत आगमनाने भुसावळ नगरी विठ्ठल नामाच्या गजरात दुमदुमून गेली. सायंकाळी हा सोहळा भुसावळ मुक्कामी विसावला.

दरम्यान बुधवारी सकाळी ६ वाजता छत्रपती संभाजीनगर येथील श्री गजानन महाराज मंदिरात श्री विठ्ठल पादुकांची पूजा व महाभिषेक व्यवस्थापक भागवत पाटील यांच्या हस्ते करण्यात आली. आरतीनंतर श्री संत मुक्ताई अंतर्धान समाधी सोहळ्यासाठी श्री पंढरीनाथ परम त्मा पांडुरंग यांच्या पादुकांचे मुक्ताईनगर कडे मार्गक्रमण झाले.



### जामनेर येथे भव्य स्वागत

दुपारी १२.३० वाजता पालखी सोहळा जामनेर येथे पोहोचला. येथे पालखी सोहळ्याचे स्वागत मंत्री गिरीश महाजन यांच्या परिवाराच्या वतीने करण्यात आले. कीर्तन व दुपारचा नैवेद्य दाखवून वारकऱ्यांना अमोल पाटील यांच्या वतीने अन्नदान करण्यात आले.

### भुसावळ मध्ये उत्साही स्वागत

श्री पांडुरंगाचा पालखी सोहळा भुसावळ येथील सावरकर चौकात पोहोचल्यानंतर मोठ्या उत्साहात सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. तेथून भव्य दिंडी मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी हा सोहळा भुसावळ येथील श्री विठ्ठल मंदिरात पोहोचला. येथे श्री विठ्ठल मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सुहास पालक यांनी विठ्ठल भक्तांचे स्वागत केले. येथे कीर्तन सेवा झाली व वारकऱ्यांना भोजन देण्यात आले. रात्री हा सोहळा भुसावळ मुक्कामी विसावला.

## पात्र आणि इच्छुकांना नोकरीची संधी : उत्तमकुमार नवघरे



### मंद्रुपमधील ५४ जणांस मिळाले नियुक्तीपत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मे-**

ग्रामीण भागातील मुलांमध्ये गुणवत्ता आहे. पात्र व नोकरी करण्याची इच्छा असणाऱ्या सर्वांना नोकरीची संधी असल्याचे प्रतिपादन बाबासाहेब आंबेडकर स्टुडन्ट युथ फाउंडेशनचे उत्तम कुमार नवघरे यांनी केले.

येथील संतोष भीमराव पाटील म हाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टुडन्ट युथ फाउंडेशन यांच्या वतीने रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी रोजगार मेळाव्यात ५४ जणांना ऑफर लेटर देण्यात आले. यामध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवीधर उमेदवारांनी सहभाग नोंदवला होता. अध्यक्षस्थानी माजी सभापती अप्पाराव कोरे होते. सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ संस्थेचे विश्वस्त नागेश बिराजदार, क्विझ कॉर्पोरेशनचे प्रकाश पवार, प्राचार्य डॉ. एम. एन. जाधव, सुरेंद्र चिड्डाळ आदी उपस्थित होते. कॅम्पस भरतीच्या शुभारंभप्रसंगी क्विझ कॉर्पोरेशनचे मॅनेजर प्रकाश पवार म्हणाले, नोकरी करण्यास इच्छुक असणाऱ्या पात्र उमेदवारांना याक्षणी आम्ही ऑफर लेटर देत आहोत. विद्यार्थ्यांना नामांकित कंपनीमध्ये काम करण्याची संधी उपलब्ध आहे. संस्थेच्या वतीने बोलताना नागेश बिराजदार म्हणाले, महाविद्यालय विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध करून देत आहे. विद्यार्थ्यांनी त्या संधीचा लाभ घ्यावा. प्राचार्य डॉ. एम. एन. जगताप यांनी प्रास्ताविक केले. प्रा विजय साळवे यांनी सूत्रसंचालन केले. समन्वयक डॉ. जवाहर मोरे यांनी आभार मानले.

## केतूरमध्ये ३० वर्षांनी झाली शालेय मित्र-मैत्रिणींची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२१ मे-**

नेताजी सुभाष विद्यालय केतूर नं.२ (ता.करमाळा) येथे इयत्ता दहावी १९९५ च्या बॅचचा माजी विद्यार्थी मेळावा संपन्न झाला.

संस्थेच्या प्रार्थनेने मेळाव्याची सुरवात झाली.उपस्थित सर्व आजी माजी शिक्षकांचे स्वागत विद्यार्थ्यांकडून शाल,श्रीफळ देवून करण्यात आले.सुरवातीला काश्मिरच्या पहलगाम हल्ल्यातील मृतांना श्रध्दांजली वाहून सैनिकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य काशिनाथ जाधव हे होते. सर्वांनी शाळेविषयी कृतज्ञता व्यक्त केली. सर्वांनी ३० वर्षांपूर्वीच्या शालेय व वर्गातील आठवणींना उजाळा दिला. त्या काळातील माजी शिक्षकांनीही मौलीक विचार व्यक्त केले. शाळेचे ऋण म्हणून शालेय बागेतील पेव्हर ब्लॉकसाठी ५५ हजार रूपये देणगी बंचतर्फे देण्यात आली.

कार्यक्रमानंतर सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. यावेळी प्राचार्य काशिनाथ जाधव,पर्यवेक्षक भिमराव बुरुटे,किशोर जाधवर,लक्ष्मण टाळके,सदाशिव यादव,दिलीप काकडे,शाहीर गायकवाड,शेवाळे मॅडम,कळसाईत मॅडम आदि आजी माजी शिक्षक उपस्थित होते.



### सोशल मीडियामुळे मैत्रीचा पुनर्जन्म

सोशल मीडिया समाजासाठी शाप की वरदान अशी चर्चा सर्वत्र होत आहे मात्र त्याचा योग्य उपयोग केल्यास तो नक्कीच सम ाजाच्या हिताचा ठरू शकतो याचा प्रत्यय यावेळी आल्याचे अनेकांनी सांगितले.शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तब्बल ३० वर्षांनी पुन्हा एकमेकांना भेटले असल्याने सोशल मीडियामुळेच मैत्रीचा पुनर्जन्म झाल्याची भावना यावेळी राजेंद्र डंगे यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन किशोर जाधवर यांनी केले. आभार नवनाथ गायकवाड यांनी मानले. यावेळी माजी विद्यार्थ्यांमध्ये राजेंद्र डंगे, पंढरीनाथ खाटमोडे, सचिन घाडगे, लहू तनपुरे, तानाजी मोहिते, भाऊ मोरे, राजेंद्र चव्हाण पाटील, मुकुंद पानसरे, आमोल शिंदे, मनोज ढोबळे, सतिश सुपेकर, मनोज मारवाडी, पिंटू आगवणे,शंकर जाधव, कविता खाटमोडे, मनिषा कानतोडे, शुभांगी पाटणे, मंगल सरवदे-पाटील, वैशाली जाधव आदि उपस्थित होते.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अविष्कार फाउंडेशनतर्फे शोभा वांगी यांना महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२२ मे-**

शहरातील महिला उद्योजिका शोभा महेश वांगी यांना उद्योग व सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन 'अविष्कार सोशल अँड एज्युकेशनल फाउंडेशन इंडिया, कोल्हापूर' यांच्यावतीने दि. १८ मे रोजी पन्हाळगड (कोल्हापूर) येथे महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला.



हा सन्मान भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भाची डुमुनी मुरमु आणि कोल्हापूरच्या प्रसिद्ध न्यूरो सर्जन डॉ. प्रभू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी अविष्कार फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संजय पवार, राष्ट्रीय महासचिव सुनिता केदार, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष रंगराव सूर्यवंशी, पन्हाळा तालुकाध्यक्ष शशिकांत म्हेतर आदी मान्यवर उपस्थित होते. उद्योग व सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल शोभा महेश वांगी यांना कोल्हापुरी फेटा, मानपत्र आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

## महत्वाचे...



## बांधकाम कामगारसेना जिल्हा महिला प्रमुखपदी वैशालीताई हावनुर

**अक्कलकोट, दि. २२ मे-**

शिवसेना बांधकाम कामगार सेना सोलापूर जिल्हा महिला आघाडी जिल्हाप्रमुखपदी वैशालीताई हावनूर व शिवसेना बांधकाम कामगार सेना जिल्हा संघटकपदी संगीता खांबसकर व शिवसेना बांधकाम कामगार सेना सोलापूर शहर संघटक पदी भीमाशंकर पटणे यांची निवड करण्यात आली. शिवसेना सोलापूर जिल्हा लोकसभा संपर्कप्रमुख महेश नाना साठे व शिवसेना सोलापूर जिल्हा महिला आघाडी संपर्क प्रमुख अनिताताई माळगे यांच्या हस्ते निवडीचे पत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. शिवसेना बांधकाम कामगार सेना सोलापूर जिल्हा यांच्यावतीने शिवसेना सोलापूर जिल्हा लोकसभा संपर्कप्रमुख महेश नाना साठे यांचा सोलापूर जिल्हा शिवसेना बांधकाम कामगार सेना जिल्हाध्यक्ष साहेबांना तेगेंळी व शिवसेना बांधकाम कामगार सेना जिल्हा उपप्रमुख स्वामीनाथ हेगडे यांच्या हस्ते लोकसभा संपर्कप्रमुख महेश नाना साठे यांचा सत्कार करण्यात आला. शिवसेना सोलापूर जिल्हा महिला आघाडी संपर्क प्रमुख अनिताताई माळगे यांचा सत्कार शिवसेना बांधकाम कामगार सेना महिला आघाडी जिल्हाध्यक्ष वैशालीताई हावनूर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी सोलापूर जिल्हा सर्व शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

## बावी (आ) मध्ये घरफोडी; दागिने, रोख रक्कम लंपास

**बार्शी, दि.२२ मे-**

तालुक्यातील बावी (आ) येथे चोरट्यांनी घरफोडी करत सुमारे २ लाख ३८ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी केली आहे. ही घटना १८ मे रोजी रात्री ७ वाजेपासून १९ मे रोजी सकाळी ६ वाजेच्या दरम्यान घडली. याप्रकरणी बावी येथील विश्वास त्रिंबक फोपले यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादी फोपले हे खाजगी नोकरी व शेती करुन आपल्या कुटुंबासह बावी येथे राहतात. सध्या त्यांच्या चुलत्यांचे घर बंद असल्यामुळे ते कुटुंबासह त्या घरात रात्री झोपण्यासाठी जात होते. मात्र, घटना घडलेल्या दिवशी ते आपल्याच घरी झोपले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांचा मुलगा जय याने चुलत्याच्या घराचे दरवाजाचे कोयंडे तुटलेले पाहिले. त्यांनी घरात जाऊन पाहिले असता कपाट उघडे असून कपड्यांची व इतर साहित्याची उचकापाचक झालेली दिसली. कपाटातील २०,००० हजार रुपये रोख रक्कम व विविध सोन्याचे दागिने मिळून सुमारे २.३८ लाख रुपयांचा ऐवज चोरीस गेला असल्याचे निष्पन्न झाले. यामध्ये सोन्याची बोरमाळ, कांड्याचे डोरले, झुबे, विविध अंगठ्या, गंठण, टॉप्स, नथ, बदाम (मुलांचे) २० हजार रोख रक्कम चोरट्यांनी कुलुप तोडून घरात प्रवेश करुन कपाटातील ऐवज लंपास केला.





## वाखरी येथे कायदेविषयक शिबीर संपन्न

**पंढरपूर,दि.२२ मे -**

पंढरपूर तालुका विधी सेवा समिती, व पंढरपूर अधिवक्ता संघ यांचे संयुक्त विदयमानाने किमान समान शिबीरा अंतर्गत तसेच वाखरी ग्रामपंचायत येथे पंढरपूर तालुका विधीसेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश डी. एन. सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली व सह दिवाणी न्यायाधीश एन. एस. बुद्रुक यांच्या अध्यक्षतेखाली कायदेविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिबीरात न्यायाधीश एन.एस. बुद्रुक, यांनी उपस्थीत ग्रामस्थांना कायदेविषयक जनजागृती करुन त्यांना त्यांच्या हक्का विषयी सखोल असे मार्गदर्शन केले. अ‍ॅड. देशमुख यांनी उपस्थित गावक-यांना तंबाखू विरोध दिनांबाबत मार्गदर्शन केले तसेच अ‍ॅड. चौगुले यांनी कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळाबाबतच्या कायदया विषयी मार्गदर्शन केले. प्रारंभी कायदेविषयक शिबीराची प्रस्ताविका पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष अ‍ॅड. आर. बी.चौगुले यांनी केली, तर सुत्रसंचालन पंढरपूर अधिवक्ता संघाचे सचिव अ‍ॅड. ए.एम. देशमुख यांनी केले. सदर शिबीरास विधी स्वंयसेवक सुनील यारगट्टीकर, तसेच न्यायालयीन कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लिखित नामजपाच्या वह्या स्वामी चरणी अर्पण

### समर्थ प्रतिष्ठानचा उपक्रम

### दिंडी मिरवणुकीने हजारो भक्तांची लिखित सेवा समर्पित

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि २२ मे-**

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ, श्री स्वामी समर्थ महाराज की जय ! च्या जयघोषात श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान येथे श्री स्वामी समर्थ प्रकटदिन ते पुण्यतिथी दरम्यान केलेल्या लिखित नामजप वह्याचा स्वामी चरणी अर्पण सोहळा हजारो स्वामी भाविकांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

समर्थ नगरी प्रतिष्ठान अक्कलकोटच्या माध्यमातून राज्यभरात श्री स्वामी समर्थ प्रकटदिन ते पुण्यतिथीच्या दरम्यान लिखित नामजप सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यामध्ये अक्कलकोटसह महाराष्ट्र, गोवा , कर्नाटक, राजस्थान, गुजरात आदी भागातून मोठ्या प्रमाणात स्वामी भक्तांनी सहभाग घेतला. या लिखित नाम जपाच्या वह्या संस्थेच्यावतीने करण्यात आलेल्या आवाहनानुसार अक्कलकोट येथे पाठविण्यात आल्या. बुधवार रोजी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे, संस्थापक अध्यक्ष सैदप्पा इंगळे, राज्य अध्यक्षा वनिताताई झेंडे, कार्याध्यक्षा वीणाताई कामठे, महिला अध्यक्षा सुखदा ग्रामोपाध्ये, सचिवा कावेरी धरणे, अध्यात्मिक समिती राज्यकार्याध्यक्ष नरेंद्र शिंगवी, स्वामीभक्त सोपानराव सोनवणे, ज्ञानेश्वर शिंदे आदींच्या प्रमुख उपस्थितीमध्ये श्री स्वामी समर्थ नामाचा जयघोषात वह्याची दिंडी काढून मंदिरामध्ये प.पू. व्यंकटेश पुजारी यांच्या हस्ते विधिवत पूजन करून श्री स्वामी समर्थांच्या चरणी अर्पण करण्यात आल्या. याप्रसंगी राहुल होटकर अदिसह समर्थ नगरी परिवारातील सदस्य सहभागी झाले होते.



समर्थ नगरीच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या सेवेमध्ये आम्ही मागील चार वर्षापासून सहभागी आहोत. आमच्या जीवनामध्ये मोठे परिवर्तन झाले आहे. परिवाराशी जोडलेल्या अनेक कुटुंबांना देखील याची प्रचिती आलेली आहे. पुणे येथील साधना वर्गामध्ये मोठ्या प्रमाणात स्वामीभक्त जोडले जात आहेत. पुणे येथून हजारो वह्या आज अर्पण करण्यात आल्या. पुढील काळात अशीच सेवा अखंडपणे आम्ही चालू ठेवू.

**- वनिताताई झेंडे, स्वामी सेविका**

### नामस्मरणसेवा तारणहार

विश्वशांती व मनशांतीकरिता श्री स्वामी समर्थांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या अक्कलकोट नगरीतून स्वामी नामप्रसार तथा नामस्मरण सेवेचे आयोजन केले जाते. महाराष्ट्र राज्यासह गोवा, कर्नाटक ,राजस्थान ,गुजरात आदी भागात मोठ्या प्रमाणात स्वामी परिवार जोडला गेला आहे. नामस्मरणाच्या माध्यमातून अनेक भक्ताच्या जीवनामध्ये परिवर्तन घडून आलेले आहे. अनेकांच्या व्याधी देखील दूर झालेल्या आहेत. कलियुगात नामस्मरण हेच तारणहार आहे. स्वामीभक्तांनी नामस्मरण सेवेत सहभागी व्हावे.

**- सैदप्पा इंगळे, संस्थापक अध्यक्ष**

कोरोनाच्या काळात श्री स्वामी समर्थांची ओढ लागलेल्या भक्तांना सोशल मिडीयाच्या माध्यमातून समर्थ नगरी परिवाराच्या वतीने नित्य काकडआरती व दर्शन सेवा देण्यात आली. राज्यभरामध्ये श्री स्वामी समर्थ नामप्रसार सेवा, नामस्मरण सेवा, एकत्रित नामस्मरण सोहळा आयोजन करून सेवा केली जाते. आजच्या सोहळ्यामध्ये सामील झालेले भक्तांची व नामजपवह्यांची संख्या पाहता समर्थ नगरीचे कार्य उल्लेखनीय आहे. पुढील काळामध्ये सर्वांनी समर्थनगरीच्या नामप्रसार सेवेत सहभागी होऊन आपली सेवा अर्पण करावी.

**- महेश इंगळे, चेअरमन,**
**श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान**

## वळसंग येथे शनिवारपासून श्री रामलिंग चौडेश्वरी यात्रा प्रारंभ

### यात्रेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**वळसंग, दि. २२ मे -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंगचे ग्रामदैवत श्री रामलिंग चौडेश्वरी यात्रेस शनिवार दि. २४ मेपासून सुरुवात होत आहे. यात्रेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पंच कमिटीच्या वतीने देण्यात आली.

यात २४ मे रोजी पहाटे पाच वाजता रुद्राभिषेक कार्यक्रमाला सुरुवात होणार आहे. रात्री आठ वाजता वाम नायक मिरवणूक निघणार आहे. रविवार २५ मे रोजी रात्री आठ वाजता नृसिंह मिरवणूक निघणार आहे.सोमवार, २६ मे रोजी यात्रेतील मुख्य आकर्षण असलेले बाळबट्टलची मिरवणूक रात्री १२ वाजता ढोल ताशाच्या गजरात निघून संपूर्ण गावाला प्रदक्षिणा घालून मंगळवार २७ मे रोजी सकाळी सात वाजता बाळबट्टल मिरवणुकीची सांगता होणार आहे. याच दिवशी दुपारी १२ वाजता श्री चौडेश्वरी देवीची मंदिरापासून ते हनुमान मंदिरापर्यंत कुंभमिरवणूक निघणार आहे. तर रात्री आठ वाजता बाशिंग तसेच नंदीध्वज व पालखीची मिरवणूक निघणार आहे. बुधवार दि. २८ मे रोजी सायंकाळी सात वाजता रथोत्सव व बाशिंग काठी तसेच श्री रामलिंग चौडेश्वरी देवीच्या मूर्तीची मिरवणूक निघणार आहे. यावेळी शोभेचे दारूकाम कार्यक्रमही होणार आहे. यावेळी रात्री भाविकांसाठी करमणूकीसाठी म्हणून नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

या यात्रेला गेल्या अडीचशे वर्षाची परंपरा असून यात्रेला भाविक मोठ्या प्रमाणावर दर्शनासाठी हजेरी लावतात. यात्रेनिमित्त भाविकांच्या सोयीसाठी विविध सुविधा उपलब्ध करण्यात आले आहेत. या यात्रेचा भाविकांनी लाभघ्यावा असे आवाहन श्री रामलिंग चौडेश्वरी देवस्थान ट्रस्टीचे अध्यक्ष चनबसप्पा खैराटे व पंच कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.






## अक्कलकोट येथे कर्करोग तपासणी मोहीम

### मुख, स्तन कर्करोगांचे झाले निदान

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि २२ मे -**

ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे कर्करोग मोबाईल व्हॅन अंतर्गत तालुक्यातील कर्करोग बाधित रुग्णांची शोध मोहीम व तपासणी पार पाडण्यात आली. यामध्ये मुख कर्करोग, स्तन कर्करोग यासह अन्य प्रकारच्या कॅन्सरची चाचणी मोबाईल व्हॅन अंतर्गत करण्यात आली.

या शबिराचे मार्गदर्शन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी यांच्या मार्ग दर्शनाखाली तसेच वैद्यकीय अधिक्षक डॉ.अशोक राठोड यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. या शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. अश्विन करजखेडे, डॉ. निखिल क्षीरसागर, डॉ .जोशी, डॉ. नीरज जाधव, डॉ. बिराजदार, डॉ. चिंचोळी, डॉ. जवळकोटे. नन्हु कोरबु आणि बहुसंख्य आशा सेविका, कर्मचारी आणि रुग्ण उपस्थित होते.



## पंढरपूर तालुक्यात पावसाने ९३ हेक्टर पिकांचे नुकसान

### आंबा, केळी, डाळींब, कांदा, शेवगा पिकांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२२ मे -**

पंढरपूर तालुक्यात दि. १३ ते २१ मे दरम्यान झालेल्या अवकाळी पावसामुळे १५४ शेतकऱ्यांचे नजरअंदाज ९३.३७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये आंबा, केळी, डाळींब, कांदा, शेवगा आदी पिकांचा समावेश आहे. तसेच एकलासपुर येथे तीन घरांची पडझड झाली असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली. तालुक्यात दिनांक १३, १५ व १९ मे २०२५ रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे तालुक्यातील तावशी, तुंगत, बाभुळगाव, आढीव, रोपळे, शेटफळ, खेडभाळवणी, गादेगाव, शिरगाव, कोर्टी, बोहाळी आदी गावांतील १५४ शेतकऱ्यांचे ९३.३७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. तसेच अवकाळी पाऊस व वादळी वा-यामुळे एकलासपुर येथील ३ घरांची पडझड होवून नुकसान झाले असून, शिरगाव येथे अंगावर झाड पडून १ गाय मयत झाली आहे. याबाबतचे पंचनामे करण्याचे कामकाज सुरु असल्याची माहिती तहसिलदार लंगुटे यांनी दिली. तसेच दिनांक ३१ मे २०२५ पर्यंत अवकाळी पाऊस, गारपीट व वादळी वा-यांमुळे होणा-या नुकसानीबाबतचे पंचनामे करुन दिनांक १ जून २०२५ पर्यंत कृषीसहाय्यक, ग्रामसेवक व ग्राम महसूल अधिकारी यांना अहवाल सादर करण्याचे आदेश तहसिल कार्यालयाकडून देण्यात आले असून, तालुक्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीबाबतचा एकत्रित अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयमार्फत शासनास सादर करण्यात येईल.असेही तहसिलदार सचिन लंगुटे यांनी सांगितले.

# गृहनिर्माण सल्लागार समिती अध्यक्ष मिरगणे यांचा भव्य सत्कार

### भाजपाचे बेघरांना घर हे ध्येय पूर्ण करणार असल्याचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि.२२ मे -**

सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून निरपेक्ष भावनेने आयुष्यभर जनसेवा करत राहणार असून महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष म्हणून गरीब बेघरांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी व झोपडपट्टीमुक्त महाराष्ट्रासाठी नुकतेच धोरण मांडले आहे असल्याचे प्रतिपादन गृहनिर्माण विभाग सल्लागार समितीचे अध्यक्ष राजेंद्र मिरगणे यांनी केले.

येथील आर एस एम हाइट्स प्रांगणात मित्रपरिवाराने आयोजित केलेल्या सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी बाजार समितीचे माजी संचालक साहेबराव देशमुख, उद्योजक जॉन चोप्रा, ज्येष्ठ नेते अरुण भाऊ कापसे, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष विनोद वाणी, भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष बिभीषण पाटील, माजी उपनगराध्यक्ष रामराजे पवार, धामणगाव विविध कार्यकारी सेवा संस्थेचे चेअरमन पांडुरंग पाटील, अविनाश शिंदे, माजी सरपंच मोहन गरजे, उद्योजक शिरीष घळके, रामेश्वर स्वामी, प्रहारच्या जिल्हाध्यक्ष संजीवनी बारंगुळे, भाजपाच्या शहराध्यक्ष प्रतिभा मुळीक आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मिरगणे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून देशातील सर्व आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना हक्काचे व मालकीचे घर अल्प दरात देण्याचे धोरण राबवले आहे. गरिबांना परवडणारी घरे ही संकल्पना तळागाळात रुजविण्यासाठी झोपडपट्टीमुक्त महाराष्ट्र अभियानातून सामान्य माणसाचे चे स्वप्न साकारण्यासाठी मी कार्यरत राहणार आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सन २०१७ साली महाहाऊसिंगचे सहअध्यक्ष पद देऊन माझ्यावर विश्वास ठेवला तसेच राज्याचे गृहनिर्माण धोरण तयार करण्याची जबाबदारी सोपवली या कामांना न्याय दिला तसेच मंत्रिमंडळासमोर गृहनिर्माण धोरण मांडले आता भविष्यात भाजपाचे बेघरांना घर हे ध्येय पूर्ण करण्यासाठी तन मन धनाने कार्य करणार आहे यावेळी बोलताना साहेबराव देशमुख यांनी मिरगणे यांचे मोठे समाजकारण आहे हे प्रगल्भ परिपक्व आणि दूरदर्शी नेतृत्व आहे भविष्यातही त्यांनी आपल्या ज्ञान कौशल्य व अनुभवाचा फायदा बार्शीकरांना व्हावा यासाठी सक्रिय रहावे अशी अपेक्षा व्यक्त केली यावेळी जेष्ठ नेते अरुण कापसे यांनी समाजकारण आणि राजकारण करताना कोणत्याही यश अपयशाची परवा न करता उमेदीने काम केले पाहिजे मिरगणे यांनी सातत्याने बार्शी आणि राज्याच्या राजकारणात आपला ठसा उमटवत कार्यरत रहावे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी मिरगणे यांच्या हस्ते बार्शी तालुक्यातील डॉक्टर लक्ष्मण उंबरदंड यांच्या नियोजनानुसार चार भजनी मंडळांना मृदुंग वीणा पखवाज या साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी केक कापून भव्य पुष्पहार घालून फटाक्यांची आतिषबाजी करून मिरगणे यांचा सन्मान सोहळा साजरा करण्यात आला कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रवींद्र सांगोळे, प्रतापसिंह बाबर, अमर आवटे, नाना पाटील, अविनाश शिंदे, संभाजी आगलावे, कुणाल घोलप, किरण जाधव, शशांक शिराळ, अविनाश ताटे, बाळासाहेब पवार आदींनी परिश्रम घेतले.

